मराठी

# कुमारभारती

## इयत्ता दहावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# कुमारभारती

## इयत्ता दहावी

(प्रथम भाषा)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

CHZSPQ

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
श्रीमती माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य–सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. मोहन शिरसाट
श्री. प्रवीण खैरे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
श्री. देविदास तारू
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
डॉ. सुभाष राठोड
श्री. नाना लहाने
श्रीमती प्रतिभा लोखंडे
श्रीमती जयमाला मुळीक
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती स्मिता जोशी
श्रीमती नेहा रावते
श्रीमती अन्वया काणे
श्रीमती सुप्रिया खाडिलकर
श्री. सुनिल बनसोडे
डॉ. जगदीश पाटील
श्री. रमाकांत देशपांडे
श्री. नामदेव एडके
श्री. रविंद्रदादा डोंगरदेव
श्री. दिलीप देशपांडे

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ

**मुखपृष्ठ** : विवेकानंद पाटील

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2018-19/(1.00)

**मुद्रक** : S K Print Production,Aurangabad

# भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता दहावीच्या वर्गात स्वागत आहे. 'कुमारभारती' मराठी हे तुमच्या आवडीचे भाषेचे पुस्तक! इयत्ता दहावीचे 'कुमारभारती' मराठी हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे.

मित्रांनो, आपण एकमेकांशी संवाद साधण्यासाठी मराठी भाषेचा वापर करतो. मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. आपले विचार, मते, कल्पना, भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्व हवे. या पुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व वाढावे, भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमावे असे आम्हांला वाटते.

पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला क्षमतांची यादी दिलेली आहे. त्यावरून कोणती भाषिक कौशल्ये आत्मसात करायची आहेत याची तुम्हांला कल्पना येऊ शकेल.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यावर तुमच्या लक्षात येईल, की त्यामध्ये विविध साहित्यप्रकारांचा समावेश केलेला आहे. या सर्व साहित्यप्रकारांतील आशय आणि भाषा यांमधील वैविध्य तुम्हांला नक्कीच आवडेल. या अभ्यासातून तुम्हांला मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे हे लक्षात येईल.

या पाठ्यपुस्तकाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठाखालील स्वाध्यायांचे स्वरूप आणि रचना वैविध्य. हे स्वाध्याय तुम्हांला पाठांचे अंतरंग समजून घेण्यास मदत करतील. तुमची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या हेतूने स्वाध्यायांतील कृतींची रचना जाणीवपूर्वक केली आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तुमचे स्वयंअध्ययन यांमधून भाषा शिकताना तुम्हांला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही. पाठांतराचे दडपणही राहणार नाही.

दैनंदिन व्यवहारात आपणाला पावलोपावली मराठी भाषेचा वापर करावा लागतो. त्या दृष्टीने तुमची उत्तम तयारी व्हावी यासाठी या पाठ्यपुस्तकातील उपयोजित लेखनाचा सराव उपयुक्त ठरेल. त्याचबरोबर रोजच्या व्यवहारांमध्ये तुम्हांला तंत्रज्ञानाचा वापर करायचा आहे. त्यासाठी पाठ्यघटकांशी संबंधित अधिक माहिती मिळवण्यासाठी संकेतस्थळांची यादीही दिलेली आहे. प्रत्येक पाठासंबंधी अधिक माहिती मिळवण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू. आर. कोडद्वारे उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य आपणांस उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल.

भाषिक विकासाबरोबरच विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकणारे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला आवडेल, असा विश्वास आहे.

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ मार्च २०१८, गुढीपाडवा
भारतीय सौर दिनांक : २७ फाल्गुन १९३९

# भाषाविषयक क्षमता : प्रथम भाषा मराठी

**इयत्ता दहावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद ऐकून त्यांमधील सत्यता पडताळून पाहून त्याबाबत स्वत:चे मत निश्चित करता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या सूचनांनुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.<br>३. औपचारिक व अनौपचारिक संवाद व संभाषण ऐकून चिकित्सक विचारासह त्यात सहभागी होता येणे.<br>४. विविध साहित्यांतील भावार्थ समजून घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>६. परिसरात बोलल्या जाणाऱ्या विविध बोलीभाषा ऐकून त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार तुलना करता येणे. |
| भाषण-संभाषण | १. विविध पद्यप्रकारांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांच्या मूल्यमापनाचे निकष ठरवून ते सांगता येणे.<br>३. विषयानुरूप स्वत:चे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे.<br>४. विविध उपक्रमांचे नियोजन, आयोजन करून त्यात सक्रिय सहभाग घेता येणे.<br>५. प्रभावी भाषण-संभाषण कौशल्याची वैशिष्ट्ये समजून घेऊन त्यांचा योग्य वापर करता येणे.<br>६. साहित्याची समीक्षा करून त्याबाबत आपले मत मांडता येणे. |
| वाचन | १. योग्य गतीने व विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.<br>३. संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या इ-साहित्याचे वाचन करून आस्वाद घेता येणे.<br>४. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करून, त्या माहितीचा स्वयंअध्ययनासाठी उपयोग करता येणे.<br>५. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना व माहिती चिकित्सकपणे वाचून पडताळून पाहता येणे. |
| लेखन | १. लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>२. वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचा, कल्पनांचा विस्तार करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची, कल्पनांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह, सुभाषिते यांचा लेखनात प्रभावीपणे वापर करता येणे.<br>५. सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण वैचारिक लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग, स्वानुभव यांचे लेखन करता येणे.<br>७. ऐकलेल्या, अनुभवलेल्या माहितीचे व घेतलेल्या मुलाखतीचे शब्दांकन करून अहवाल लिहिता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

| | |
|---|---|
| **अध्ययन कौशल्य** | १. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.<br>२. दिलेल्या विषयावर चिकित्सक विचार करून स्वमत मांडता येणे.<br>३. घटना, प्रसंग, कार्यक्रम यांबाबत अभिप्राय देता येणे.<br>४. आंतरजालाचा वापर करून ऑनलाइन व्यवहार करता येणे, सोशल मीडियाचा योग्य वापर करता येणे.<br>५. संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा अभ्यासासाठी वापर करता येणे.<br>६. प्रसारमाध्यमांद्वारे उपलब्ध होणाऱ्या विविध कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, त्याबाबत चिकित्सक विचार करता येणे.<br>७. विविध सामाजिक समस्यांबाबत चिकित्सक विचार करून आपले मत परखडपणे मांडता येणे.<br>८. विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमातून स्वत:चे विचार मांडण्याचा प्रयत्न करणे. |
| **भाषाभ्यास** | १. इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे.<br>– समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दसंपत्ती, वाक्प्रचार, प्रत्यय व उपसर्ग, शब्दांच्या जाती, विरामचिन्हे, सामान्यरूप, शब्दसिद्धी, **समास–** अव्ययीभाव, तत्पुरुष, द्वंद्व, द्विगू, **अलंकार–** रूपक, व्यतिरेक, दृष्टान्त, चेतनगुणोक्ती, **वृत्त–**भुजंगप्रयात, मालिनी, वसंततिलका, लेखनविषयक नियम. |

## शिक्षकांसाठी

मराठी कुमारभारती (प्रथम भाषा) इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित पाठ, कविता, गीत, कृती (स्वाध्याय) व आशयानुरूप चित्रे यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या भाषाविषयक क्षमतांचा विचार करून विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील कृतींबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावेत.

क्षमता क्षेत्रातील भाषाभ्यास या शीर्षकाखाली दिलेल्या सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घेणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकामध्ये इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी होण्यासाठी विविध कृती योजलेल्या आहेत. व्याकरण घटकांची व कृतींची मांडणी मनोरंजक व सोप्या पद्धतीने केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला जाणार आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात.

उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी घटकनिहाय विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये विकसित होणार आहेत. इयत्ता दहावीतील उपयोजित लेखन घटकांची मांडणी इयत्ता नववीतील उपयोजित लेखन घटकांचा विचार करून केली आहे, त्यामुळे शिक्षकांनी इयत्ता नववीतील उपयोजित लेखन घटकांचाही आढावा घ्यावा.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी, त्याचबरोबर अशा विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांनाही संधी मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचे अर्थ पाठ्यपुस्तकात शेवटी दिलेले आहेत. शिक्षकांनी आवश्यकतेनुसार पाठांतील इतर शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा, तसेच विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून शब्दकोश पाहण्यासाठी प्रेरित करावे.

मराठी कुमारभारती (प्रथम भाषा) इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | जय जय हे भारत देशा (गीत)<br>– मंगेश पाडगावकर | १ |
| २. | बोलतो मराठी...<br>– डॉ. नीलिमा गुंडी | २ |
| ३. | आजी : कुटुंबाचं आगळ<br>– महेंद्र कदम | ५ |
| ४. | उत्तमलक्षण (संतकाव्य)<br>– संत रामदास | ९ |
| ५. | वसंतहृदय चैत्र<br>– दुर्गा भागवत | ११ |
| ❁ | बालसाहित्यिका : गिरिजा कीर (स्थूलवाचन)<br>– डॉ. विजया वाड | १६ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ६. | वस्तू (कविता)<br>– द. भा. धामणस्कर | २१ |
| ७. | गवताचे पाते<br>– वि. स. खांडेकर | २४ |
| ८. | वाट पाहताना<br>– अरुणा ढेरे | २७ |
| ९. | आश्वासक चित्र (कविता)<br>– नीरजा | ३१ |
| १०. | आप्पांचे पत्र<br>– अरविंद जगताप | ३३ |
| ❁ | मनक्या पेरेन लागा (स्थूलवाचन)<br>– वीरा राठोड | ३७ |


## भाग – ३


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ११. | गोष्ट अरुणिमाची<br>– सुप्रिया खोत | ३९ |
| १२. | भरतवाक्य (कविता)<br>– मोरोपंत | ४५ |
| १३. | कर्ते सुधारक कर्वे<br>– डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे | ४८ |
| १४. | काळे केस<br>– ना. सी. फडके | ५२ |
| १५. | खोद आणखी थोडेसे (कविता)<br>– आसावरी काकडे | ५७ |
| ❁ | वीरांगना (स्थूलवाचन) | ५९ |


## भाग – ४


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १६. | आकाशी झेप घे रे (कविता)<br>– जगदीश खेबुडकर | ६५ |
| १७. | सोनाली<br>– डॉ. वा. ग. पूर्णपात्रे | ६७ |
| १८. | निर्णय<br>– डॉ. सुनील विभुते | ७४ |
| १९. | तू झालास मूक समाजाचा नायक (कविता)<br>– ज. वि. पवार | ८० |
| २०. | सर्व विश्वचि व्हावे सुखी<br>– डॉ. यशवंत पाठक | ८२ |
| ❁ | व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन) | ८७ |
| ♦ | **उपयोजित लेखन** | ९८ |

# १. जय जय हे भारत देशा

**मंगेश पाडगावकर** (१९२९ ते २०१५) :

प्रथितयश कवी. वृत्तबद्‌ध रचना, शब्दप्रभुत्व, गेयता ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे 'धारानृत्य', 'जिप्सी', 'छोरी', 'उत्सव', 'विदूषक', 'सलाम', 'गझल', 'भटके पक्षी', 'बोलगाणी' हे कवितासंग्रह; संत मीराबाई, संत कबीर आणि संत तुलसीदास यांच्या काव्याचे भावानुवाद; 'बोरकरांची कविता' व 'संहिता' ही महत्त्वपूर्ण संपादने; 'निंबोणीच्या झाडामागे' हा ललित निबंधसंग्रह; 'भोलानाथ', 'बबलगम', 'चांदोमामा' हे बालगीतसंग्रह इत्यादी लेखन प्रसिद्‌ध आहे. 'वात्रटिका' हा संग्रह त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू दाखवणारा आहे.

प्रस्तुत गीतात देशप्रेम आणि एकात्मता यांचा आविष्कार झालेला दिसतो.

तू नव्या जगाची आशा
जय जय हे भारत देशा

तपोवनातुन तुझ्या उजळली उपनिषदांची वाणी
मातीमधुनी तुझ्या जन्मल्या नररत्नांच्या खाणी
जय युगधैर्याच्या देशा
जय नवसूर्याच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

बळापुढे वा छळापुढे नच इथे वाकल्या माना
अन्यायाला भरे कापरे बघुनि शूर अभिमाना
जय आत्मशक्तिच्या देशा
जय त्यागभक्तिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

श्रमांतुनी पिकलेली शेते पहा डोलती धुंद
घामाच्या थेंबांतुन सांडे हृदयातिल आनंद
जय हरित क्रांतिच्या देशा
जय विश्वशांतिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा

पहा झोपड्या कंगालांच्या थरारल्या भवताली
अंधाराला जाळित उठल्या झळकत लाख मशाली
जय लोकशक्तिच्या देशा
जय दलितमुक्तिच्या देशा
तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा



**(गीतपुष्पांचा फुलोरा या संपादित पुस्तकातून)**

CX9NRD

**(प्रस्तुत गीत हे काव्यानंदासाठी घेतले असून, ते विद्यार्थ्यांकडून तालासुरांत म्हणवून घ्यावे.)**

# २. बोलतो मराठी...

**डॉ. नीलिमा गुंडी (१९५२) :**

मराठीच्या प्राध्यापिका, भाषातज्ज्ञ आणि लेखिका. त्यांची 'अक्षरांचा देव', 'निरागस' हे बालसाहित्य; 'देठ जगण्याचा', 'रंगांचा थवा' हे ललित लेखसंग्रह; 'भाषाप्रकाश', 'भाषाभान', 'शब्दांची पहाट' हे भाषाविषयक लेखसंग्रह इत्यादी ३५ पुस्तके प्रकाशित आहेत. २०११ साली बेळगाव येथे झालेल्या मंथन महिला साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुणे शाखेकडून प्रसिद्ध होणाऱ्या 'संवेदना' या २०११ आणि २०१२ सालच्या दिवाळी अंकांसाठी मुख्य संपादक म्हणून त्यांनी काम केले आहे.

मराठी भाषेतील विविध शब्दप्रयोगांमुळे विनोदाची निर्मिती कशी होते, याचे वर्णन प्रस्तुत पाठात आले आहे. व्युत्पत्ती कोशात शब्दांची व्युत्पत्ती शोधल्याने आपल्याला खूप नवीन माहिती कळते, आनंदही मिळतो. आपल्या जीवनात भाषेला महत्त्व दिल्यास, मनातल्या भावभावनांचे सूक्ष्म अर्थसौंदर्य उलगडण्यास मदत होते, हे या पाठातून स्पष्ट होते.

परवा वर्तमानपत्रात एक विनोद आला होता.

**बायको** : ''तुम्हांला, मी उत्तप्पा बनवू का?''

**नवरा** : ''नको. मी माणूसच ठीक आहे. आली मोठी जादूगार!''

आता इथे विनोद निर्माण झाला आहे. कारण 'बनवणे' हे क्रियापद तिथे शोभणारे नाही. ते हल्ली हिंदी भाषेतून आपल्या स्वयंपाकघरात नको इतकं घुसलं आहे. मराठीत पोळ्या लाटणे, भाजी फोडणीस टाकणे, कढी करणे, भात रांधणे, कुकर लावणे अशा वेगवेगळ्या क्रियांसाठी वेगवेगळे शब्दप्रयोग आहेत; पण हल्ली सगळे पदार्थ फक्त 'बनवले' जातात. मराठीत 'बनवणे' म्हणजे 'फसवणे' असा अर्थ खरं तर रूढ आहे, त्यामुळे माणसाचं माकड आणि पुन्हा माकडाचा माणूस 'बनवणारा' जादूगार, विनोद करणाऱ्या नवऱ्याला आठवला, तर आश्चर्य नाही.

मराठी ढंगाचे शब्दप्रयोग ही आपल्या भाषेची श्रीमंती आहे. मराठीत 'मारणे' हे एक क्रियापद घेतले तर ते किती वेगवेगळ्या प्रकारे वापरले जाते, हे लक्षात घेण्याजोगे आहे. जसे, गप्पा मारणे, उड्या मारणे, थापा मारणे, टिचकी मारणे, शिट्टी मारणे, पाकीट मारणे, जेवणावर ताव मारणे, (पोहताना) हातपाय मारणे, माश्या मारणे इत्यादी. 'मारणे' म्हणजे 'मार देणे' हा अर्थ यात कोठेही आलेला नाही. हीच तर भाषेची गंमत असते.

शब्दप्रयोगाप्रमाणे वाक्प्रचार ही देखील भाषेची खास शैली असते. 'खस्ता खाणे' मध्ये खस्ता हा खाद्यपदार्थ नाही, हे माहीत आहे ना? तसेच 'कंठस्नान घालणे' हा वाक्प्रचार युद्धाविषयीच्या बातम्यांमध्ये असतो. कंठस्नान घालणे म्हणजे गळ्याखालून 'अंघोळ घालणे', असा शब्दश: अर्थ नाही. 'खांद्याला खांदा लावणे' (सहकार्य करणे) आणि 'खांदा देणे' (प्रेताला खांदा देणे) यांतला फरकही लक्षात घ्यायला हवा. एकाऐवजी दुसरे क्रियापद वापरले, तर अर्थाचा अनर्थ होईल. अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यासाठी शब्दकोश वापरण्याची सवय करायला हवी. 'अक्कलवान' म्हणजे हुशार; पण 'अकलेचा कांदा' म्हणजे 'अतिशहाणा' हे माहीत नसेल, तर कोण आपले खरे कौतुक करतोय की फिरकी घेतोय, हेच आपल्याला कळणार नाही.

क्रियापद वापरताना त्यापूर्वी नामाला कोणता प्रत्यय लावायचा असतो, हे नीट माहीत नसले तरीदेखील अर्थाचा गोंधळ होतो. उदा., अंगाला लावणे आणि अंगावर घेणे, तिला हसणे (तिची चेष्टा करणे या अर्थी) आणि तिच्याशी हसणे (सहजपणे हसणे) यांत प्रत्यय महत्त्वाचा आहे. हल्ली सार्वजनिक समारंभांमध्ये आणि वाहिन्यांवर प्रत्ययांची जागा अनेकदा चुकलेली असते. उदा., 'तुझी मदत करणे' याऐवजी 'तुला मदत करणे' हवे. 'त्यांचे धन्यवाद' याऐवजी 'त्यांना धन्यवाद' असे म्हणायला हवे.

भाषेमध्ये अनेक शब्द सतत येत असतात, कारण ती नदीसारखी प्रवाही असते. आपणही संगणकासंबंधी अनेक नवे इंग्रजी शब्द सातत्याने आत्मसात केले आहेत. मराठीने आजवर संस्कृत, फारसी, अरबी, कन्नड, इंग्रजी अशा अनेक भाषांमधले शब्द आपले मानले आहेत. 'टेबल' हा शब्द आता आपल्याला परका वाटत नाही; पण गरज नसताना इतर भाषांमधले शब्द आणि तेही मराठी भाषेचे व्याकरण झुगारून वापरणे योग्य नाही. 'मी स्टडी केली' म्हणण्यातून काय नवीन अर्थ कळतो? त्याऐवजी 'मी अभ्यास केला' म्हणणं योग्य नाही का?

भाषेतली गंमत जाणून घेण्याचा एक मार्ग म्हणजे शब्दांची व्युत्पत्ती शोधणे. यातून आपल्याला खूप नवी माहिती मिळते. 'मोरांबा' या शब्दातल्या 'मोरा'चा मयूराशी संबंध नसून मोरस म्हणजे साखरेशी (जुन्या काळी साखर मॉरिशसवरून यायची म्हणून मोरस) संबंध आहे. शब्दांची पाळेमुळे किती दूरवर पसरलेली असतात, ते त्यातून कळते.

'कदर करणे' असे आपण म्हणतो. तो वाक्प्रचार आहे. 'कद्र' या अरबी शब्दापासून 'कदर' (म्हणजे गुणांची पारख) हा शब्द आपण घेतला आहे. शब्दांच्या मुळाकडे गेलो, की आपल्या चुकाही होत नाहीत. उदा., 'अनुसया' असे नाव नसून ते 'अनसूया' असे आहे. 'अन् + असूया' अशी त्यातील संधी आहे. मनात असूया (मत्सर) नसलेली अशी ती 'अनसूया' हे कळल्यावर शब्द मनात पक्का रुजतो. तसेच 'जराजर्जर' या संस्कृतमधून आलेल्या शब्दाचा अर्थ आहे, 'वार्धक्याने विकल झालेला!' यातील 'ज'चे उच्चार तालव्य (ज्य) आहेत. तर जरा (थोडे), जर (कलाबूत) या शब्दातील 'ज'चे उच्चार दन्तमूलीय आहेत. (दन्तमूलीय म्हणजे जे ध्वनी उच्चारताना जिभेच्या टोकाचा वरच्या दाताच्या मुळांना स्पर्श होतो असे ध्वनी.) उच्चारावरही अर्थ अवलंबून असतो.

भाषेत आपण शब्द कसे उच्चारतो, कोणत्या अक्षराशी शब्द तोडतो, या साऱ्यांना महत्त्व असते. 'सूतकताई' हा शब्द जर 'सूतक ताई' असा लिहिला तर कसं वाटेल? तसंच 'अक्षरश:' हा शब्द लिहिताना 'अक्षर शहा' असा कोणा मुलाचे नाव करून टाकणे बरोबर आहे का?

'पुराणातली वांगी पुराणात' या म्हणीचा अर्थ शोधण्यासाठी सगळ्या पुराणांमध्ये वांग्याशी संबंधित काय गोष्ट आली आहे, हा शोध म्हणजे फुकट उद्योग ठरेल! तिथे मूळ म्हण होती 'पुराणातली वानगी पुराणात.' वानगी म्हणजे उदाहरणे. पण 'वानगी' झाली 'वांगी' आणि आपण शोधत राहिलो वांग्याविषयीच्या गोष्टी! अशी फजिती होते.

काही वेळा दोन शब्दरूपे सारखी असतात आणि ती चकवतात.

उदाहरणार्थ,

१. राजाचे **'कलेवर'** प्रेम होते.

२. अपघातस्थळी कडेला एक **'कलेवर'** पडले होते.

येथे पहिल्या वाक्यात 'कलेवर' हे शब्दरूप 'कला' या शब्दाचे सप्तमी विभक्तीचे रूप आहे तर दुसऱ्या वाक्यात 'कलेवर' हे नाम असून त्याचा अर्थ 'शव' असा आहे.

आपण आपल्या भाषेवर प्रेम करायचं असेल तर भाषेतली अशी शक्तिस्थळे जाणून घ्यायला हवीत. भाषेचा योग्य सन्मान राखायला हवा. आपल्या घरीदारी बोलली जाणारी मराठी भाषा ही आपल्याला आईच्या ठिकाणी आहे. तिने आपल्या भावजीवनाला आकार दिला आहे. आपल्या भावना व्यक्त करायला आधार दिला आहे. तिच्याशी आपले खास जिव्हाळ्याचे नाते असायला हवे. त्यासाठी तिचे ज्ञानही आपण मिळवायला हवे.

आपली भाषा ही हवेसारखी आपल्या आतबाहेर असते. तिचे जीवनातले महत्त्वाचे स्थान कायम ठेवायला हवे. उदा., आता पाऊस पडत आहे. 'पाऊस पडणे' या घटनेविषयी दोन वाक्यांतून कशी दोन प्रकारे प्रतिक्रिया देता येते ते पाहा.

१. पावसाने स्वत: जातीने हजेरी लावून वनमहोत्सवाला दाद दिली.

२. सकाळी सकाळी पाऊस आल्यामुळे माझ्या 'मॉर्निंग वॉक'च्या बेतावर पाणी पडले.

अशी अनेक वाक्ये तयार करता येतील. त्यातून भाव खुलत जातात. भाषा अशी आपल्या मनातले भाव सूक्ष्मपणे सांगायला मदत करत असते, त्यामुळे तिचे अर्थसौंदर्य कळल्यावरच आपण 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी...' असे कविवर्य सुरेश भटांचे शब्द उच्चारायला खऱ्या अर्थाने पात्र ठरू, हे विसरून चालणार नाही.

**(छात्र प्रबोधन, दीपावली विशेषांक २०१६)**

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ)

**भाषा वापरताना अर्थाचा अनर्थ टाळण्यासाठी आवश्यक उपाय**

(आ)

**मराठी भाषेची श्रीमंती**

**(२) शब्दांची व्युत्पत्ती शोधण्याचे फायदे लिहा.**

**(३) पाठाच्या आधारे खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) मराठी भाषेची खास शैली

(आ) मराठी भाषेला लेखिकेने दिलेली उपमा

(इ) शब्दांचा अर्थ जाणून घेण्याचे साधन

**(४) गटात न बसणारा शब्द ओळखून चौकटी पूर्ण करा.**

(अ) ऐट, डौल, रुबाब, चैन

(आ) कपाळ, हस्त, ललाट, भाल

(इ) विनोद, नवल, आश्चर्य, विस्मय

(ई) संपत्ती, संपदा, कांता, दौलत

(उ) प्रख्यात, प्रज्ञा, नामांकित, प्रसिद्ध

**(५) खाली दिलेल्या अनेकवचनी नामांचे एकवचनी रूप लिहून त्यांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य तयार करा.**

(अ) रस्ते (आ) वेळा (इ) भिंती (ई) विहिरी (उ) घड्याळे (ऊ) माणसे

**(६) खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.**

(अ) पसरवलेली खोटी बातमी-

(आ) ज्याला मरण नाही असा-

(इ) समाजाची सेवा करणारा-

(ई) संपादन करणारा-

**(७) स्वमत.**

(अ) 'तुम्ही शहाणे आहात' या वाक्यातील 'शहाणे' या शब्दाच्या अर्थच्छटा लिहा.

(आ) 'गरज नसताना इतर भाषांमधले शब्द वापरून बोलू नये' या लेखिकेच्या मताबाबत तुमचे मत सोदाहरण लिहा.

(इ) लेखिकेने मराठी भाषेचा केलेला सन्मान तुमच्या शब्दांत लिहा.

CXIJT1

# ३. आजी : कुटुंबाचं आगळ

**महेंद्र कदम** (१९७२) :

मराठीचे अभ्यासक आणि लेखक. त्यांची 'मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान', 'कवितेची शैली' ही भाषाविषयक पुस्तके; 'कादंबरी : सार आणि विस्तार', 'कवितेचे वर्तमान' ही समीक्षेची पुस्तके; 'धूळपावलं' ही कादंबरी; 'मेघवृष्टी : अभ्यासाच्या विविध दिशा' हे संपादन; 'तो भितो त्याची गोष्ट' हा कथासंग्रह इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'कवितेची शैली' या पुस्तकास २००७ साली महाराष्ट्र शासनाचा दादोबा पांडुरंग पुरस्कार मिळालेला आहे.

ग्रामीण संस्कृतीतील एकत्र कुटुंबपद्धतीचे अनुपम दर्शन या पाठातून घडते. मानवी नातेसंबंध, त्यांतील सुरक्षितता, त्यांचे परस्परावलंबन आणि या सगळ्याचा आधार असणारी कुटुंबप्रमुख आजी. आजी म्हणजे जणू कुटुंबाचे आगळ. ग्रामीण घरांची रचना, ग्रामीण जीवनशैली यांवर पाठात प्रकाश टाकला आहे. कौटुंबिक नातेसंबंध जपण्याचा संस्कार करणारा हा पाठ आहे. त्या काळातील मुलांचे खेळ, त्यांना मिळणारा रानमेवा अशा अलीकडील काळात दुर्मीळ झालेल्या गोष्टींचे वर्णन पाठात वाचायला मिळते.

'ग्रामसंस्कृती' हा भारतीय संस्कृतीचा पाया असल्यामुळे ग्रामसंस्कृतीचे महत्त्व जाणण्याचा संदेश प्रस्तुत पाठातून मिळतो.

माझी आजी. जवळपास साडेपाच फूट उंचीची, रंगाने गोरी असूनही उन्हापावसाने रापलेल्या त्वचेची. नवऱ्यामागं सगळा संसार गळ्यात पडूनही तिसऱ्या-आमच्या-पिढीवर हुकूमत गाजवणाऱ्या आजीच्या हातात सत्तरी ओलांडली तरी काठी आली नव्हती. दात सगळे शाबूत तर होतेच; पण मोत्यासारखे चमकत राह्यचे. डोकीत एकही केस काळा नव्हता. विशाल कान, धारदार नाक, चेहऱ्यावर सुरकुत्या पडूनही तरुणपणाच्या सौंदर्याची जाणीव करून देणारी चेहऱ्याची ठेवण. ताठ कणा, पायांत जुन्या वळणाच्या नालाच्या वहाणा. अंगात चोळी आणि हिरवं व लाल अशी दोन रंगांची नऊवारी इरकल लुगडी. कपाळावरचं गोंदणं दिसू नये म्हणून त्यावर लावलेला बुक्का. आजीच्या छत्रछायेखाली आमचे सर्व कुटुंब गुण्यागोविंदाने नांदत होते.

आमच्या घरी एक गावरान गाय होती. तिला आम्ही कपिली म्हणायचो. एकाआड एक वेताला तरी खोंड ती नक्कीच द्यायची. त्यामुळं दावणीला कायम कपिलीचीच बैलं असायची. कपिली दूधही भरपूर द्यायची. आमचे वडील किंवा काका धार काढायला निघाले, की ग्लासं घेऊन आमचा मोर्चा गोठ्यात. गाईनं पान्हा सोडला, की वासरू आखडायचं न् चरवीतल्या दुधाच्या धारांचं संगीत ऐकत चरवी भरण्याची वाट बघायची. चरवी भरली, की पुन्हा वासरू सोडायचं न् ग्लास घेऊन लायनीत उभं राह्यचं. तिथंच मग ते धारोष्ण दूध आमच्या ग्लासात यायचं आणि ते उबदार दूध मिश्या येईपर्यंत पीत राह्यचं. तिथंच संपवून घरात यायचं. राहिलेली अर्धी चरवी घरात आली, की म्हातारी ढाळजंतनं सोप्यात अवतरायची. तिथंच बसून राह्यची. हातातील माळेचा एकेक मणी ओढत काहीतरी पुटपुटत राह्यची, कारण एकच, माझ्या आईने व धाकट्या चुलतीने चहा करून पिऊ नये म्हणनू सक्त पहारा द्यायची. चार घरच्या चार सुना नांदायला आल्या. त्यांचा कुणाचा भरवसा द्यायचा? कोण कुणाच्या लेकराला किती देईल खात्री नाही, म्हणून आम्हांला गोठ्यातच दूध मिळण्यावर आजीचा कटाक्ष असायचा. आजी तिथं बसण्याचं आणखी एक कारण होतं. आमची आई थोरलीही होती. आपण बसून जावांना कामं लावायची. खरं तर आजीनं सगळ्यांना कामाच्या वाटण्या करून दिलेल्या. कुणी किती दिवस भाकरी करायच्या, कुणी धुणं धुवायचं, कालवण कुणी करायचं, भांडी कुणी घासायची हे सगळं ठरलेलं असायचं आणि आठवड्यानं प्रत्येकीचं काम रोटेशनप्रमाणे बदललं जायचं. प्रत्येकीला प्रत्येक काम आलंच पाहिजे यावर आजीचा भारी कटाक्ष. येत नसेल तिला ती शिकवायची; पण कामातनं कुणाची सुटका नसायची. भाकरी करपल्या की करणारणीला लाखोली. सरपण नीट नसलं, की गड्यांची फजिती.



स्वयंपाक झाला, की आधी आमची बाळगोपाळांची पंगत बसायची. आजी पुढं सरकायची न् आमची आई जेवायला वाढायची

किंवा कुणी काकीही; पण वाढतानाही आजीचा जागता पहारा. धपाटे घालू घालू खाऊ घालायचं. कुणाला खरकटं ठेवू द्यायचं नाही. आमच्या जेवणानंतर रानातल्या भाकरी बांधल्या जायच्या आणि नंतर सगळ्या बायका मिळून जेवायच्या. दहाच्या दरम्यान पोरांना शाळेत पिटाळून, दुपारच्या कामाचं नियोजन करून मग आजीची स्वारी ढाळजंत येणार. बसता बसता झोपी जाणार; पण झोप भारी सावध. कुठंही खुट्ट झालं, की आजी तट्ट जागी. कानोसा घेऊन पुन्हा डोळं झाकणार. झोप होता होता गल्लीतल्या बायका जमल्या की वाकळ शिवायचं असो, शेंगा फोडायचं असो की धान्य निवडायचं असो, सगळ्या मिळून एकमेकींची कामं करायच्या. गल्लीतल्या बायका येतानाच कामं घेऊन यायच्या. गप्पा व्हायच्या. सासुरवास, जाच अशा सगळ्यांच्या चर्चा.

आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं आणि आजी त्याची संपादक होती. तर सगळ्या बातम्या तिथं यायच्या. त्यांची शहानिशा व्हायची न् मग त्या गावभर जायच्या. कडुसं पडायच्या आधी ही मैफिल मोडायची. माणसांची वेळ झाली, की म्हातारीची ढाळज सुटायची. माणसं ढाळजंत बसायची. रात्री आठच्या दरम्यान ढाळजंचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा. ही आगळ दरवाजाला लावणं किंवा ती काढणं म्हणजे आमच्यासाठी दिव्य असायचं. मुळात ही सहा फुटांची लांब आणि पाऊण फूट रुंद अशी सागवानी आगळ एका भिंतीतल्या देवळीत आरपार जायची. ती आरपार घालवून दरवाजा उघडणं किंवा तिच्या तोंडाला असणाऱ्या पितळी वाघाच्या जबड्यातील कडीला हात घालून ती बाहेर ओढणं व समोरच्या भिंतीतल्या देवळीत ढकलणं फार अवघड गणित होतं. ही आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं, भरभक्कम संरक्षक कवच होतं. दुपारीही एकदा आगळ टाकली की उन्हाचं, सुट्टीचं आम्हांला बाहेर पडायला संधी नसायची, तसाच रात्री त्या आगळीचा आधारही तितकाच वाटायचा.



भर उन्हात मग आजीला जास्त त्रास होऊ न देता तिथंच ढाळजंत, पडवीत, सोप्यात कुठंही आम्ही बैठे खेळ खेळायचो. चिंचोके, गजगं, खापराच्या भिंगऱ्या, जिबल्या, चुळूचुळू मुंगळा, भोवरा, गोट्या असले खेळ असायचे, तर कधी घरातल्या सरपणातली लाकडं काढून विटी-दांडू, भोवरं बनवीत बसायचं. भिंगऱ्या बनवताना त्यांना गोल आकार देण्यासाठी दगडावर घासत बसायचं. मधनंच हुक्की आली, की पाटी काळी कुळकुळीत व्हावी म्हणून खापरानं घासायची. तरवाडाच्या वाळल्या शेंगांना छिद्र पाडून बाभळी काट्यात ओवायच्या. काट्याला आतून एक आणि बाहेरून एक शेळीच्या लेंड्या लावायच्या आणि भिंगऱ्या बनवायच्या. ज्वारीच्या ताटांच्या बैलगाड्या बनवायच्या. तालमीतली लाल माती आणून बैलं बनवायची. कधी गोल गोटे आणून ते घडत बसायचे आणि त्यांच्या छान छान गोल गोट्या बनवायच्या. मग सगळ्यांचा डोळा चुकवून हळूच सटकी मारायची न् गोट्या खेळायला जायचं. तिथंच कुरीचा डाव रंगायचा. ज्यांना खेळायची संधी मिळायची नाही ती पोरं माकडासारखं वडाच्या पारंब्यांना लोंबकळत राह्यची. झोका खेळायची. उतरताना पारंब्यांच्या शेंड्यांना फुटलेली पिवळी पालवी शेव-शेव म्हणून खायची. देवळात जायची. घंटी वाजवून म्हाताऱ्यांची झोपमोड करायची. एखाद्या भर दुपारी मग तिथनंच मोर्चा विहिरीकडं वळवायचा. मनसोक्त पोहायचं. शिवणापानी खेळायचं. मुटकं टाकून पाणी उडवण्याची शर्यत लागायची. कंटाळा आला, की ओल्या अंगाने तिथंच मातीवर लोळत पडायचं. चटके बसायला लागले, की पुन्हा पाण्यात उड्या. थकून घरी यायचं आणि भाकरीवर उड्या टाकायच्या. लाल डोळं आणि पांढरं पडलेलं अंग बघून आजीचं बोलणं खायचं. असल्या सगळ्या निसर्गदत्त वातावरणात बालपण आकारत होतं. गाभोळ्या चिंचा, मिठाचे खडे आणि कच्च्या कैऱ्या, बांधावरची बोरं, चिंचांचा तौर, उंबरं, ढाळं, काटाड्यावर भाजलेली कणसं, गहू-ज्वारीचा हुरडा, कच्ची वांगी, गवार, छोटी तंबाटी, शेळ्या, कलिंगडं, शेंदाडं, करडीची-पात्रंची भाजी, ज्वारीची हिरवीगार ताटं, कवटं, तुरीच्या-मटकीच्या शेंगा, त्यांची उकड, हुलग्याचं माडगं असा सगळा रानमेवा पोटात जात होता. आम्ही वाढत होतो. भांडत होतो. पुन्हा एकत्र खेळत होतो. ढाळजंत आजीच्या धाकात अभ्यास करत होतो. आजीच्या मायेच्या सावलीखाली आम्ही मोठे होत होतो.

(आगळ)

## कृती

### (१) पाठात आलेल्या खेळांचे वर्गीकरण करा.

बैठे खेळ

मैदानी खेळ

### (२) खालील मुद्द्यांच्या आधारे आजीचे शब्दचित्र रेखाटा.

आजी

- आजीचे दिसणे.
- आजीचे राहणीमान.
- आजीची शिस्त.

### (३) विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) आळस | (अ) अनास्था |
| (२) आदर | (आ) दुरावा |
| (३) आस्था | (इ) उत्साह |
| (४) आपुलकी | (ई) अनादर |

### (४) खालील वाक्यांतील वाक्प्रचार शोधून अधोरेखित करा.

(अ) सहलीच्या वेळी शिस्तभंग होऊ नये याकडे शिक्षकांचा कटाक्ष असतो.

(आ) दोन व्यक्तींतील संवादाचा तिसऱ्या व्यक्तीने कानोसा घेणे अयोग्यच.

(इ) कारण नसताना हुकमत गाजवणाऱ्या व्यक्ती इतरांच्या नजरेतून उतरतात.

### (५) कंसातील विशेषणांचा योग्य ठिकाणी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.

(खूप, त्याचा, आंबट, अधिक, द्विगुणित, आमची)

(अ) समुद्रकिनारी................. सहल गेली होती.

(आ) खूप दिवसांनंतर मैत्रिणीला पाहून राजश्रीचा आनंद ................. झाला.

(इ) विजय अजयपेक्षा ................. चपळ आहे.

(ई) रवीला ................. कैऱ्या खायला खूप आवडतात.

(उ) मला गाणी ऐकण्याची ................. आवड आहे.

(ऊ) राजू कबड्डी छान खेळत होता; परंतु ................. पाय अचानक मुरगळल्याने तो बाद झाला.

### (६) खालील शब्दांचे दोन स्वतंत्र अर्थ लिहून चौकटी पूर्ण करा.

(अ) ← वर →

(आ) ← ग्रह →

(इ) ← काठ →

(ई) ← अभंग →

(७) **स्वमत.**

(अ) ‘आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं’ या वाक्याचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

(आ) तुलना करा/साम्य लिहा.

**आगळ –** वाड्याचे कवच **आजी –** कुटुंबाचे संरक्षक कवच

(इ) पाठात चित्रित झालेल्या एकत्र कुटुंब पद्धतीबाबतचे तुमचे विचार स्पष्ट करा.

(ई) पाठाच्या शीर्षकाची समर्पकता थोडक्यात स्पष्ट करा.

**उपक्रम :**

(१) तुमच्या गावाकडे खेळल्या जाणाऱ्या खेळांची माहिती मिळवा व त्यांचा संग्रह करा.

(२) गावाकडचे खेळ व आधुनिक खेळ यांच्या बदललेल्या स्वरूपाबाबत मित्रांशी चर्चा करा.

(टिपा –
- आगळ– वाड्याचा दिंडी दरवाजा बंद करण्यासाठी त्याला आतल्या बाजूने असलेला लाकडी अडसर.
- ढाळज – वाड्यात प्रवेश केल्यानंतर उजव्या, डाव्या बाजूंना असलेली देवडी/पडवी/बसण्यासाठीची जागा.)

## ४. उत्तमलक्षण

**संत रामदास** (१६०८ ते १६८२) :

संतकवी. संत रामदासांच्या काव्याची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे त्यातील सामाजिक जाणीव. समाजाच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीविषयी अखंड जागरूकता आणि अतीव तळमळ संत रामदास यांच्या काव्यात आढळते. आध्यात्मिक विचारांचे प्रतिपादन करणारे टीकाग्रंथ, स्फुट प्रकरणे, आख्यानकाव्ये, करुणाष्टके, उपदेशपर रचना, अभंग, पदे, भूपाळ्या, आरत्या, स्तोत्रे असे विविध प्रकारचे वाङ्मय त्यांनी निर्माण केले. 'दासबोध' ही त्यांची संपूर्ण स्वतंत्र कृती असून त्यातून त्यांचा व्यासंग, चिंतन, समाजाचे व जनरीतीचे त्यांनी केलेले सूक्ष्म अवलोकन प्रत्ययाला येते. 'मनाचे श्लोक' हे त्यांचे अत्यंत लोकप्रिय आणि सर्वतोमुखी असणारे काव्य आहे.

संत रामदास यांनी या रचनेत आदर्श व्यक्तीची लक्षणे सांगितली आहेत. आदर्शत्वाची संकल्पना स्पष्ट करताना त्यांनी 'काय करावे' आणि 'काय करू नये' याबाबत मार्गदर्शन केले आहे. सत्याचा मार्ग स्वीकारावा, विवेकाने वागावे, कीर्ती वाढवावी असा संदेश या रचनेतून संत रामदास देतात.

श्रोतीं व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण ।
जेणें करितां बाणे खुण । सर्वज्ञपणाची ।।१।।

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखिल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ।।२।।

जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ।।३।।

तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये ।
संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं ।।४।।

आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कार्य कांही ।।५।।

सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ।
पैज होड घालूं नये । कांहीं केल्या ।।६।।

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये ।
परपीडा करूं नये । विश्वासघात ।।७।।

व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये ।
आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ।।८।।

सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये ।
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ।।९।।

अपकीर्ति ते सांडावी । सत्कीर्ति वाडवावी ।
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।।१०।।

(श्रीदासबोध-दशक द्वितीय, समास दुसरा,
'उत्तमलक्षण')

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **संत रामदास यांनी विचार करून करायला सांगितलेल्या गोष्टी**

(आ) **कधीही करू नयेत अशा गोष्टी**

(इ) **तुमच्यातील प्रत्येकी तीन गुण व तीन दोष शोधून लिहा.**

गुण

दोष

**(२) खालील व्यक्तींशी कसे वागावे असे संत रामदास म्हणतात.**

(अ) तोंडाळ

(आ) संत

**(३) खालील गोष्टींबाबत कोणती दक्षता घ्यावी ते लिहा.**

| **गोष्टी** | **दक्षता** |
|---|---|
| (१) आळस | |
| (२) परपीडा | |
| (३) सत्यमार्ग | |

**(४) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण तुमच्या शब्दांत लिहा.

‘जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ।।’

(आ) ‘सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ।’, या ओळीतील विचार स्पष्ट करा.

(इ) ‘आळसें सुख मानूं नये’, या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

(टीप – संत रामदास यांच्या काळातील पद्यात आलेल्या शब्दांची व्हावें, आतां, सांगतों यांसारखी रूपे आताच्या काळात व्हावे, आता, सांगतो अशी वापरली जातात.)

❀❀❀

CY2BWB

## ५. वसंतहृदय चैत्र

**दुर्गा भागवत** (१९१०-२००२) :

लोकसाहित्य, समाजशास्त्र, बौद्ध वाङ्मय यांच्या अभ्यासक, ललित लेखिका. गाढ व्यासंग, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, भावोत्कटता, चिंतनशीलता आणि संवेदनाप्रधान भाषा ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये होत. 'ऋतुचक्र', 'व्यासपर्व' आणि साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'पैस' ही दुर्गाबाईंच्या ललित लेखनाची शिखरे होत. 'लोकसाहित्याची रूपरेखा' हा 'लोकसाहित्य' या विषयावरील ग्रंथ, 'राजारामशास्त्री भागवत: व्यक्ति आणि वाङ्मय', 'केतकरी कादंबरी' हे त्यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत. 'सिद्धार्थजातका'च्या सात खंडांचे अनुवाद हे दुर्गाबाईंचे बहुमोल कार्य आहे.

प्रत्येक ऋतूचा आपापला स्वभाव असतो. हा स्वभाव निसर्गाच्या विविध रूपांतून प्रतिबिंबित होतो. या पाठातून वसंत ऋतूतील चैत्राचे मनोज्ञ दर्शन घडते. वसंत ऋतूची चाहूलच खरी मनोहारी! त्यातून चैत्रातील निसर्ग अनुभवणे, हा सर्वार्थाने आनंदानुभव! निसर्गातील घटकांचे सूक्ष्म निरीक्षण आणि ते शब्दांत मांडण्याचे लेखिकेचे कसब यांमुळे 'वसंतहृदय चैत्र' हुबेहूब डोळ्यांसमोर उभा राहतो.

फाल्गुन, चैत्र आणि वैशाख हे तीन महिने वसंताच्या पुष्पमुद्रेचे चिन्ह ल्यालेले असे महिने आहेत. एक दुसऱ्यात मिसळला आहे. तरी पण चैत्र हा खरा वसंतात्मा आहे, मधुमास आहे. या ऋतुराजाचे किंवा मधुमासाचे लक्षण ज्ञानेश्वरांनी सुंदर रीतीने वर्णन केले आहे :

*जैसे ऋतुपतीचे द्वार । वनश्री निरंतर*
*वोळगे फळभार लावण्येसी ।।*

ऋतुपतीच्या द्वारी वनश्रीचे म्हणजे नवपल्लवांनी गर्द झाकलेल्या फुलांनी डवरून गेलेल्या वृक्षलतांचे दर्शन. हे दर्शन तर फाल्गुनातच घडते. मग मधुमासाचे वैशिष्ट्य कशात आहे? या महिन्यात ते सारे सौंदर्य तर आहेच; पण फळांचेही रूप दृष्ट लागेलसे असते. फुलांतून, फळांतून मधुरस वाहत असतो.



चैत्रातल्या पालवीचे रूप कुठेही मोठे मनोहर; पण ही पिंपळाची झाडे पाहा, कशी गहिऱ्या गुलाबी पानांच्या रेशमी पताका नाचवत उभी आहेत ती. जुनी पाने गळता गळता नवी येत होती म्हणून शिरीषासारखी ही पालवी पहिल्याने डोळ्यांत भरत नव्हती; पण सारी नवी पाने आल्यावर खरोखरच उन्हात जेव्हा ही भडक गुलाबी पाने चमकतात, तेव्हा जणूकाही सुंदर पुष्पांचे गेंदच या झाडावर फुलले आहेत असे वाटते. इतर झाडांची पालवी फार लहान असल्याने फार हलत नाही; पण या पानांची सारखी सळसळ. त्यातल्या त्यात आमच्या घराजवळ एक पिंपळाचे झाड आहे, ते तर फारच बहारीचे दिसते. त्याच्यावर मधुमालतीची प्रचंड वेल चढली आहे. चारी बाजूंनी अगदी मध्यापर्यंत त्या झाडाला तिने वेढून टाकले आहे आणि आता ही मधुमालती गुलाबी गेंदांनी खच्चून भरली आहे. आता फुलायला आणखी जागा नाही, अशी दाटी पिंपळाच्या तांबूस पानांची आणि या गुच्छांची झाली आहे आणि नुसती पालवीच नाही तर हिरवी फळेही इतर झाडांप्रमाणे यांच्या फांदीफांदीला ओळीने चिकटून बसली आहेत.

सर्व फुलांत अतिशय हिरिरीने कोणी नटले असेल तर ही उग्रगंधी घाणेरी, किती शोभिवंत आणि दुरंगी फुलांच्या गुच्छांनी ती भरली आहे. गुलाबी फुलांत एखादे पिवळे, पिवळ्यांत एखादे गुलाबी, शेंदरी व पिवळा, पिवळा आणि जांभळा, लाल आणि पांढरा, जांभळा आणि गुलाबी, शेंदरी आणि जांभळा, किती म्हणून या झाडाच्या दुरंगी फुलांच्या रंगांचे वर्णन करावे? वास्तविक हे कुठलेच दोन रंग स्वाभाविकपणे एकमेकांच्या शेजारी एरवी शोभणारे नाहीत; पण निसर्गाच्या दुनियेत कुठलेही भडक व एरवी विसंगत वाटणारे रंग विशोभित दिसत नाहीत, उलट एकमेकांची शोभा



वाढवतात. गुजरातेत बऱ्याच भागांत वृक्षवनस्पतींचा दुष्काळ. तिथे या झाडाला भलतेच महत्त्व आहे. आपण तुच्छतेने घाणेरी म्हणतो तिला आणि तिच्या अतुलनीय रंगसौंदर्याला उपेक्षून पुढे जातो; पण गुजरातीत 'चुनडी' असे सुंदर व यथार्थ नामाभिधान या झाडाला दिलेले आहे आणि या फुलाचे हे नाव ऐकल्यावर काठेवाडी व राजपुतान्यातल्या चुनड्यांच्या भडक रंगांचे रहस्य मला उमगले. भडक विशोभित रंग म्हणून त्यांची पुष्कळदा कुचेष्टा केली जाते. जी रंगाची मिश्रणे आम्ही आमच्या वस्त्राभरणात कटाक्षाने टाळतो, तीच या लोकांनी शतकानुशतके निसर्गाच्या प्रेरणेप्रमाणे शिरोधार्य मानली. भारतीय रंगाभिरुचीचे मूळ प्रादेशिक वातावरणात आणि नैसर्गिक आविष्कारात असलेले पाहून मोठे नवल वाटते.

तशीच ही माडाची आणि सुरमाडाची झाडे पाहा. माडाची झाडे बारमहा हिरवी आणि फळांनी भरलेली दिसतात. पल्लवांचा नखरा त्यांना माहीतच नाही जसा; पण फाल्गुन लागला, की त्यांच्या माथ्यावर अधिक फिक्या रंगाचे जावळ भुरभुरल्यासारखे वाटते. त्यांच्या पानांच्या गाभ्यातून वाढलेल्या नारळांच्या लंगरांच्या वर होडीच्या आकाराचे पेव फुटते आणि त्या सुक्या कळकट पेवातून वेताच्या रंगाच्या फुलांच्या लोंब्या बाहेर पडतात. चैत्राच्या मध्यापर्यंत या लोंब्या दिसतात. नारळाची फुले निर्गंध आणि टणक; पण झाडाखाली पडलेल्या फुलांच्या राशीतून चार-दोन फुले उचलून घेऊन जरा निरखून पाहा. त्यांचा तो टणकपणा तुम्हांला बोचणार नाही. पाकळ्यांच्या गुळगुळीत स्पर्शाने बोटे सुखावतात. तीन पाकळ्यांची फिक्या पिवळ्या रंगांची ही फुले. आत तशाच रंगांच्या केसरांची दाटी. तीन पाकळ्यांचा हा फुलांचा पेला पाहून, त्यांच्या आकाराचे सौंदर्य पाहून तुम्ही मुग्ध झाल्याखेरीज राहणार नाही. प्रचंड नारळाचे हे नखाएवढे फूल पाहून मोठी गंमत वाटते!



शेजारचे कडुनिंबाचे झाड निळसर फुलांच्या तुऱ्यांनी भरून गेले आहे. त्यांचा सुगंध रात्रीच्या वेळी अतिशय मनोरम वाटतो. त्याच्या शेजारीच कडवट उग्र वासाचे करंजाचे झाडही सबंध फुलले आहे. करंजाच्या फुलांचे रूप अलौकिक असते. अगदी नखाएवढी कळी; करंजीच्याच आकाराची, पांढरी, हिरवी; पण फूल उमलले की किती निराळे दिसते. आत एक निळी-जांभळी नाजूक सुंदर कळी आणि तिच्या डोकीवर अर्धवर्तुळ अशी पांढरी टोपी. जणूकाही टोपडे घातलेला बाल घनश्यामच या फुलांच्या रूपात अवतरला आहे. रस्त्यावर पडलेला या फुलांचा खच फार रमणीय दिसतो.

चैत्रातल्या पर्णशोभेचे आणि फळशोभेचे वर्णन आंब्या-फणसाशिवाय पूर्ण होणार नाही. वसंताशी पौषाअखेरीपासूनच मोहोरून सहकार करणारे हे आंब्याचे झाड. लांबलचक देठांना लागलेले कैऱ्यांचे हिरवे गोळे वाऱ्याबरोबर झोके घेत असताना किंवा पोपट किंवा कावळे त्या पाडाला लागल्या आहेत की नाहीत ते पाहण्याकरिता त्यांना चोचींनी प्रहार करतात, तेव्हा मोठी मौज दिसते. गावाबाहेरच्या झाडांतून कोकिळांचे कूजनही बहुधा याच झाडांवर चालत असते. कैऱ्या जून झालेल्या असतानाच एकीकडे पाने झडत असतात; पण झाड रूक्ष असे कधीच दिसत नाही. चैत्रात याही झाडाला पालवीचे घोसच्या घोस लागतात आणि कैऱ्यांबरोबर तेही झोके घेतात. माघातले मोहोरांच्या झुबक्यांनी भरलेले व सुगंधाने दरवळलेले झाड सुंदर की आताचे, हे सांगणे कठीण आहे.



आणि फणस? त्याला नजरेत भरण्यासारखी पालवी नसली तरी तेही टवटवीत दिसते आहे आणि त्याची फळे पायापासून डोकीपर्यंत लादली गेलेली नजरेत भरताहेत. फणसाला फुले धरत नाहीत तर पौष-माघात त्याला हिरवे कोके येतात. फुगीर मिरचीसारखे. मग एकेक कोका दुभंगतो. वरचे टरफल तपकिरी होऊन गळते. आतला हिरवा फणस गुळगुळीत, तुकतुकीत असतो. मग काही दिवसांनी त्यावर खसखशीसारखे बारके दाणे दिसू लागतात. ते दाणे वाढून पांढऱ्या किडीसारखे तंतू बनतात. त्यांच्या खालून काटे वाढतात आणि ते तंतू गळले, की संपूर्ण अवयवांनी युक्त पण आकाराने मुसुंब्याएवढा फणस तयार होतो. अगदी बुंध्यापासून ते धरतात. कधी कधी फळ अर्धे मातीत पण गाडले जाते.



रूपरसगंधमय अशा या चैत्र मासाची शोभा झाडावरच्या काही बांधल्या जाणाऱ्या आणि काही बांधल्या गेलेल्या पक्ष्यांच्या घरट्यांनी पूर्णत्वाला येते. ठिकठिकाणी काही लोंबत्या आकाराची, तर काही वाटोळी चेंडूसारखी, तर काही पसरट गोल, अशी ही काळीकबरी घरटी म्हणजे वसंताच्या चित्रलिपीतली सुंदर विरामचिन्हे वाटतात मला. माधुर्याचा हा थेंब अभिरुचीला पुरेसा वाटतो आणि म्हणूनच निसर्गाच्या विराट चित्रलिपीचा शोध घेण्यापेक्षा मला या स्थूल विरामचिन्हांकडेच पाहायला जास्त आवडते.

(ऋतुचक्र)

## कृती

**(१) पाठाच्या आधारे दिलेल्या वैशिष्ट्यांवरून झाडाचे नाव लिहा.**

| वैशिष्ट्ये | झाडाचे/वेलीचे नाव |
|---|---|
| (अ) निळसर फुलांचे तुरे | ........................... |
| (आ) गुलाबी रंगांची कोवळी पालवी | ........................... |
| (इ) गुलाबी गेंद | ........................... |
| (ई) कडवट उग्र वास | ........................... |
| (उ) दुरंगी फुले | ........................... |
| (ऊ) तीन पाकळ्यांचे फूल | ........................... |
| (ए) पायापासून डोकीपर्यंत लादली गेलेली फळे | ........................... |

**(२) खालील संकल्पनांचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

(१) चैत्र हा खरा वसंतात्मा, मधुमास आहे.
(२) काळीकबरी घरटी चित्रलिपीतली सुंदर विरामचिन्हे वाटतात.
(३) माधुर्याचा हा थेंब अभिरुचीला पुरेसा वाटतो.

**(३) योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) लांबलचक देठ | (अ) माडाच्या लोंब्या |
| (२) अर्धवर्तुळ, पांढरी टोपी | (आ) कैऱ्याचे गोळे |
| (३) भुरभुरणारे जावळ | (इ) करंजाची कळी |

(४) खालील तक्ता पूर्ण करा.

| शब्द | अर्थ |
|---|---|
| निष्पर्ण | पाने निघून गेलेला |
| निर्गंध | .................. |
| निर्वात | .................. |
| निगर्वी | .................. |
| नि:स्वार्थी | .................. |

(५) खालील वाक्यांत योग्य ठिकाणी कंसातील योग्य वाक्प्रचार वापरून वाक्ये पुन्हा लिहा.

(रुंजी घालणे, कुचेष्टा करणे, पेव फुटणे, व्यथित होणे)

(अ) लहानसहान अपयशाने दु:खी होणे अयोग्यच.

(आ) गुंजारव करत भ्रमर फुलांच्या अवतीभोवती फिरत असतात.

(इ) मोठ्या माणसांबद्दल चुकीचे बोलणे हासुद्धा अपराधच.

(ई) सध्या घरामध्ये उंदरांची संख्या वाढल्याने अनेक पाहुण्यांच्या पिशव्या कुरतडल्या गेल्या आहेत.

(६) खालील शब्दांमधील प्रत्यय ओळखून तक्ता पूर्ण करा.

| शब्द | प्रत्यय | त्याच प्रत्ययाचा वेगळा शब्द |
|---|---|---|
| (१) अतुलनीय | .................. | .................. |
| (२) प्रादेशिक | .................. | .................. |
| (३) गुळगुळीत | .................. | .................. |
| (४) अणकुचीदार | .................. | .................. |

(७) खालील वाक्यांतील अधोरेखित नामांचा प्रकार ओळखून चौकटींत लिहा.

(अ) अश्विनीला पुस्तक वाचायला आवडते.

(आ) अजय आजच मुंबईहून परत आला.

(इ) गुलाबाचे सौंदर्य काही निराळेच असते.

(ई) रश्मीच्या आवाजात वेगळाच गोडवा आहे.

(८) खालील ओळी वाचून दिलेल्या शब्दांसाठी त्यातून योग्य पर्यायी शब्द शोधून लिहा.

जो आपल्या आनंदात सोबत असतो, दु:खात सोबत करतो आणि आपण जर वाट चुकत असू तर कान पकडून आपल्याला योग्य वाट दाखवतो, तोच खरा मित्र असतो. काय करावे हे सांगत असताना काय करू नये हे सांगणेही महत्त्वाचे असते.

(अ) कर्ण– (आ) सोबती– (इ) मार्ग– (ई) हर्ष–

(९) स्वमत.

(अ) चैत्रातल्या पिंपळाच्या नवपालवीच्या रूपाचे सौंदर्य तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) चैत्र महिन्यातील पक्ष्यांच्या घरट्यांना लेखिका वसंताच्या चित्रलिपीतली विरामचिन्हे म्हणतात, या विधानाची सत्यता पटवून द्या.

(इ) वसंतऋतूशी निगडित तुमची एखादी आठवण समर्पक शब्दांत लिहा.

**उपक्रम :**

ऋतुमानानुसार तुमच्या परिसरात फुलणाऱ्या झाडांची नावे व वैशिष्ट्ये यांची आंतरजालाच्या साहाय्याने माहिती मिळवा आणि त्या माहितीचा संग्रह करा.

**प्रकल्प :**

पाठात उल्लेख आलेल्या झाडांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून त्याचा तक्ता तयार करा.

**भाषासौंदर्य**

## झाड

'झाड म्हणजे काय' असा प्रश्न कुणाला विचारला, तर तो काय उत्तर देईल? काहीजण म्हणतील, 'झाड म्हणजे गवत नव्हे', तर आणखी काहीजण म्हणतील, 'झाड म्हणजे वेल नव्हे'. खरंच 'झाड' म्हणताच आपल्या मनात काय उभं राहतं? ज्याची मुळं खोलवर जमिनीत गेली आहेत, ज्याला एक छोटा-मोठा बुंधा आहे, अनेक शाखा म्हणजे फांद्या आहेत आणि त्या शाखा हिरव्यागार पानांनी आणि रंगीबेरंगी फुलांनी किंवा फळांनी बहरलेल्या आहेत, असंच दृश्य मनासमोर येईल ना?

झाड, झुडूप, झाडोरा, वृक्ष, महावृक्ष अशी झाडसृष्टीची विविध नावं आपण ऐकतो. झाडाच्या आसपास वाढलेली झुडपं तुम्ही पाहिलेली असतील, त्यांचं रूप झाडाचंच असतं; पण अपेक्षित उंची, डौलदारपणा या गोष्टी तिथं नसतात. 'झाडोरा' हा शब्द सहसा कधी येत नाही, तो 'झाडझाडोरा' असाच येतो. झाडझाडोरा म्हणजे एखाद्या छोट्या-मोठ्या भूप्रदेशावरची सर्व प्रकारची झाडं अन् त्या भोवतीची झुडपं व अन्य वनस्पतिसंग्रह. गंमत म्हणजे 'झाडा'चा वृक्ष झाला, की लगेच नपुंसकलिंगी असलेलं झाड पुल्लिंगी होतं. भरपूर उंची आहे, बुंधा चांगला जाडजूड आहे आणि असंख्य फांद्या-पानांनी डवरलेलं आहे, असं झाड दिसलं, की आपण त्याला 'वृक्ष' म्हणतो आणि याहीपेक्षा आकारमानाने व उंचीने मोठं, दाटीवाटीने बहरलेलं आणि कित्येक वर्षांचं आयुष्य असलेलं असं जे झाड असतं, त्याला 'महावृक्ष' म्हणतात.

संस्कृतमध्ये झाडासाठी 'तरु' हा शब्द आहे. तो आपण मराठीतही वापरतो. विशेषत: कथा-कवितांमध्ये हा शब्द बरेचदा आढळतो.

हिरवीगार झाडं डोळ्यांना व मनाला शांतता देतात. झाडावर निरनिराळे पक्षी येतात. त्यांची छोटी-मोठी रूपं आल्हाददायक असतात. शिवाय झाड स्वत: अंगावर ऊन झेलून आपल्याला सावली देत असतं. तुम्ही तुमच्या विज्ञानाच्या पुस्तकात वाचलंच असेल, की झाडं दिवसा हवेतला कार्बन डायऑक्साईड हा वायू शोषून घेतात अन् ऑक्सिजन वायू बाहेर सोडतात. इतकंच नव्हे, तर आपलं अवघं जीवनच वृक्ष-वनस्पतींवर अवलंबून असतं, म्हणूनच प्रत्येकानं एक झाड लावून, त्याची निगा राखून, त्याचं संवर्धन करायला हवं.

(गंमत शब्दांची- डॉ. द. दि. पुंडे)

❀❀❀

CYB7XY

## बालसाहित्यिका–गिरिजा कीर (स्थूलवाचन)

**डॉ. विजया वाड** (१९४५) :

प्रसिद्ध लेखिका व बालसाहित्यिका. त्यांची कथा, कादंबऱ्या, नाटके तसेच बालांसाठी–कथा, कादंबऱ्या, नाटके अशी सुमारे ११७ पुस्तके प्रकाशित आहेत. मराठी विश्वकोश मंडळाच्या त्या ९ वर्षे अध्यक्ष होत्या. विश्वकोशाच्या ग्रंथवाचन स्पर्धांच्या कामगिरीबद्दल कोलंबो विद्यापीठाकडून डी.लिट् ही पदवी त्यांना प्रदान करण्यात आली. साहित्यक्षेत्रातील महाराष्ट्र राज्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, शिक्षण क्षेत्रातला जिजामाता पुरस्कार यांसह वेगवेगळ्या ९५ पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सन २००७ साली सांगली येथे झालेल्या मराठी बालकुमार साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. त्यांचे 'अंतरंग', 'अभिनेत्री', 'अक्षांश रेखांश' या कादंबऱ्या; 'आपली माणसं', 'ऋणानुबंध', 'गप्पागोष्टी', 'हृदयस्पर्शी' हे कथासंग्रह; 'एक हिरवी गोष्ट', 'तिची कहाणी', 'त्या तिघी' ही नाटके; 'झिप्री', 'बिट्टीच्या बारा बाता' या बालकादंबऱ्या; 'उत्तम कथा', 'अद्‌भुत जगाच्या सफरीवर', 'गोष्टी घ्या गोष्टी' इत्यादी बालकथा; 'चिंगू चिंगम', 'दोन मित्र', 'बंडू बॉक्सर' ही बालनाटके इत्यादी विपुल लेखन प्रसिद्ध आहे.

काही नावे वलयांकित असतात तर काही हृदयांकित असतात, गिरिजा कीर हे नाव मात्र वलयांकित असूनही हृदयांकित आहे, कारण त्यांच्या लेखनप्रवासाला माणुसकीची किनार आहे. दैनिके, मासिके, नियतकालिके, पुस्तके, आकाशवाणी, दूरचित्रवाणी अशा सर्व माध्यमांतून लीलया संचार करणाऱ्या, उत्तम कथाकथनाने मने जिंकणाऱ्या या लेखिका. प्रस्तुत पाठातून गिरिजा कीर यांच्या नाटिका, चरित्रे, कथासंग्रह, बालसाहित्य यांची डॉ. विजया वाड यांनी रसास्वादाच्या अंगाने ओळख करून दिली आहे. एखाद्या साहित्यकृतीकडे बघण्याचा आस्वादात्मक दृष्टिकोन विकसित होण्याच्या उद्देशाने प्रस्तुत पाठ समाविष्ट करण्यात आला आहे.

आपल्याला एखादी गोष्ट आवडली किंवा आवडली नाही तर त्या आवडीनिवडीचे विश्लेषण आपल्याला करता यायला हवे. त्या गोष्टीच्या चांगल्या गुणांचे किंवा तिच्यातील दोषांचे विवेचन करता यायला हवे. एखादं पुस्तक तुम्हांला खूप आवडलं तर त्यातल्या कोणत्या गोष्टी आवडल्या हे मांडणे म्हणजे रसास्वाद होय. एखादी गोष्ट आवडण्याचे वा न आवडण्याचे चिकित्सक, अभ्यासपूर्ण विश्लेषण म्हणजे 'समीक्षा' होय. कोणत्याही साहित्यकृतीची/कलाकृतीची समीक्षा करण्याची पहिली पायरी म्हणजे त्या कलाकृतीचा, साहित्य कृतीचा रसास्वाद घेणे. कोणत्याही कलाकृतीचा आस्वाद घेताना पुढील मुद्दे लक्षात घेणे आवश्यक असते.

(१) पुस्तकाचा वाङ्मय प्रकार कोणता?
(२) पुस्तकातील व्यक्तिरेखा आणि त्यांच्या स्वभावातील भारावून टाकणारे विशेष.
(३) व्यक्तिरेखा सहजपणे फुलल्या, की बारकावे कृत्रिमतेने टिपले आहेत?
(४) कथानक आकर्षक व उत्कंठावर्धक आहे का?
(५) काव्यसंग्रह असल्यास कवितांचे भावसौंदर्य, विचारसौंदर्य व अर्थसौंदर्य कशातून जाणवते?
(६) लेखकाची भाषाशैली कशी आहे?
(७) पुस्तकाची सुरुवात व शेवट आकर्षक आहे का?
(८) पुस्तकातून मिळणारे चिरंतन मूल्य, संदेश, उपदेश तसेच कथानक व त्यातील आशय आणि कथानकाचा विषय या सर्वांचा मनावर एकत्रित परिणाम होतो का?

आज मी गिरिजा कीर यांच्या बालसाहित्याबाबत लिहिणार आहे. विपुल साहित्य निर्मिती करूनही गिरिजाबाईंच्या लेखनात तोचतोचपणाचा दोष अभावानेही आढळत नाही, हे त्यांचे सर्वांत मोठे यश आहे. त्यांची नाटुकली आपण वाचलीत तर आपल्या असं लक्षात येईल, की चमत्कार, अद्‌भुतरम्यता या साऱ्यांपेक्षा बाईंना दैनंदिन जिव्हाळ्याचे प्रश्न खूप महत्त्वाचे वाटतात आणि तेही बालकांच्या विश्वातले. त्यांच्या काही **बालनाटिकांकडे** मी आपले लक्ष वेधू इच्छिते. इटुकली पिटुकली नाटुकली या संचात 'आमच्या आपल्या गप्पा टप्पा', 'चला खेळू नाटक नाटक', 'साळुंकीची कहाणी', 'एऽऽ' गेले गेले' या बालनाटिका नऊ ते बारा या वयोगटासाठी आहेत. तर 'नीला राणीचा दरबार' आणि 'मी कोण होणार' या नाटिका बालवर्गासाठी आहेत. मला बालवर्गासाठी असलेल्या बालनाटिकांचे विशेष महत्त्व वाटते, कारण हा प्रांत

पूर्णतया दुर्लक्षित असा आहे. पुण्याच्या रजनी परांजपे या वयोगटासाठी साधी सोपी जोडाक्षर विरहित पुस्तके प्रकल्प म्हणून तयार करून घेतात. त्यांच्या या स्तुत्य प्रयत्नाला गिरिजाबाईंची ही बालनाटके साथच देतात.

मला विशेष आवडलेल्या एका बालनाटिकेचा उल्लेख करते. नाव आहे, 'एक अर्ज आहे बाप्पा'. सुजाता आणि सदानंद यांच्या घरात घडणारी ही गोष्ट. घरातली मोठी माणसं बाहेर गेली आहेत आणि अशा वेळी छोटी मुलं महत्त्वाचा विचारविनिमय करत आहेत. मुलांसाठी कोणता प्रश्न इतका निकडीचा असतो? तर आई, बाबा, शेजारी या मोठ्यांचं बॉसिंग त्यांना सहन होत नाही; पण हे सांगणार कुणाला? मग सर्वांना वाटतं, की आपल्या तक्रारीचा पाढाच वाचू अर्जात आणि हा अर्ज चक्क बाप्पापुढे ठेवूया. देव नक्की प्रसन्न होईल आणि मग सुरू होते एक सामुदायिक अर्ज लेखन. इथे लेखिकेने काय छान तक्रारी मांडल्यात. आईची शिफॉनची साडी नेसायला मिळालीच पाहिजे. बरफ का गोला खाण्याची आझादी पाहिजे. भेळ खायला मिळायलाच हवी. मधू, भाऊ, विनया ही मित्रमंडळीच कशी बाप्पाचं रूप घेऊन येतात आणि एकमेकांशी कशी भांडू लागतात, त्या प्रसंगात गंमत आली आहे. या नाटिकेला मुलांच्या मनाच्या खिडक्या उघडण्याचे कौशल्य लाभले आहे. छोटे-मोठे सारेच या नाटिकेच्या प्रयोगात रंगून जातील. नाटकाला जे दृश्य परिणाम असायला हवेत ते गिरिजाबाईंच्या नाटकात, प्रभावीपणे दिसतात. मोजक्या पात्रांतून जिवंत दृश्य साकार करणे आणि बालप्रेक्षकांची मने जिंकणे ही अवघड बाब आहे; पण बाई ती लीलया पेलतात.

आता आपण गिरिजाबाईंच्या बालांसाठी असलेल्या अन्य साहित्यकृतींकडे वळूया.

लहान मुलांच्या मनावर उत्तम संस्कार घडावेत म्हणून बाईंनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, तपस्विनी अनुताई वाघ, शिक्षणव्रती ताराबाई मोडक, संत गाडगेबाबा, महात्मा जोतीबा फुले अशी सुंदर सुंदर **चरित्रे** लिहिली आहेत. त्यांच्यातली सामाजिक बांधिलकीची भावना जणू मुलांच्या हृदयाला साद घालते. त्या म्हणतात, ''थोरांनी केलेलं कार्य पुढे नेणं हेच त्यांचं खरं स्मारक!''

प्रत्येक चरित्रात त्यांनी एकेक महत्त्वाचा विचार मांडला आहे. उदा., महात्मा जोतीबा फुले यांच्या चरित्रात गिरिजा कीर लिहितात, ''प्रत्येक सुशिक्षित स्त्रीला, आपल्याला लिहिती बोलती करणाऱ्या या पित्याचं ऋण कधीही विसरता येणार नाही.''

ताराबाई मोडक या शिक्षणव्रती स्त्रीबद्दल लिहिताना त्या म्हणतात, ''माणसं ओळखून त्यांचा योग्य कामाला उपयोग करणं ही ताराबाईंची खासियत आहे.'' खरं आहे! मोठी माणसेच हिऱ्याची पारख करू शकतात. ताराबाई मोडक यांचा वसा पुढे चालवणाऱ्या अनुताई वाघ यांचे चरित्र सादर करताना गिरिजाबाई म्हणतात, ''ज्या भागात काम करायचं त्या भागातील मुलं शिकती आणि शिक्षणासाठी येती करणं, त्या परिसरातल्या जीवनावश्यक अडचणी लक्षात घेणं, कार्यानुभव शिकवताना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणं, त्यांना समजेल अशी भाषा वापरणं, श्रद्धेनं शिकवणं, त्यात प्रेम ओतणं या गोष्टी अनुताईंनी आचरणात आणल्या. जन्मभर ते कार्य पुढे नेण्यासाठी सळसळत्या रक्ताची तरुण मुलं पुढे येवोत! हेच अनुताईंचे खरे स्मारक ठरेल!''

संत गाडगेबाबा यांच्या चरित्रातील हा संदेश बघा ''मुलांनो, संतपद प्राप्त व्हायला चमत्कार करावे लागत नाहीत. विभूती लावून ध्यानस्थ बसावे लागत नाही. पहाडात निघून जावे लागत नाही. लोकांत राहून लोकजागृती कशी करावी हे संत गाडगेबाबांनी दाखवून दिलं. म्हणूनच ते महान संत होत.''

दु:खाच्या अग्नीत होरपळूनही शुद्ध सोन्यासारख्या लखलखणाऱ्या माता अहिल्याबाई होळकर यांच्या चरित्रात त्या लिहितात, ''प्रजेला पुत्रवत मानून अपार सुख देणाऱ्या, दानधर्म करणाऱ्या अहिल्याबाई सदैव इतरांसाठी जगल्या एखाद्या अचल दीपस्तंभासारख्या. त्याचं जीवन गंगाजळासारखं निर्मळ होतं.''

अशा प्रकारे प्रत्येक चरित्रातून गिरिजाबाईंनी मुलांना एक प्रत्ययकारी संदेश दिला आहे. मुलांना पचेल, रुचेल अशी सोपी पण हृदयाला हात घालणारी भाषा वापरून त्यांनी चरित्रलेखनाला एक नवा आयाम दिला आहे.

गिरिजाबाईंनी बालांसाठी विपुल **कथाही** लिहिल्या आहेत.

''तू सावित्री हो!'' या पुस्तकात एकूण आठ कथा आहेत. त्यातील ''गोष्ट एका माणसाची'' ही कथा नितांत सुंदर उतरली आहे. मधू या गरीब मुलाची आई आजारी पडते. तिच्या पोटात गाठी झाल्याचे डॉक्टर सांगतात आणि ऑपरेशनने तिला बरे वाटेल असा निर्वाळाही देतात. मधू अत्यंत निरुपायाने एकाचे पाकीट मारतो, कारण त्याच्याजवळ पैसे नसतात. मधू नोटा मोजतो, तब्बल दोन हजार. पण सोबत चिठ्ठी असते,

''प्रिय आनंदा,

सोबत दोन हजार रुपये पाठवतोय. आईचं औषधपाणी नीट कर. मी येत नाही. तेवढेच पैसे वाचतील. आईच्या उपयोगी पडतील...'' खाली पत्ता.

या पत्राने मधूचे डोळे उघडतात. तो पत्ता शोधत त्या माणसाकडे जातो. त्या माणसाने आपल्या आईच्या आजारपणासाठी ते पैसे ठेवलेले असतात. मधू आपल्या वाईट कृत्याची कबुली देतो; पण तो मनुष्य ते पैसे मधूला परत करतो. ''आजच आई गेल्याची तार आली. आता मी या पैशाचं काय करू? तुला हे पैसे कामी येतील. तुझी आई बरी झाली तर माझीच आई बरी झाली, असा आनंद मिळेल मला!'' मोठ्या मनाचे हे दर्शन विस्मयचकित करणारे आहे.

''फुलं फुलवणारा म्हातारा'' या पुस्तकातील याच नावाची पहिलीच कथा मोठी सुरेख आहे. या कथेत खूप चमत्कार असले तरी मूळची ही जपानी कथा खिळवून ठेवते. सुंदर स्वैर अनुवादाचे उत्तम उदाहरण म्हणून तिचा उल्लेख करता येईल.

**'बालकादंबरी'** हे कथेच्या पुढले पाऊल. गिरिजाबाईंचा 'झंप्या द ग्रेट' खरोखरीच ग्रेट आहे. महाचळवळ्या, वळवळ्या, बघावं तेव्हा नसत्या उद्योगात गढलेला झंप्या बघता बघता बालवाचकांचा लाडका होऊन जातो. आग लागली असे वाटून आगीचा बंब बोलावण्याचे प्रकरण त्या कथेत रंगले आहे.

'यडबंबू ढब्बू' ही बालकादंबरी मनोरंजक आहे. प्रत्येक लहान मूल आईचं आपण आवडतं व्हावं या प्रयत्नात असतं. ढब्बू हा मुलगा आईला उगाचच्या उगाच त्रास देणारा नसतो. ताईचा साखरपुडा असतो. त्यासाठी घरात मिठाई केलेली असते. काही गरीब मुले मागू लागतात. ढब्बू नाही म्हणतो; पण आई म्हणते, ''तुकडा तुकडा देऊन टाक त्यांना, कुणाला दु:खी ठेवू नये. सर्वांवर प्रेम करावे.'' ढब्बू ते ध्यानात ठेवतो. दुपारी सगळे वामकुक्षी घेत असतात, त्या वेळी आईने व्याह्यांना देण्यासाठी आणलेले मिठाईचे ताट ढब्बू भिकाऱ्यांना वाटतो, तो भाग वाचकांना आवडावा असा आहे.

एकूणच गिरिजाबाईंना शब्दांचे इतके सुंदर दान पडले आहे, की 'अनंत हस्ते कमलाकराने, देता किती घेशील दो कराने?' असे वाटावे.


गिरिजाबाईंच्या लेखणीला, त्यांच्या संस्कारक्षम वाङ्मयाला माझा अंत:करणपूर्वक मानाचा मुजरा!


(बोलकी पाने)

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

साहित्यिक गिरिजा कीर यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये.

(अ) 


(आ) 


**(२) टिपा लिहा.**

(अ) गिरिजा कीर यांच्या बालनाटिकांचे विशेष.

(आ) 'यडबंबू ढब्बू' या गिरिजा कीर यांच्या बालकादंबरीतील विनोद.

**(३) 'मधूचे कृत्य संवेदनशील मनाचे उत्तम उदाहरण आहे' या विधानाबाबत तुमचा अभिप्राय स्पष्ट करा.**

**(४) साहित्यकृतीचा आस्वाद घेताना लक्षात घ्यायचे मुद्दे, तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**उपक्रम :** पाठ्यपुस्तकातील कोणत्याही एका पाठाचा समीक्षेच्या/रसास्वादाच्या पायऱ्यांच्या आनुषंगाने अभ्यास करा व त्याचे लेखन करा.

## भाषासौंदर्य

या खेळात डावीकडील चौकटींत काही शब्द दिलेले आहेत. त्याच अर्थाचे दोन अक्षरी जोडाक्षर असलेले शब्द तुम्हांला ओळखायचे आहेत. त्या शब्दांतील जोडाक्षरे वेगळी काढल्यावर त्यातून दोन अर्थपूर्ण शब्द तयार होतात. ते लिहिण्यासाठी तुम्हांला दोन चौकटी दिलेल्या आहेत. शब्द ओळखण्यासाठी त्यांचे सूचक अर्थ उजवीकडील दोन चौकटीत दिले आहेत.

उदाहरणामध्ये, 'छान' या अर्थावरून मस्त हा शब्द सुचवला आहे आणि 'मस्त' वरून मस आणि मत हे दोन शब्द बनतील. ज्यांचे अर्थ उजवीकडील चौकटींत दिले आहेत.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| उदा. | छान | मस्त | मस | चामखीळ, अंगावरील तीळ |
| | | | मत | सल्ला, अभिप्राय |
| १. | खरे | | | ढीग |
| | | | | राजाची पत्नी |
| २. | कविता | | | गेरू, तांबडी माती |
| | | | | प्रश्नार्थक, अव्यय, शरीर |
| ३. | प्रशस्त, टोलेजंग | | | धास्ती |
| | | | | संसार |
| ४. | सारखेपणा | | | वेदाचे नाव, गोड बोलणे |
| | | | | मलई |
| ५. | पसंत | | | गळा, आदर |
| | | | | आई |

# ६. वस्तू

**द. भा. धामणस्कर** (१९६०) : प्रसिद्ध कवी. भावोत्कटता, चिंतनशीलता व प्रांजळपणा यांमुळे धामणस्कर यांच्या कविता वाचकांच्या मनाला स्पर्श करतात. सामाजिक तणावांमुळे आलेली अस्वस्थता व्यक्त करताना संवेदनक्षम मनाला येणारी व्याकुळता आणि अभिव्यक्तीतील संयम ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये होत. त्यांची कविता १९८० साली प्रथम 'कविता दशकाची' या संग्रहातून ठसठशीतपणे वाचकांच्या परिचयाची झाली. 'प्राक्तनाचे संदर्भ' व 'बरेच काही उगवून आलेले' हे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित आहेत.

ही कविता मुक्तछंद या प्रकारातील आहे. कोणत्याही निर्जीव वस्तूशी मानवी भावना जोडली गेली, की ती वस्तू अनमोल ठरते. वस्तू माणसाला दीर्घकाळ साथ देतात. व्यक्ती आणि वस्तू यांच्यामध्ये एक अतूट नाते तयार होते. त्यामुळेच थोर व्यक्तींच्या वापरातील वस्तू पुढे संग्रहालयात जतन केल्या जातात. वस्तूंनाही भावना असतात, हे समजून वस्तू वापराव्यात. वस्तूंशी निगडित स्नेह जपावा, ही भावना कवितेतून व्यक्त होते.

वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण
जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना.
वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो तर वस्तू
प्रचंड सुखावतात.
वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,
तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.
वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,
त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरून
निष्कासित न होण्याची हमी द्या.
वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची,
हे हातांना लक्षात ठेवायला सांगा.
वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन.
त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह
नंतरच्या काळातही.
आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या
हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा
कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क
शाबूत ठेवावा.



**(भरून आलेले आकाश)**

## कृती

### (१) आकृत्या पूर्ण करा.

(अ) वस्तूंची माणसासारखी असणारी वैशिष्ट्ये

(आ) वस्तूंजवळ माणसांसारख्या नसणाऱ्या गोष्टी

(इ) कवीने वस्तूंवर मानवी भावनांचे केलेले आरोप

### (२) कारणे लिहा.

(अ) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत, कारण............

(आ) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही, कारण............

### (३) काव्यसौंदर्य.

(अ) कवितेतील खालील ओळींचे रसग्रहण तुमच्या शब्दांत करा.

वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो तर वस्तू
प्रचंड सुखावतात.

(आ) 'वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची' याबाबतचा तुमचा दृष्टिकोन सांगा.

(इ) एखादी वस्तू बिघडल्यामुळे तुमची फजिती कशी झाली, याचे वर्णन करा.

(ई) तुमचा वर्गमित्र वर्गखोली/शालेय परिसरातील वस्तूचे नुकसान करत आहे, या प्रसंगी तुम्ही काय कराल ते सांगा.

### उपक्रम :

(१) तुमच्या घरातील आजी, आजोबा, पणजोबा यांच्या काळात असणाऱ्या वस्तूंची माहिती मिळवा.

(२) वस्तूंची नीट काळजी घेणाऱ्या आपल्या कुटुंबातील सदस्याची मुलाखत घेऊन संवादलेखन करा.

(३) तुमच्या घरातील अडगळीत टाकलेली वस्तू/विकायला काढलेली वस्तू जर तुमच्याशी बोलू लागली, तर ती काय बोलेल याची कल्पना करून लिहा.

- कंदील व विजेरी (बॅटरी) यांच्यातील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.





कंदील : ..........................................................................

विजेरी : ..........................................................................

कंदील : ..........................................................................

विजेरी : ..........................................................................

कंदील : ..........................................................................

विजेरी : ..........................................................................

कंदील : ..........................................................................

विजेरी : ..........................................................................

कंदील : ..........................................................................

विजेरी : ..........................................................................

कंदील : ..........................................................................

विजेरी : ..........................................................................

CYK3ZL

# ७. गवताचे पाते

**वि. स. खांडेकर** (१८९८ ते १९७६ ) :

कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार, समीक्षक, पटकथालेखक. १९७४ साली ज्ञानपीठ पुरस्काराने खांडेकरांच्या वाङ्मयसेवेचा यथोचित गौरव करण्यात आला. भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' या पुरस्काराने सन्मानित केले.

त्यांचे 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'उल्का, 'दोन मने', 'हिरवा चाफा', 'रिकामा देव्हारा', 'पांढरे ढग', 'पहिले प्रेम', 'जळलेला मोहोर', 'ययाति', 'अमृतवेल' आणि 'अश्रु' या कादंबऱ्या; 'वायुलहरी', 'चांदण्यात सायंकाळ', 'अविनाश', 'मंदाकिनी' इत्यादी लघुनिबंधसंग्रह; 'वनभोजन', 'धुंधुर्मास', 'फुले आणि काटे', 'गोकर्णीची फुले', 'गोफ आणि गोफण' हे समीक्षा लेखसंग्रह इत्यादी लेखन प्रकाशित आहे.

रूपक कथा ही खांडेकरांची मराठी कथेला देणगी आहे. आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि आदर्श मूल्ये यांची मांडणी खांडेकरांनी रूपक कथांतून केली. 'सुवर्णकण', 'क्षितिजस्पर्श', 'वेचलेली फुले' हे त्यांचे रूपक कथासंग्रह आहेत. यांपैकी 'सुवर्णकण' हा खलील जिब्रान यांच्या रूपक कथांचा अनुवाद आहे. प्रस्तुत कथा ही त्यातीलच एक आहे. खांडेकरांनी सृष्टीतील पाने, गवताचे पाते या घटकांच्या रूपकांतून माणसाच्या विविध वृत्ती प्रवृत्तींचे, भावभावनांचे दर्शन या रूपक कथेतून घडवले आहे.

बालपणापासूनच आपणाला कथा खूप आवडतात. विज्ञान कथा, ऐतिहासिक कथा, जातक कथा, साहस कथा, रहस्य कथा असे कथेचे अनेक प्रकार आहेत. यांपैकी एक प्रकार म्हणजे रूपक कथा होय.

रूपक कथेचे वैशिष्ट्य म्हणजे ती आकाराने लहान असते. तिच्यात अर्थघनत्व, आशय समृद्धता आणि सूचकता असल्याने ती अधिक परिणामकारक होते. नाट्यात्मकता, आलंकारिकता आणि संदेशपरता ही रूपक कथेची आणखी काही वैशिष्ट्ये होत. रूपक कथेतून वाच्यार्थ क्षणोक्षणी अंशत: कमी होत जाऊन लक्ष्यार्थ प्रभावीपणे सूचित होतो. खालील कथा वाचून आपल्याला त्याचा अनुभव येईलच.

*हिवाळा नुकताच सुरू झालेला होता.*

*झाडावरून एकामागून एक पिकलेली पाने गळून पडू लागली.*

*पट...पट...पट...*

*त्यांचा तो पट...पट...असा कर्णकटू आवाज...*

*तो आवाज ऐकून धरणीमातेच्या कुशीत झोपी गेलेले एक चिमणे गवताचे पाते जागे झाले. गिरक्या खात खात जमिनीवर येणाऱ्या एका पानाला ते म्हणाले,*

*"पडता पडता किती कटकट करतोयस तू? तुझ्या या दंग्यानं माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की!"*

*पानाला राग आला. ते चिडून म्हणाले, "अरे जा! चिडखोर बिब्बा कुठला! मातीत जन्मून मातीतच लोळणाऱ्या तुझ्यासारख्या क्षुद्र गवताच्या पात्याला आमच्या या उच्च वातावरणाची कल्पना कशी येणार? हा दंगा नाही, बेटा! हे गाणं चाललंय! जन्मात कधी आ न करणाऱ्या तुझ्यासारख्या अरसिकाला ते समजायचं नाही!" हे बोलता बोलताच ते पान पृथ्वीवर पडले आणि धरणीमातेच्या कुशीत झोपी गेले.*

*ते पुन्हा जागे झाले, ते वसंताच्या संजीवक स्पर्शाने! त्या स्पर्शात विलक्षण जादू होती. त्या जादूने आता त्या पानाचे रूपांतर गवताच्या चिमुकल्या पात्यात झाले होते. पुन्हा हिवाळा आला. थंडीने कुडकुडत गवताचे पाते धरणीमातेच्या कुशीत लपू लागले-झोपू लागले. पण पुन:पुन्हा त्याची झोपमोड होऊ लागली. जिकडे तिकडे झाडांवर पाने सळसळत होती...पट पट असा आवाज करीत पृथ्वीवर पडत होती!*

*ते गवताचे पाते कपाळाला आठी घालून स्वत:शीच पुटपुटले, 'काय ही हिवाळ्यातली पानं! जीव खाऊन टाकला यांनी अगदी! केवढा हा कर्णकटू आवाज...छी छी छी! माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चेंदामेंदा केला यांनी!'*

## रूपक कथेचा भावार्थ –

अगदी साध्यासुध्या अशा नैसर्गिक गोष्टींतून मानवी स्वभावाचे विविध पैलू दिग्दर्शित करण्याचे लेखकाचे सामर्थ्य या कथेत सुंदर रीतीने प्रगट झाले आहे. गळून पडलेली पाने मातीत मिसळून जातात आणि पुढे त्या मातीतूनच गवताची चिमुकली पाती वर डोकावून पाहू लागतात. दोघांच्याही अंतरंगात खेळणारा जीवनरस एकच आहे; पण झाडावरून गळून पडणारे पान आपल्या उच्च पदाचा खोटा अभिमान बाळगून गवताच्या पात्याला क्षुद्र लेखते आणि त्या पडणाऱ्या पानाचा आवाज ऐकून आपली सुंदर स्वप्ने भंग पावल्याची तक्रार ते पातेही करत सुटते.

मानवी जीवनातले कितीतरी विसंवाद या साध्या विरोधात प्रतिबिंबित झाले आहेत. तरुण पिढीच्या बेजबाबदारपणाबद्दल बोलणारी वडील पिढी क्षणभर तरी आपल्या तरुणपणातले दिवस आठवते का? आठवण करून घेऊन मग तरुणांवर तोंडसुख घेण्याची तयारी दर्शवते काय?

...आणि वडील पिढीच्या सांगण्याकडे कपाळाला आठी घालून पाहणारी तरुण पिढी तरी प्रौढ झाल्यावर काय करते? तीही जुना कित्ताच गिरवत बसते! बाह्य स्वरूप कितीही बदलले, तरी त्याच त्याच मनोवृत्तीची पुनरावृत्ती होत असलेली दिसते आणि पिढीतील अंतर कायम राहते.

दुसऱ्याच्या जागी स्वत:ला कल्पून त्याचे सुखदु:ख जाणण्याची किंवा त्याच्याशी सहानुभूतीने समरस होण्याची प्रवृत्तीच मनुष्यात नाही. मालक आणि मजूर या दोघांच्या स्थानांची अदलाबदल केली, तर त्यांच्या स्वभावात काही बदल होईल का?

(सुवर्णकण)

## कृती

### (१) आकृत्या पूर्ण करा.

(१) रूपक कथेची वैशिष्ट्ये

(२) गवताच्या पात्याची स्वभाव वैशिष्ट्ये

(३) पानाची स्वभाव वैशिष्ट्ये

(४) गवताच्या पात्यासाठी पाठात आलेले शब्द व शब्दसमूह

### (२) कारणे लिहा.

(अ) झोपी गेलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्यानं गळून पडणाऱ्या पानाकडे तक्रार केली, कारण ...........

(आ) 'अरसिक गवताच्या पात्याला गाणं समजणार नाही' असे गळून पडणारे पान म्हणाले, कारण ...........

(इ) वसंताच्या संजीवक स्पर्शाने पानाचे रूपांतर चिमुकल्या पात्यात झाले, कारण ...........

### (३) खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

(अ) बेजबाबदारपणा–

(आ) धरणीमाता–

(इ) बालपण–

**(४) खालील परिच्छेद वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून परिच्छेद पुन्हा लिहा.**

कुंभकोणम् येथील शाळेत गणिताचा सिद्‌धांत शिक्षक समजावून सांगत होते एखाद्या संख्येला त्याच संख्येने भागले असता भागाकार नेहमी एक येतो तेवढ्यात एक लहानसा मुलगा ताडकन उभा राहिला आणि म्हणाला गुरुजी तुमचा हा सिद्‌धांत थोडासा चुकीचा आहे ते म्हणाले तुझे म्हणणे स्पष्ट करून सांग पाहू यावर तो मुलगा धीटपणे म्हणाला सर शून्याला शून्याने भागले तर त्या चिमुरड्या मुलाचा हा प्रश्न ऐकताच त्या शिक्षकांना त्याच्या बुद्‌धिमत्तेचे विलक्षण आश्चर्य वाटले हा मुलगा म्हणजे पुढे श्रेष्ठ गणिती म्हणून प्रसिद्‌ध झालेले श्रीनिवास रामानुजन होय

**(५) खालीलपैकी कोणती जोडी विरुद्‌धार्थी नाही?**

(अ) ज्ञानी × सुज्ञ

(आ) निरर्थक × अर्थपूर्ण

(इ) ऐच्छिक × अनिवार्य

(ई) दुर्बोध × सुबोध

**(६) स्वमत.**

(अ) 'माणसातील ठरावीक मनोवृत्तीची पुनरावृत्ती वारंवार होत असते', हे पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(आ) गवताच्या पात्याच्या ठिकाणी तुम्ही असता, तर तुम्ही पानाला काय उत्तर दिले असते?

(इ) गवताचे पाते व पान यांच्या स्वभाववैशिष्ट्यांत बदल झाला आहे, अशी कल्पना करून कथेचे पुनर्लेखन करा.

**(७) खाली दिलेल्या रूपक कथेचा भावार्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

''...एक विचारू?''<br>
उगवून नुकतेच काही दिवस झालेलं रोप लगतच्या महावृक्षाला म्हणाले.<br>
''हं.''<br>
''मलाही तुमच्यासारखं मोठ्ठं व्हायचंय... पण..''<br>
''पण माझ्या सावलीखाली आता ते शक्य नाही, हो ना?''<br>
''...हो.''<br>
''अरे! कितीतरी लहान लहान झाडंही खूप सुंदर असतात, आणि इतक्या..''<br>
''पण वाढणं देखील सुंदरच असेल ना?''<br>
''हो! आणि इतक्या उंचीवर आता खरं तर ही लहान झाडंच जास्त सुंदर दिसतात...''<br>
...आणि महावृक्षाला दूरवर जंगलातून वाट काढीत येणारा एक लाकूडतोड्या दिसला!

**(गुलमोहर)**

(टीप – रूपक कथेचा भावार्थ परीक्षेकरिता समाविष्ट केलेला असल्याने तोही पाठाचा भाग म्हणून अभ्यासावा.)

CYTZ29

# ८. वाट पाहताना

**अरुणा ढेरे (१९५७) :**

प्रसिद्ध कवयित्री, कथालेखिका, संशोधक, समीक्षक. कथा, कादंबरी, ललितलेख, आस्वादक समीक्षा, संशोधनपर लेखन असे त्यांनी विविधांगी लेखन केले आहे. काव्यात्मकता आणि मानवी नात्यांचा शोध ही त्यांच्या ललित साहित्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांचे 'प्रारंभ', 'यक्षरात्र', 'मंत्राक्षर', 'निरंजन', 'जावे जन्माकडे' हे कवितासंग्रह; 'कृष्णकिनारा', 'अज्ञात झऱ्यावर' हे कथासंग्रह; 'रूपोत्सव' हा स्फुट लेखसंग्रह; 'मैत्रेयी' ही कादंबरी; 'नागमंडल', 'लोकसंस्कृतीची रंग-रूपे', 'विस्मृतिचित्रे' हे संशोधनात्मक समीक्षात्मक लेखन प्रसिद्ध आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात कशाची न कशाची तरी वाट बघणे ही अटळ गोष्ट असते. प्रस्तुत पाठात लेखिकेने वाट पाहणे या गोष्टीचे अनेकविध पैलू उलगडून दाखवले आहेत. वाट पाहणे हा अनुभव कधी सुखद तर कधी दु:खद असू शकतो. त्यात कधी उत्कंठा, हुरहुर असते तर कधी दडपण असते, हे या पाठातून लक्षात येते.

होळीनंतर थंडी झपाट्यानं कमी होत जायची आणि आंब्यावर मोहोर नुसता घमघमत असायचा. परीक्षा तोंडावर आलेली असायची. मोकळ्या अंगणात अंथरुणं पडायची ती सुट्टी लागल्यावर; पण मार्च-एप्रिलमध्ये आम्हाला गॅलरीत झोपायला मिळायचं.

रात्रीचे मऊगार हात अंगावर फिरायला लागले, की झोपेची गडद चाहूल यायची. डोळे मिटताना मनात एकच संदेश जागा व्हायचा, 'उद्या कोकिळेचं 'कुहू' ऐकू येईल का? बघू हं!' पहाटे पहाटे गाढ झोपेत असतानाच तो 'कुहूऽकुहूऽ' आवाज कानावर यायचा आणि त्या आवाजाची वाट पाहण्याचं सार्थक होऊन जायचं.

सुट्टीची वाट पाहणं तर तेव्हापासून सुरू झालेलंच असायचं. अभ्यासाचा आळस नसायचा. पाठांतर आवडायचं. नेमलेली पुस्तकं गोष्टीच्या पुस्तकांइतकीच परत परत आवडीनं वाचली जायची; पण अभ्यासाचं वही-पुस्तक जरा बाजूला झालं रे झालं, की सुट्टीची आठवण उसळी मारून वर यायची. ते अंगणातलं हजारी मोगऱ्याचं झाड, शनिवारवाड्यात सकाळी सकाळी जाऊन वेचून आणलेली बकुळीची फुलं, माठातलं वाळा घातलेलं पाणी, आई-आत्यांची कुरडया-पापड्यांची घाई, अंगणभर पडणारी वाळवणं, कैरीची डाळ आणि पन्हं, कधीमधी घरची परवानगी मिळाल्यावर चोखायला मिळणारे बर्फाचे गोळे, उसाचा ताजा रस आणि मुख्य म्हणजे खूपच खूप गोष्टीची आणि कवितांची नवी पुस्तकं...सुट्टीची किती वाट पाहत असू आम्ही!

आमच्या भल्यामोठ्या वाड्यात पुष्कळ बिऱ्हाडं असली, तरी आख्ख्या वाड्याला मिळून असलेला एक चौथा मजला म्हणजे माळाच होता. सुट्टीची वाट पाहताना माळ्यावर जाऊन पुस्तकांच्या गराड्यात बसण्याच्या अद्भुत कल्पनेनं अगदी आतून मन फुलून येई. पुस्तकांची वाट पाहण्यात एक गंमत होती. एक वेगळंच जग तिथे भेटत होतं. न पाहिलेले देश, न पाहिलेली माणसं, न अनुभवलेले प्रसंग, अनोळखी तरीपण आपले वाटणारे. ओळखीचे धागे जुळणारे. न जुळणाऱ्या गोष्टीसुद्धा किती थक्क करणाऱ्या! म्हणजे, जग असंही असतं तर...! मला केवढं तरी नवेपण भेटत होतं आणि शब्दांची जादू कळत होती. मी वाचत होते त्या गोष्टी, तो इतिहास, ती गाणी कुणीतरी रचलेली होती. लिहिलेली होती. जे सुचलं, जे लिहावंसं वाटलं ते कसं लिहू शकली आहेत ही माणसं! मला भाषेची ताकद समजत होती. लेखकाच्या प्रतिभेची ताकद समजत होती, म्हणून पुस्तकं वाचण्याची वाट पाहण्यात उन्हाळ्याच्या आधीचा काळ इतका वेड लावायचा की बस्स!

आणखी एक वाट पाहणं होतं पोपटांच्या थव्यांचं. आमच्या घरामागे एक मोठ्ठं उंबराचं झाड होतं. उन्हं तापण्याचे दिवस आले, की त्यांचे थवे उंबरावर येऊन उतरायचे. कशातरीच पानांचं, गाठीगाठीचं ते झाड तेव्हा पिक्या उंबरांनी आणि राघूंच्या हिरव्या पंखांनी इतकं सुंदर होऊन जायचं! मी वाट पाहायचे त्या थव्यांची. त्या लालसर गोड झालेल्या उंबरांची. माझ्या मनात जाग्या होणाऱ्या कितीतरी कवितांची...

पुढे मग कवितेचं बोट मी चांगलं घट्ट धरून ठेवलं. तिची माझी मैत्रीच झाली. आपण कधीपण, केव्हापण मैत्रिणीला हाक मारतो, तिच्याकडे धावतो, तिच्याबरोबर भान विसरून मनातलं वाट्टेल ते बोलतो. इथे फक्त एक फरक होता. तिला हवं तेव्हा ती माझ्याकडे यायची. कधीही रात्री-मध्यरात्रीसुद्धा; पण मला मात्र कधीकधी खूप वाट बघायला लावायची.

मी हाक मारल्यावर हमखास येईलच असं नसायचं कवितेचं. मग तिची वाट पाहणं-अस्वस्थ होणं-कशातच मन लागेनासं होणं-आई, आत्याची ती बोलणी खाणं! आज ते वाट पाहणं आठवलं तरी मी पुन्हा हुरहुरते. उंबराच्या पिकल्या फळांवर पोपटांचे हिरवे पंख पुन्हा उतरून यावेत, असं उगाच वाटत राहतं.

आमची आत्या तेव्हा उरुळीकांचनच्या मराठी शाळेत नोकरी करायची. तेव्हा आजच्यासारखी उरुळीला सहज जाण्याजोगी वाहनांची सोय नव्हती. आत्या सकाळी आठ वाजताच घरातून जायची. बस पकडून रेल्वे स्टेशनला जायची. मग पॅसेंजरनं उरुळी. परतताना तसंच, गाडी पुष्कळदा उशिरा सुटायची. पुन्हा पुणे स्टेशनवरून बसनं घरी परतायला तिला कधी नऊ-साडेनऊसुद्‌धा व्हायचे. आम्ही भावंडं तेव्हा तिची वाट बघत वाड्याच्या दिंडीदरवाज्यात उभी राहायचो. आत्या येईपर्यंत वाट बघून रडू गळ्याशी दाटलेलं असायचं. ती आली, की धाकटा भाऊ झेप टाकून तिला लोंबकळायचा आणि मी रडू आवरत हसायची. सगळा शोष निपटून, तिच्या जवळ घेण्यानं शांत वाटायचं. तिला नोकरी करणं भाग होतं आणि आमचं वाट पाहणं अटळ. आज हे समजणं; पण तेव्हा जीव नुसता फुटून जायचा. कसली कसली भीती वाटत राहायची.

अलीकडे एक सुरेख परदेशी सिनेमा पाहिला. चिनी सिनेमा. 'पोस्टमन इन द माउंटन' हे त्याचं नाव. पहाडी प्रदेशामधला एक जुना पोस्टमन आजारी पडतो, म्हणून त्याच्या जागी त्याच्या मुलानं काम करायचं ठरतं. मुलगा काही फारसा उत्सुक नसतो त्या कामाला; पण शेवटी पत्रांचा थैला पाठीवर घेऊन वडिलांबरोबर कामाची माहिती करून घेण्यासाठी निघतो. वाहनांची सोय नसलेल्या लहान लहान वाड्या-वस्त्या पायी चालत हिंडायच्या, हे वाटतं तितकं सोपं काम नव्हतं.

एका वस्तीवर दोघं बाप-लेक येतात. तिथं एका झोपडीशी एक अंध म्हातारी बसलेली असते. पोस्टमन आल्याचं तिला बरोबर समजतं. ती आनंदून जाते. पत्र हातात घेऊन ती स्पर्शानं त्याचा आनंद भोगते. पोस्टमनलाच ते वाचायला सांगते. म्हातारीच्या मुलानं तिला पाठवलेलं ते पत्र असतं. त्यानं आपल्या आईची खूप प्रेमानं विचारपूस केलेली असते. तिला घेऊन जायला तो लवकरच येणार असल्याचं, त्यानं लिहिलेलं असतं. ते सगळं ऐकताना म्हातारीच्या तोंडावर खूप समाधान पसरतं.


मुलगा जेव्हा पुढे होतो, तेव्हा त्याला दिसतं, की बापाच्या हातात मुळी कोरा कागदच आहे. त्यावर काही लिहिलेलंच नाही. म्हातारी मात्र त्याच्या बापाला पुन्हा पुन्हा धन्यवाद देते. आशीर्वाद देते. तिथून लांब आल्यावर मुलाला बाप सांगतो, की ती म्हातारी आपल्या दूर गेलेल्या मुलाची वाट पहात आहे. त्याच्या पत्राची, त्याच्या येण्याची वाट पाहते आहे. तिचा मुलगा कधीच तिला पत्र लिहीत नाही. तिची चौकशी करत नाही; पण तिचं वाट पाहणं पोस्टमनला मात्र सहन होत नाही. त्या म्हातारीला आनंद वाटावा, म्हणून दरवेळी पोस्टमन मनानंच कोरं पत्र वाचत आलेला असतो आणि म्हातारीचे शेवटचे दिवस त्यामुळे समाधानात चाललेले असतात. आता त्याच्या तरुण मुलानं त्याची जागा घेताना हेच नाटक पुढे चालवायचं आहे.

शहरगावी राहणाऱ्या मुलांची पत्रं हाच म्हातारीच्या जगण्याचा एकमेव आधार आहे, हे ओळखलं आहे त्या प्रौढ, समंजस पोस्टमननं. तो नुसता पत्रं पोहोचवणारा सरकारी नोकर नाही. तो माणूस आहे, भला माणूस! आपल्या तरुण मुलाला तो केवळ पहाडातल्या वाटा आणि खेडी दाखवत नाही. तो त्याला माणसं दाखवतो आहे. माणसांपर्यंत पोहोचवण्याचे पूल दाखवतो आहे. म्हातारीचं वाट पाहणं सुखाचं करण्याची रीत त्यानं मुलाला समजावली आहे. 'वाट पाहणं' ही गोष्ट एरवी सुखाची थोडीच असते! दुःख, काळजी, भीती, अस्वस्थता, तडफड-कितीतरी गोष्टी असतात त्यात भरलेल्या. पावसाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्याचे डोळे आठवा जरा किंवा विठूच्या दर्शनाची वाट पाहणाऱ्या संतांचे अभंग आठवा. त्या करुणेचा स्पर्श झाला की लक्षात येतं, एखाद्या गोष्टीची वाट पाहायला लागते तेव्हाच तिची किंमत कळत जाते. कित्येक मोलाच्या गोष्टी सहज मिळाल्या तर त्याचं मोलच आपल्या लक्षात येत नाही. वाट पाहताना आपण संयम शिकतो. धीर धरायला शिकतो. एखाद्या गोष्टीवरचा विश्वास घट्ट करायला शिकतो. श्रद्‌धा डोळस आणि पक्की होत जाते. ध्यास वाढत जातो.

हे सगळं एका वाट पाहण्याची गोष्ट करताना सहज मनात येतं आहे आणि वाटतं, की जे हवं ते सहज हाती येऊच नये. थोडी वाट पाहायला लागावी. थोडी तडफड भोगायला लागावी. तरच सुखाची चव वाढेल. यशाची गोडी वाढेल. प्रेमातली, मायेतली तृप्ती वाढेल आणि आयुष्याबद्‌दलची ओढही वाढेल.

## (१) आकृत्या पूर्ण करा.

(अ)





(आ)




(इ)




(ई)




## (२) कारणे शोधा.

(अ) आवाजाची वाट पाहण्याचं सार्थक व्हायचं, कारण .............

(आ) म्हातारीच्या तोंडावर समाधान पसरायचं, कारण .............

(इ) पुस्तक वाचण्याची वाट पाहण्यात उन्हाळ्याच्या आधीचा काळ लेखिकेला वेड लावायचा, कारण .............

(ई) पोस्टमन मनानंच कोरं पत्र वाचतो, कारण .............

## (३) तुलना करा.

| व्यक्तीशी मैत्री | कवितेशी मैत्री |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

## (४) 'वाट पाहणे' या प्रक्रियेबाबत पुढील मुद्द्यांना अनुसरून लेखिकेचे मत लिहून तक्ता पूर्ण करा.

| वाट पाहणे प्रक्रियेतील समाविष्ट गोष्टी | वाट पाहणे प्रक्रियेतून माणसाने शिकायच्या गोष्टी | वाट पाहण्याचे फायदे |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**(५) स्वमत.**

(अ) पाठाच्या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत सांगा.

(आ) म्हातारीचं वाट पाहणं सुखाचं करण्यासाठी पोस्टमनने केलेल्या युक्तीबाबत तुमचे मत लिहा.

(इ) 'वाट पाहणे एरवी सुखाची गोष्ट नसली तरी अनेक गोष्टींचे मोल जाणवून देणारी आहे', या विधानाची सत्यता पटवून द्या.

## भाषासौंदर्य

मराठी भाषेतील शब्दसामर्थ्य शब्दातीत आहे. 'वाट' या एकाच शब्दाचा वापर विविध अर्थांनी करून एक अर्थपूर्ण मनोगत तयार झाले आहे.

नमस्कार,

तू **वाट** दाखवणार,
म्हणून काल तुझ्या पत्राची **वाट** पाहत होतो.
त्या **वाटेने** पत्र आलेच नाही.
नेहमी त्या वाटेवरून धावणारी
पोस्टमन दादाची सायकलही
त्या दिवशी धावली नाही.
शेवटी सगळा दिवस वाट पाहण्यात गेला,
साऱ्या दिवसाचीच **वाट लागली**
आणि मी माझ्या घरच्या वाटेने माघारी फिरलो
मनात आले आपण पत्राचीच वाट पाहत होतो
आता कशाचीच वाट पाहू नये
आपणच आपली **वाट निर्माण करावी**
जी **वाट नवनिर्मितीची ठरेल.**

वरील मनोगताचा अभ्यास करा व त्यातील भाषिक सामर्थ्य जाणून घ्या. एका शब्दाचे वेगवेगळ्या संदर्भांत वेगवेगळे अर्थ असणारे इतर काही शब्द वापरून तुम्हांलाही असे मनोगत लिहिता येईल.

आपल्या भाषिक क्षमता वाढवण्यासाठी याचा सराव करा.

CZ3V3H

# ९. आश्वासक चित्र

**नीरजा (१९६०) :**

स्त्रीवादी कवयित्री, कथालेखिका. त्यांचे 'निरन्वय', 'वेणा', 'स्त्रीगणेशा', 'निरर्थकाचे पक्षी' हे कवितासंग्रह; 'जे दर्पणी बिंबले', 'ओल हरवलेली माती' हे कथासंग्रह इत्यादी लेखन प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'कवी केशवसुत', 'इंदिरा संत' तसेच 'भैरू रतन दमाणी' इत्यादी पुरस्कारांनी त्या सन्मानित आहेत.

प्रस्तुत कवितेत स्त्री-पुरुष समानतेचे एक आश्वासक चित्र कवयित्रीने रेखाटले आहे आणि ते चित्र प्रत्यक्षात साकार होईल असा विश्वास व्यक्त केला आहे. कवितेतून व्यक्त झालेला विचार सार्वकालिक आहे. स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य रुजवणारी ही चिंतनशील कविता आहे. कवयित्रीने प्रस्तुत कवितेत चित्रित केलेले स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य सर्व विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित व्हावे व रुजावे, या उद्देशाने पाठ्यपुस्तकात या कवितेचा समावेश केला आहे.



तापलेल्या उन्हाच्या आडोशाला बसून
खेळते आहे एक मुलगी केव्हाची.
मी पाहत राहते तिला माझ्या घराच्या झरोक्यातून.

ती मांडीवर घेते बाहुलीला
एका हातानं थोपटत तिला, चढवते आधण भाताचं
भातुकलीतल्या इवल्याशा गॅसवर.

बाजूला खेळतो आहे मुलगा हातात चेंडू घेऊन
खूप उंच उडवून चेंडू नेमका झेलतो तो हातात.

मुलगी पाहत राहते कौतुकानं त्याच्याकडे.
अचानक बाजूला ठेवून बाहुलीला ती जवळ जाते त्याच्या.
मुलगा दाखवतो तिला, आपलं कसब पुन्हा एकदा.
मुलगी चेंडू मागते त्याच्याकडे
तेव्हा तो हसून म्हणतो,
'तू भाजी बनव छानपैकी पाल्याची.' ती म्हणते,
'मी दोन्ही करू शकते एकाच वेळी. तू करशील?'
मुलगा देतो चेंडू तिच्या हातात.

उंच उडवलेला चेंडू आभाळाला शिवून
नेमका येऊन पडतो तिच्या ओंजळीत.
मुलगा पाहत राहतो आश्चर्यचकित.
तशी हसून म्हणते ती, 'आता तू.'
मांडी घालून मुलगा बसतो गॅससमोर.
दोन्ही हातांनी थोपटत झोपवतो बाहुलीला प्रथम;
मग शोधतो पातेलं भाजीसाठी...

हळूहळू शिकेल तोही
आपलं कसब दाखवतानाच घर सांभाळणं
तापलेल्या उन्हाच्या आडोशाला बसून.

माझ्या घराच्या झरोक्यातून दिसतं आहे
एक आश्वासक चित्र उद्याच्या जगाचं
जिथं खेळले जातील सारेच खेळ एकत्र.
भातुकलीतून प्रवेशताना वास्तवात
हातात हात असेल दोघांचाही
ज्यावर सहज विसावेल बाहुली आणि चेंडू जोडीनं.



(निरर्थकाचे पक्षी)

## कृती

**(१) कवितेच्या आधारे खालील कोष्टक पूर्ण करा.**

| कवितेचा विषय | कवितेतील पात्र | कवितेतील मूल्य | आश्वासक चित्र दर्शवणाऱ्या ओळी |
|---|---|---|---|
| | | | |

**(२) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) तापलेले ऊन ____________

(२) आश्वासक चित्र ____________

**(३) मुलीचा आत्मविश्वास व्यक्त करणाऱ्या कवितेतील ओळी शोधा.**

(अ) ..................

(आ) ..................

**(४) चौकट पूर्ण करा.**

कवयित्रीच्या मनातील आशावाद – [ ]

**(५) कवितेतील खालील घटनेतून/विचारातून आढळणारा व्यक्तीचा गुण लिहा.**

(अ) मांडी घालून मुलगा बसतो गॅससमोर [ ]

(आ) मी दोन्ही करू शकते एकाच वेळी [ ]

(इ) जिथे खेळले जातील सारेच खेळ एकाच वेळी [ ]

**(६) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे तुमच्या शब्दांत रसग्रहण करा.

'भातुकलीतून प्रवेशताना वास्तवात, हातांत हात असेल दोघांचाही'

(आ) 'ती म्हणते मी दोन्ही करू शकते एकाच वेळी. तू करशील?' या ओळीचा तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

(इ) कवितेतील मुलगा आणि मुलगी कशाचे प्रतिनिधित्व करतात असे तुम्हांला वाटते, तुमच्या शब्दांत लिहा.

(ई) 'स्त्री-पुरुष समानते'बाबत तुम्हांला अपेक्षित असलेले चित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.

DB88HT

# १०. आप्पांचे पत्र

**अरविंद जगताप (१९७७) :**

प्रसिद्ध कवी, गीतकार आणि पटकथालेखक. सिनेमा, कला, साहित्य आणि दूरदर्शन या क्षेत्रांसाठीचे त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे. तसेच त्यांची हृदयस्पर्शी लेखनशैली प्रसिद्ध आहे. विविध सामाजिक व संवेदनशील विषयांवर लेखन करून जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न ते लेखनाच्या माध्यमातून करत आहेत. मराठी व हिंदी चित्रपट, मालिका यांसाठीही त्यांनी लेखन केले आहे. मराठीतील 'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय मालिकेतील पोस्टमनकाकांच्या पत्रांच्या माध्यमातून, त्यांचे लेखन सर्व महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचले आहे. त्यांचे 'पत्रास कारण की' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. विविध वृत्तपत्रे व नियतकालिके यांतूनही त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे. त्यांच्या सर्वोत्कृष्ट गीतांसाठी राज्य शासनाचा सन २०१२ चा पुरस्कार, सह्याद्री सन्मान पुरस्कार, व्ही. शांताराम पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

भ्रमणध्वनी (मोबाईल) व एस एम एस च्या दुनियेत हरवत चाललेला जिव्हाळ्याचा विषय म्हणजे पत्ररूप संवाद. प्रस्तुत पाठातील पत्राद्वारे पुन्हा एकदा पत्ररूप संवादाचे वेगळेपण तुमच्या लक्षात यावे, हा या पाठामागील उद्देश आहे. प्रस्तुत पाठातून (पत्रातून) शाळेतील शिपाईकाका तुमच्याशी मनमोकळे हितगुज करत आहेत.

मित्रांनो, शालेय वातावरणात तुम्ही अनेक वर्षे राहत आहात. शाळेतील सर्व वस्तू, व्यक्ती तुमच्या आवडीच्या असतात. शाळेतील शिपाईकाका हे देखील तुमच्यासाठी अत्यंत आवडीचे आणि जिव्हाळ्याचे असतात.

कोणतेही काम श्रेष्ठ, कनिष्ठ नसून कामाचा दर्जा हा आपल्या प्रामाणिकपणे काम करण्यावर अवलंबून असतो. म्हणूनच मोठे व्हा, मिळालेले काम मनापासून आवडीने करा, कामामध्ये यश मिळवण्यासाठी मनापासून कष्ट करा, यश तुम्हांला हमखास मिळेल, अशा संदेशपर शुभेच्छा पत्राच्या रूपाने ते तुम्हां सर्वांना देत आहेत.



प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुमच्याशी खूप वर्षांपासून बोलायचं होतं; पण राहून जायचं. घाबरू नका, मी कुणी उपदेश करणारा माणूस नाही. मी तुमच्या शाळेतील शिपाई, आप्पा. शाळेत तुम्ही एवढे घाईत असता, की कधी बोलायची संधीच मिळत नाही, म्हणून हे पत्र. तुमच्या अभ्यासाविषयी मला काही सांगायचं नाही. मीच कधी कधी तुमचे शिक्षक जे शिकवत असतात ते खिडकीतून ऐकत असतो, कान देऊन. हे सगळं लहानपणी राहून गेलं. घरची परिस्थिती नव्हती पूर्ण वेळ शाळेत बसून राहण्यासारखी; पण तुम्ही सुदैवी आहात. रोज नवीन नवीन गोष्टी कानांवर पडतात. खरं सांगू का, मला अधूनमधून शाळेत येणारे तुमचे पालकच जास्त चिंतेत दिसतात; पण तुम्ही उगीच चिंता करू नका. चिंतेने फक्त कपाळावरच्या आठ्या वाढतात, मार्क्स वाढत नाहीत. असो.

पत्र लिहिण्याचं कारण एवढंच आहे, की पुढच्या वर्षी तुम्ही शाळा संपवून कॉलेजमध्ये जाणार. आयुष्यात काय व्हायचं याचा निर्णय घ्यायची वेळ तुमच्यावर येणार, म्हणून एक आठवण करून देतो. दरवर्षी आपल्या शाळेत शिक्षक दिन साजरा होतो. त्यात प्रत्येकाला मुख्याध्यापक तरी व्हायचं असतं नाहीतर शिक्षक तरी; पण शिपाई व्हायची इच्छा फार कमी मुलांची असते. तुम्ही शिपाई व्हायलाच पाहिजे असं नाही; पण शिपाई होऊन सुद्धा चांगलं काम करता येऊ शकतं, आपण कौतुकास पात्र होऊ शकतो या गोष्टीवर तुमचा विश्वास नाही का? मला एकच गोष्ट माहीत आहे कोणतंही काम केलं, तरी ते असं करायचं, की लोकांनी नाव घेतलं पाहिजे. काम छोटं नसतं. आता चार्जरच बघा. चार्जर नसला तर मोबाईलचा काही उपयोग आहे का? डॉक्टर एवढीच नर्सपण महत्त्वाची असते. तुम्ही बघा क्रिकेटचा कॅप्टन विराट कोहली असो किंवा धोनी, त्याला मैदानावरच्या खेळपट्टीची काळजी घेणाऱ्याचं महत्त्व जास्त असतं. कारण सामन्याचा निर्णय ठरवण्यात खेळपट्टीचा खूप मोठा वाटा असतो. समुद्रकिनारी वाळूत शिल्प बनवणारे ओरिसाचे

सुदर्शन पटनायक पूर्ण देशात प्रसिद्ध आहेत. लग्नाच्या मांडवात बसून खूप लोक सनई वाजवताना दिसतात; पण बिस्मिल्लाह खान सनई एवढ्या मन लावून वाजवायचे, की त्यामुळे ते जगभर लोकप्रिय झाले. तुम्ही कोणती गोष्ट करता हे महत्त्वाचं नाही, तर तुम्ही ती गोष्ट किती मन लावून करता हे जास्त महत्त्वाचं आहे. हे मला पटलंय म्हणून आपल्या ग्रंथालयात एकाही पुस्तकावर तुम्हांला धूळ दिसणार नाही, कारण मी तिथे काम करतो. तुम्ही असंच काही काम करा असं म्हणणं नाही माझं; पण तुम्ही जे कराल ते जगात सर्वोत्तम असलं पाहिजे असं मला वाटतं.

मला माहितेय तुम्हांला सगळ्यांना डॉक्टर नाहीतर इंजिनियर व्हायचंय; पण कधी कधी मला वाटतं, की सगळेच डॉक्टर झाले तर पेशंट कोण उरणार जगात? का सगळेच एकमेकांना इंजेक्शन देत बसणार? पर्याय नाही म्हणून दुसरं काहीतरी काम करतात खूपजण; पण तुम्ही काहीतरी वेगळं केलं पाहिजे असं मला वाटतं. मी तुम्हांला फुलपाखरांच्या मागे पळताना पाहिलंय. तुमच्यापैकी एखाद्याने तरी फुलपाखरांच्या सुंदर आयुष्याचा अभ्यास केला पाहिजे. तुमच्या वर्गाच्या बाहेर मधमाश्यांचं मोहोळ होतं म्हणून खूप दिवस खिडकी बंद होती; पण आता खिडकी उघडा. त्या मधमाश्या नीट बघा. त्या जसं पोळं बनवतात ना तसं परफेक्ट घरसुद्धा बनवू शकत नाही आपण. त्या किती कष्ट करून मध गोळा करतात हे बघितलं तरी तुम्हांला कष्टाची किंमत आणि गंमतपण कळेल.

मुंबईत एक माणूस असा आहे जो दर आठवड्याला लोकांच्या घरी जातो. ओळख नसली तरी. आणि करतो काय तर फक्त लोकांच्या घरी बेसिनचा, बाथरूमचा नळ गळत तर नाही ना हे तपासतो. त्याच्या एकट्याच्या कामामुळे गेल्या काही वर्षांत लाखो लीटर पाणी वाचलंय, जे नळ खराब असल्यामुळे वाया जायचं. पाण्याचे वाया जाणारे थेंब वाचवणं हे दु:खी माणसाच्या डोळ्यांतलं पाणी पुसण्याएवढंच महत्त्वाचं काम आहे. एका मुलाने आपल्या वाढदिवसाचे पैसे वाचवून ठेवले आणि काय केलं माहितेय? झोपडपट्टीमधल्या मुलांना नाल्यावरून एका तुटक्या लाकडी पुलावरून जावं लागायचं. त्याने आपल्या वाढदिवसाच्या पैशांतून त्या मुलांसाठी पक्का पूल बनवण्यासाठी आपले पैसे दिले.

असं आपल्याभोवती करण्यासारखं खूप आहे. एका माणसाने दहा झाडं जरी लावली तरी या देशाचं चित्र बदलून जाईल. जगातला सगळ्यांत जास्त निसर्गसंपन्न देश होईल भारत, कारण आपल्या देशाची लोकसंख्या सव्वाशे कोटीपेक्षा जास्त आहे. गुणिले दहा झाडं, विचार करा. अडचण अशी आहे, की आपल्याला आता कार्टून्सची नावं जास्त पाठ आहेत; पण झाडांची नावं विचारली तर दहा झाडंसुद्धा माहीत नसतात. तेच पक्ष्यांच्या बाबतीत. कावळा, कबुतर, चिमणी आणि गरुड अशी काही नावं सोडली, तर आसपासचे पक्षीसुद्धा ओळखता येत नाहीत. फुलंसुद्धा पाच–सातच पाठ असतात. पुस्तकातल्या पानांत डोक्याचं खाद्य असतं. झाडाच्या पानांत झाड जगवण्याचं बळ असतं. दोन्ही पानं महत्त्वाची असतात. दोन्हीपण बघितली पाहिजेत प्रेमाने. माणसं कितीही मोठी झाली, तरी त्यांची सावली कुणाला कामी येत नाही; पण झाडं मोठी झाली, तर कित्येक पिढ्यांना त्यांची सावली उपयोगी असते. तुमच्या घरापुढे कोणती गाडी आहे याच्यापेक्षा तुमच्या घराभोवती किती झाडी आहे, हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्ही किती श्रीमंत आहात हे दाखवायचं असेल, तर गाडी आवश्यक आहे; पण तुमचा देश किती श्रीमंत आहे हे दाखवायचं असेल, तर झाडी खूप आवश्यक आहे. झाडांचं वेड असणारी लाखो मुलं गरजेची आहेत.

खूप पैसे कमवायचे आणि निसर्ग बघायला दुसऱ्या देशात जायचं स्वप्न असतं लोकांचं; पण आपल्या देशातला निसर्ग समृद्ध करणारी माणसं हवीत. तुमच्यापैकी खूप जण परदेशात जाणार आहात. तुमच्यापैकी एकजण तरी सवाई गंधर्व महोत्सवात गाताना दिसलं पाहिजे. परीक्षेत पहिले आलात तर शाळेच्या भिंतीवर तुमचं नाव असेल; पण तुमच्यापैकी एकानेतरी लिहिलेलं पुस्तक आपल्या शाळेच्या ग्रंथालयात दिसलं पाहिजे. तुम्ही जगातल्या मोठमोठ्या हॉटेलमध्ये जाणार आहात; पण तुमच्यापैकी एकाच्या तरी शेतात हुरडा खायला यायचंय मला. आपल्या पूर्वजांनी वेरूळ अजिंठा बनवलाय. जगभरचे लोक बघायला येतात. तुम्ही असंच नवीन काहीतरी भव्यदिव्य बनवून दाखवाल याची मला खात्री आहे.

मी एवढं सगळं सांगितलं, कारण मी तुम्हांला खूप जवळून पाहिलंय. तुमच्या शिक्षकांनी तुम्हांला वर्गात शिस्तीत बसलेलं बघितलंय; पण मी तुम्हांला मैदानात मनसोक्त गोंधळ घालताना बघितलंय. तुमचा गोंधळ बघून सगळे म्हणायचे

अशी पोरं आम्ही कुठं पाहिली नाहीत; पण मला राग आला नाही. तुम्ही मोठे झाल्यावर जग म्हणालं पाहिजे, की अशी पोरं आम्ही कुठं पाहिली नाहीत. मला आनंद होईल. फक्त तुम्ही आता आहात तसेच आनंदी रहा. जग विचारेल तुम्हांला, शाळेत तुम्हांला किती गुण मिळाले? पण मी सांगेन जगाला तुम्ही किती गुणी आहात. मी तुम्हांला वर्गाबाहेर पाहिलंय दंगामस्ती करताना, मैदानावर, स्नेहसंमेलनात, होस्टेलवर. असेच मनसोक्त जगा. हे क्षण पुन्हा मिळवता येणार नाहीत. हे गुण पुन्हा मिळवता येणार नाहीत. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना दहावीत किती गुण होते हे कुणाला माहीत नसतं; पण ते किती आदर्श व्यक्ती होते हे सगळ्या जगाला माहीत आहे. तुम्ही आयुष्य कसं जगता हे महत्त्वाचं आहे. तुम्ही जगाकडे कसं बघता हे महत्त्वाचं आहे. दहावीत कुणाचे गुण जास्त असणार कुणाचे कमी असणार; पण आयुष्यात तुम्ही जे काही कराल त्यात तुमच्यासारखेच तुम्ही असणार. मला विश्वास आहे. खूप खूप शुभेच्छा!

तुमचाच,
आप्पा

## कृती

**(१) कारणे लिहा.**

(अ) आजची मुले सुदैवी आहेत, कारण .................

(आ) पुस्तकाची पाने व झाडाची पाने दोन्ही महत्त्वाची असतात, कारण .................

**(२) आकृती पूर्ण करा.**

(अ) **पाठाच्या आधारे खालील व्यक्तींचे महत्त्व स्पष्ट करा.**

- खेळपट्टीची काळजी घेणारा
- नर्स
- शिपाई

(आ) **वृक्षसंवर्धनाचे फायदे**

- 
- 
- 
- 

**(३) योग्य पर्याय निवडा.**

(अ) आप्पांच्या मते चिंतेमुळे फक्त ____________

(१) हृदयाची धडधड वाढते.

(२) कपाळावरच्या आठ्या वाढतात.

(३) विद्यार्थ्यांचे गुण वाढतात.

(४) विचारप्रक्रियेतील आव्हान वाढते.

(आ) शिपाईसुद्धा कौतुकास पात्र ठरतो जेव्हा____________

(१) तो रोज उपस्थित असतो.

(२) तो सर्वांची काळजी घेतो.

(३) तो चांगलं काम करतो.

(४) तो सर्वांशी चांगले बोलतो.


**(४) आप्पांचे खालील गुण दर्शवणारी वाक्ये पाठातून शोधून लिहा.**

(अ) आप्पांचे शिक्षणप्रेम–

(आ) स्वच्छता–

**(५) चौकटी पूर्ण करा.**

**आप्पांनी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या भावी जीवनाबद्दल व्यक्त केलेल्या अपेक्षा**



**(६) खालील वाक्यांतील क्रियाविशेषणे ओळखा.**

(अ) ती लगबगीने घरी पोहोचली.

(आ) जोसेफ अवघड गणितदेखील सहज सोडवतो.

(इ) आज खूप कडाक्याचे ऊन पडले होते.

**(७) खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये शोधा.**

(अ) पक्ष्याने दाण्यांवर झडप घातली.

(आ) तिचा चेहरा सारखा डोळ्यांसमोर येतोय.

(इ) छोटा बाळ मुलांबरोबर खाऊ खात होता.

(ई) परीक्षेत सुयश मिळाल्यामुळे विद्यार्थी सुखावले.

**(८) स्वमत.**

(अ) 'पाण्याचे वाया जाणारे थेंब वाचवणं हे दु:खी माणसाच्या डोळ्यांतलं पाणी पुसण्याएवढंच महत्त्वाचं काम आहे', आप्पांच्या या विधानामागील अर्थ स्वत:च्या शब्दांत लिहा.

(आ) 'जग विचारेल तुम्हांला, शाळेत तुम्हांला किती गुण मिळाले? पण मी सांगेन जगाला तुम्ही किती गुणी आहात.' या वाक्यांतील अभिप्रेत अर्थ लिहा.

(इ) आप्पांनी तुमच्याविषयीच्या व्यक्त केलेल्या अपेक्षा तुमच्या शब्दांत लिहा. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तुम्ही काय कराल ते लिहा.

**उपक्रम :**

(१) फुलपाखराच्या सुंदर जीवनाबद्दलची माहिती मिळवून मानवी जीवन व फुलपाखराचे जीवन यांची तुलना करा.

(२) तुमच्या शाळेतील वेगवेगळ्या कलांमध्ये प्रावीण्य मिळवणाऱ्या कोणत्याही दोन विद्यार्थ्यांची मुलाखत घ्या.

DBH4JG

## ✿ मनक्या पेरेन लागा (स्थूलवाचन)

**वीरा राठोड** (१९८०) :

आधुनिक काळातील कवी. 'सेन सायी वेस', ही बंजारा भाषेतील प्रार्थना व 'पिढी घडायेरी वाते' हा बंजारा बोलीभाषेतील कवितासंग्रह प्रकाशित. त्यांच्या पहिल्याच कवितासंग्रहाला दिल्लीच्या भारतीय साहित्य अकादमीचा 'राष्ट्रीय साहित्य अकादमी युवा पुरस्कार २०१५' मिळाला आहे. सामाजिक कार्यात सहभागी होऊन मानवतावादी दृष्टीने भटके, विमुक्त, वंचित, दलित यांच्या प्रश्नांवर त्यांनी लेखन केले आहे.

त्यांच्या बंजारा भाषेतील 'मनक्या पेरेन लागा' या कवितेचे विनायक पवार यांनी मराठी भाषेत रूपांतर केले आहे. कवीला व्यक्त होताना भाषेचा अडसर नसतो. बी मातीत पडून तिचं झाड होईपर्यंतचा प्रवास सांगताना, 'माणसं पेरायला हवीत', हा विचार कवितेतून व्यक्त झाला आहे. कवी अभिव्यक्त होत असताना त्याच्या कवीमनावर झालेले भाषिक संस्कार व त्याची उपजत प्रतिभा यांचा कस लागत असतो.

विद्यार्थ्यांनी आपापल्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या भाषेतून अभिव्यक्त होऊन सहज व सोप्या पद्धतीने एखाद्या विषयाची काव्यरूपात गुंफण करावी, या उद्देशानेच या कवितेचा समावेश करण्यात आला आहे.

### मनक्या पेरेन लागा

एक बी जमीम गडचं
जमीती ओरो नातो जुडचं
धुड वोनं लगाडछं जीव
आसो कांयी घडचं
पाणी-पावस
उंदाळो-वरसाळो
आंधी-आंघोळो
दुष्काळेती लडचं
एक दन वोनं झाड करनच छोडचं
चालो
आपणबी मनक्या पेरेन लाग जावा.

**- वीरा राठोड**

### माणसं पेरायला लागू

एक बी मातीत पडतं
मातीशी त्याचं
घट्ट घट्ट नातं जडतं
माती त्याला लावते जीव
अशी काय घडते
ऊन-वारा
पाऊस-पाणी
वारं-वावधान
दुष्काळाशी लढते
एक दिवस त्याला
झाड करूनच सोडते
चला आपणही
माणसं पेरायला लागू.

**- विनायक पवार**

(पिढी घडायेरी वाते)

## कृती

**(१) खालील संकल्पनांमधील सहसंबंध स्पष्ट करा.**

**सहसंबंध स्पष्ट करा**

- 'बी'चे झाड होणे
- माणसाचे माणूसपण जागे होणे

**(२) 'माणसं पेरायला लागू' या शीर्षकातून कवीला अभिप्रेत असलेला भावार्थ उलगडून दाखवा.**

**(३) 'माणसे पेरा । माणुसकी उगवेल' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

**(४) 'माणुसकी पेरणे काळाची गरज' या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

**उपक्रम :** वरील कविता तुमच्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या भाषेत/बोलीभाषेत (उदा., पावरी, गोंडी, कोरकू, वारली, वऱ्हाडी, अहिराणी, मालवणी इत्यादी.) रूपांतरित करा व तिचा आस्वाद घ्या.

### वाचा

#### विचारांचं संतुलन हवं!

माणसाचं मन एक अजब यंत्रणा आहे. अनेक परस्परविरोधी भावना आणि विचारप्रवाह तिथे वास करत असतात, पण बहुतेक वेळा आपण नकारात्मक भावना आणि छळवादी विचारांच्या अमलाखाली वावरतो. त्यामुळे आपण निष्क्रिय तरी होतो किंवा हातून चांगलं काम घडत असलं तरी त्यातून आनंद, आत्मविश्वास आणि समाधान मिळत नाही. अशा नकारात्मक भावना व विचार मनातून नष्ट व्हावेत. अशी इच्छा बाळगून वावरतो. ते शक्य असतं का?

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्यामुळे होकारात्मक आणि सृजनात्मक विचार झाले तरी त्यांना विरुद्ध बाजूही असतेच. त्याचप्रमाणे नकारात्मक विचार व भावना यांचादेखील काही उपयोग होतच असतो. तो उपयोग करून घेणं हे आपलं कौशल्य आणि हुशारी, हे लक्षात ठेवायला हवं, म्हणून तर अशा परस्परविरोधी भावना व विचार मनात वावरतात. त्या नकारात्मक गोष्टींनी गांगरून जाण्याचं जरासुद्धा कारण नाही. त्यांचं संतुलन राखणं महत्त्वाचं.

ज्याप्रमाणे चार चाकी गाडीत ब्रेक व ॲक्सिलेटर म्हणजे वेगनियंत्रक व प्रवर्तक असतात. त्याप्रमाणे मनाला वेगानं पुढे नेणारे होकारात्मक विचार आणि प्रगतीला रोखणारे नकारात्मक विचार असतात. गाडीच्या सुरक्षिततेसाठी ब्रेकची आवश्यकता भासते म्हणून ते असतात. त्यांना भिण्याचं काहीच कारण नाही. त्याप्रमाणे मनात नकारात्मक विचार येतात. त्यांच्या मदतीने सावधगिरी कशी व कुठे बाळगायची याचं स्पष्ट भान निर्माण होतं आणि चुकीच्या निर्णयांनादेखील आळा बसतो. अर्थात नुसताच ब्रेक दाबला तर गाडी सुरूही होणार नाही आणि वेगदेखील घेणार नाही. म्हणूनच सतत आपल्या विचारांचं संतुलन असणं आवश्यक आहे.

(गंमत शब्दांची– डॉ. द. दि. पुंडे)

❀❀❀

# ११. गोष्ट अरुणिमाची

**सुप्रिया खोत (१९८०) :**

प्रसिद्ध लेखिका. विविध वृत्तपत्रांतून व मासिकांतून लेखन. महाराष्ट्र टाइम्स, पुढारी, कृषीवल यांसारख्या विविध वृत्तपत्रांमधून सदर लेखन. छात्र प्रबोधन, पुणे येथे साहाय्यक संपादिका म्हणून काही काळ कार्यरत.

जिद्द, चिकाटी, दुर्दम्य महत्वाकांक्षा, प्रयत्नवाद याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'अरुणिमा'! अपघातामुळे अपंगत्व आलेल्या अरुणिमाने आयुष्यात हार तर मानली नाहीच उलट ध्येयाचे उंच शिखर गाठण्यासाठी ती सज्ज झाली. 'एव्हरेस्ट गाठणे' हे भल्याभल्याचे स्वप्न असते; पण सकारात्मक दृष्टीने अरुणिमाने हे स्वप्न सत्यात उतरवले.

या पाठात अरुणिमा स्वत:वर आलेल्या संकटात तिला गमवाव्या लागणाऱ्या पायांसाठी सहानुभूतीची अपेक्षा करताना दिसत नाही, तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ध्येय गाठण्याचा आदर्श तुमच्यासमोर ठेवते, किंबहुना आपल्या प्रत्येकात एक 'जिद्दी अरुणिमा' असते. तुमच्यातल्या अरुणिमाचा शोध घ्या. ध्येय साध्य करताना आलेली निष्फळता म्हणजे अपयश नव्हे, तर कमकुवत ध्येय म्हणजे अपयश, हे कायम लक्षात ठेवा असे अरुणिमा सांगते.



दोस्तांनो, मी.. अरुणिमा सिन्हा! आज तुम्ही गुगलवर शोधले तर 'माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली अपंग महिला आणि माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली अपंग भारतीय' असा उल्लेख जिचा दिसतो तीच मी! पण एक सांगू? मी काही जन्मजात अपंग वगैरे नाही...नव्हते.. धडधाकट असल्यापासूनची गोष्ट आज मी सांगणारेय तुम्हांला...

लखनऊपासून २०० किमी. अंतरावर असणारं आंबेडकरनगर हे माझं गाव. घरी मी, आई, लहान भाऊ. मोठ्या बहिणीचं लग्न झालेलं. माझे वडील मी लहान असतानाच देवाघरी गेले. आता भाईसाब (मोठ्या बहिणीचे पती) हेच काय ते आमच्या कुटुंबातले महत्त्वाचे निर्णय घेणारे. खेळांवर अतोनात प्रेम करणाऱ्या कुटुंबात मी जन्मले हे माझे अहोभाग्य; पण फुटबॉल आणि व्हॉलीबॉलची नॅशनल चॅम्पियनशिप मिळाल्यावर 'आता सीआयएसएफ (CISF) ची नोकरी मिळते का बघ, म्हणजे खेळाशी जोडलेली राहशील', हा भाईसाबनी दिलेला सल्ला मी शिरोधार्य मानला. त्यानुसार नोकरीसाठी अर्ज केला नि 'कॉल लेटर' आले देखील; पण फॉर्ममध्ये नेमकी माझी जन्मतारीखच चुकवलेली होती. हा घोळ निस्तरण्यासाठी दिल्लीला जाणे भाग होते.

११ एप्रिल, २०११ चा हा दिवस. लखनऊ स्टेशन गर्दीनं फुललेलं. पद्मावती एक्सप्रेसमध्ये कसेबसे चढत गर्दीतून मुसंडी मारत शिताफीने मी कॉर्नर सीट पटकावली. गाडीने वेग घेतला आणि माझे विचारचक्र सुरू झाले. 'बस...एवढे कागदपत्रांचे काम झाले, की झालेच आपले पक्के.' अचानक माझे लक्ष वेधून घेतले ते मला घेरून उभ्या असणाऱ्या तरुणांनी. त्यांचे लक्ष माझ्या गळ्यातल्या सोन्याच्या चेनवर होते; पण मीही काही कच्च्या गुरूची चेली नव्हते. त्यांनी डाव साधण्याचा प्रयत्न करताच जेवढी होती नव्हती तेवढी ताकद एकवटून मी माझ्याजवळ येणाऱ्या प्रत्येकाला लाथाबुक्क्यांचा प्रसाद द्यायला सुरुवात केली. आश्चर्य म्हणजे, त्या डब्यातला प्रत्येकजण 'अन्यायाविरुद्ध लढणं हे जणू पाप आहे', अशा चेहऱ्यानं मख्खपणे जागेवरच बसून राहिला. अखेर चोरांच्या सहनशक्तीचा अंत झाला. रात्रीच्या भयाण अंधारात माझे दोन्ही हात-पाय धरून त्या नराधमांनी मला चक्क चालत्या गाडीतून बाहेर फेकून दिलं. शेजारून जाणाऱ्या एका भरधाव रेल्वेवर मी आदळले आणि तिच्या वेगामुळे आणखी जोरात दोन धावपट्ट्यांच्या मध्ये उडून पडले. 'अरुणिमा, रेल्वे येतेय आणि तुझे पाय ट्रॅकवरून बाजूला घे', हा अंतर्मनातला संदेश मेंदूपर्यंत पोचेतोवर खूप उशीर झाला होता. त्याआधीच एक रेल्वे माझ्या पायांवरून धडधडत निघून गेली. नंतर महिला आयोगाने प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टनुसार, तब्बल ४९ रेल्वेगाड्या त्या रात्री माझ्या पायावरून गेल्या...एका पायाच्या गुडघ्यापासून खालच्या हाडांचा तर चक्काचूर झालाच होता; पण दुसऱ्या पायाचीही दुरवस्था झालेली.

त्या रात्री तब्बल सात तास, रेल्वेच्या धावपट्टीवर मदतीची याचना करत मी पडून राहिले. आश्चर्य म्हणजे माझी शुद्‌ध हरपली नव्हती आणि मेंदू पूर्ण तल्लखपणे तिथून सुटकेचा विचार करत होता...सगळीकडे उजाडलं आणि रेल्वेचे सफाई कामगार तिथे आले. हादरलेच ते मला तशा अवस्थेत पाहून. त्यांनी मला बरेली गावातील हॉस्पिटलमध्ये दाखल केलं आणि सुरू झाले दुर्दैवाचे दशावतार.

बरेलीच्या त्या हॉस्पिटलमध्ये ना भूलतज्ज्ञ होता ना मला देण्यासाठी पुरेसे रक्त. सचिंत झालेल्या डॉक्टर व सहकाऱ्यांना मीच धीर दिला, 'डॉक्टर, नाहीतरी माझ्या पायाची चाळण झालेलीच आहे. आता भूल न देताच तुम्ही तो कापलात तरी चालेल.' डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वत:चे एक युनिट रक्त मला दिले आणि माझ्यादेखतच माझा पाय कापला गेला.

इकडे मी जीवनमरणाच्या सीमारेषेवर होते; पण हॉस्पिटलबाहेरच्या जगात एक वेगळेच नाट्य घडत होते. 'फुटबॉल आणि व्हॉलीबॉल चॅम्पियन युवती सात तास जखमी अवस्थेत उपचाराविना पडून राहिली' ही बातमी प्रसारमाध्यमांनी उचलून धरलेली. तत्कालीन क्रीडामंत्र्यांनी मला दिल्लीच्या 'एम्स'मध्ये (AIIMS) हलवले, राष्ट्रीय खेळाडू असल्याने अत्युच्च दर्जाच्या सुविधा मला मिळाल्या...पण...पण शल्य एकच होतं, की प्रसारमाध्यमांमध्ये वाटेल त्या वावड्या उठत होत्या. 'अरुणिमाकडे प्रवासाचं तिकीट नव्हतं म्हणून तिने रेल्वेतून खाली उडी मारली' इथपासून ते 'अरुणिमाने आत्महत्येचा प्रयत्न केला', इथपर्यंत काहीही छापून येत होतं. तब्बल चार महिने 'एम्स'मध्ये (AIIMS) राहिल्यानंतर, शारीरिक जखमांवर मलमपट्टी झाली होती; पण या मानसिक जखमांचे घाव अंतरंग घायाळ करणारे होते. मी नि माझं ढालीप्रमाणं रक्षण करणारं कुटुंब-आम्ही सत्य परिस्थिती ओरडून सांगत होतो; पण ती ऐकण्यासाठी ना कुणाला वेळ होता ना रस.

त्याच दिवशी, हॉस्पिटलमध्ये पडल्या पडल्या मी निर्धार केला, 'जे आज बोलत आहेत, माझ्याकडे बोटे दाखवत आहेत त्यांना बोलू दे; पण एक दिवस नक्की माझा असेल, जेव्हा ही अरुणिमा एव्हरेस्ट सर करेल!' विश्वास ठेवा-कोणाच्याही प्रभावाखाली वा भावनेच्या आहारी जाऊन मी हा निर्णय घेतलेला नव्हता. एका फटक्यात माझं शरीर अपंग झालं होतं; पण माझं मन थोडंच अपंग होतं? गगनभरारी घ्यायचं वेड रक्तातच असावं लागतं...जेव्हा आपण आपल्या मनाने एखादी गोष्ट ठरवतो तेव्हा आपलं संपूर्ण शरीर आपल्याला साथ देतं. एक सांगू? आपला सर्वांत मोठा मोटिव्हेटर कोण असतो? तो दुसरा तिसरा कोणी नसून आपण स्वत:च असतो. आता उठता-बसता, खाता-पिता केवळ आणि केवळ मी एव्हरेस्टचाच विचार करू लागले होते.

माझ्या, एव्हरेस्ट सर करण्याच्या निर्धाराचा जेव्हा मी उच्चार केला तेव्हा अगदी टोकाच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. 'शरीराला जखमा झाल्यामुळे बहुधा अरुणिमाच्या डोक्यावरही परिणाम झालेला दिसतोय.' अर्थातच लोकांनी माझं बोलणं हसण्यावारी नेलं; पण माझं कुटुंब आणि भाईसाब माझ्याबरोबर खंबीरपणे उभे राहिले. एक अवघड पण मला 'शक्य आहे' असं वाटणारा प्रवास आता सुरू होणार होता.

पहिला टप्पा होता गिर्यारोहण प्रशिक्षणाचा. 'एम्स'मधून डिस्चार्ज मिळाला. साधारणपणे एखादा हात/पाय कापावा लागलेले पेशंटस दिवसेंदिवस अगदी महिनोन् महिने उठत नाहीत. मी दोनच दिवसांत उभी राहिले. एका पायात घोट्याची हाडे तुटल्याने रॉड घातलेला, ज्याच्या हाडांची जुळणी अजून पुरी व्हायची होती. दुसरा पाय म्हणजे मांडीपासून खाली कृत्रिम पाय बसवलेला. असा माझा अवतार नि जोडीला भाईसाब-आम्ही पोचलो ते थेट बचेंद्री पाल यांच्याकडे. बचेंद्रीजी म्हणजे एव्हरेस्ट सर करणारी पहिली महिला. त्याच एकमेव अशा होत्या, की ज्यांनी माझ्या ध्येयाचा आदर केला, मला प्रोत्साहन दिलं. त्या म्हणाल्या, ''अरुणिमा, तू अशा परिस्थितीत इतका मोठा निर्णय घेतलास...तुला ठाऊक आहे, तुझ्या आतलं एव्हरेस्ट तू केव्हाच सर केलं आहेस. आता तुला एव्हरेस्ट सर करायचं आहे ते फक्त स्वत:ला सिद्‌ध करायला, जगाला तू कोण आहेस हे दाखवून द्यायला...!''

'नेहरू गिरिभ्रमण प्रशिक्षण केंद्र' बहुधा आशिया खंडातील सर्वोत्तम असावं. इथे माझे दीड वर्षांसाठी खडतर प्रशिक्षण सुरू झाले. छोटे पण बऱ्यापैकी धोकादायक पर्वत चढणे, जवळपास मरणप्राय कठीण अनुभव, ध्येयापासून विचलित करू पाहणारे कष्टदायी प्रशिक्षण यांतून मी तावून सुलाखून निघत होते.

या प्रशिक्षणाच्या वेळी काही गोष्टी ठळकपणाने लक्षात आल्या. सरावाच्या वेळी चढाई करताना, माझ्या कृत्रिम पायाची टाच व चवडा ज्या वेळी मी जमिनीत रुतवत असे त्या वेळी ते सतत गोल फिरत त्यामुळे तो पाय घट्ट रोवणे कठीण

होऊन बसे. उजव्या पायाची हाडे एकत्रित राहण्यासाठी त्यात स्टीलचा रॉड घातलेला होता, त्यावर थोडा जरी दाब दिला गेला तर तीव्र वेदनांचे झटके बसत. माझ्या 'अशा' अवस्थेमुळे प्रथम माझ्यासोबत माझा शेरपा यायला तयारच होईना. साहजिक आहे, जिथे अव्यंग, धडधाकट माणसे गिरिभ्रमण करण्यास धजत नाहीत तिथे माझी काय कथा? पण माझ्या घरच्या लोकांनी माझ्या शेरपाचे मन वळवले आणि मग तिथून पुढे सुरू झाली क्षणोक्षणी आव्हानांना भिडणारी जोशपूर्ण अशी ५२ दिवसांची एक रोमांचकारी लढाई!'

प्रत्येक गिर्यारोहकाला शिखरापर्यंत पोहोचण्याआधी चार बेसकॅम्प्स करावे लागतात. एकदा का तुम्ही 'कॅम्प चार'ला पोहोचलात, की तिथून शिखर ३५०० फुटांवर आहे; पण जास्तीत जास्त मृत्यू याच टप्प्यात होतात म्हणून याला 'डेथ झोन' म्हटले जाते. मला तुम्हांला सांगावंसं वाटतं, की चौथ्या बेसकॅम्पला पोहोचेपर्यंतही आधीच्या कॅम्पसमध्ये मी माझ्या सहकारी गिर्यारोहकांमध्ये नेहमीच पुढे असे. इतकी पुढे, की लोक विचारत, 'मॅडम, हर बार आप हमसे आगे रहते हो! आखिर खाते क्या हो भई?' मी अपंग, त्यात मुलगी, म्हणून कसल्याही प्रकारची सवलत किंवा सहानुभूती नको होती मला...कदाचित याच विचाराचं प्रतिबिंब माझ्या कृतीतून उमटत होतं...

'डेथ झोन'ची चढाई सुरू झाली...जिकडे तिकडे मृतदेहांचा खच पडलेला, हाडं गोठवणारी थंडी, मृत्यूचं जवळून दर्शन होत होतं. मला आदल्या रात्री भेटलेला बांग्लादेशी गिर्यारोहक मृत्युमुखी पडलेला दिसला...पोटातून उसळून वर येणाऱ्या भीतीला मी आवर घालत होते. 'तुला मरायचं नाहीये, अरुणिमा', अंतर्मनाला वारंवार मी हेच बजावत होते. खरं सांगते, आपलं मन जसं सांगतं, तसंच, अगदी तसंच आपलं शरीर वागतं.

२१ मे, २०१३ ला चढाईचा अगदी शेवटला टप्पा आला. 'अरुणिमा, तुझा ऑक्सिजनचा साठा अतिशय कमी झालाय, आत्ताच मागे फिर...एव्हरेस्ट तू पुन्हा चढू शकशील!' शेरपा कळकळीने बजावत होता; पण अंतर्मनात कुठेतरी मला ठाऊक होतं की Now or never! आता अगदी या क्षणी जर मी एव्हरेस्ट सर केलं नाही, तर माझ्या लेखी माझ्या शरीराने मृत्यूला कवटाळण्यासारखेच होते ना. शिवाय, पुन्हा एकदा इतकी सगळी स्पॉन्सरशिप उभी करणं या अग्निदिव्याला तोंड द्यावं लागलंच असतं. अखेर मी एव्हरेस्ट शिखरावर पोहोचले. हा ऐतिहासिक क्षण कॅमेऱ्यात साठवण्याची मी शेरपाला विनंती केली. फोटोसाठी माझा शेवटचा साठा उरलेला ऑक्सिजन मास्क मी काढला..मी अशी नि तशी मरणारच होते तर मग माझ्या यशाचे पुरावे असणं अत्यावश्यक होतं. फोटोनंतर शेरपाला मी व्हिडिओ क्लिप घेण्यासाठी तयार केलं. आधीच पित्त खवळलेल्या शेरपाने चिडत चिडत का असेना पण व्हिडिओ घेतला...अखेर मी भारताचा ध्वज एव्हरेस्टवर फडकवला.

आता मी उतरू लागले होते. जेमतेम ४०-५० पावलांवरच माझा ऑक्सिजन साठा संपला...एक सांगू? लक, भाग्य, किस्मत, डेस्टिनी असल्या भाकड शब्दांना मी नाही मानत; पण Fortune favours the braves यावर माझा पूर्ण विश्वास आहे...जेव्हा मी गुदमरू लागले, श्वास घेण्याचा प्रयत्न करू लागले, अगदी त्याच वेळी एका ब्रिटिश माणसाने ओझे होते म्हणून फेकून दिलेला जास्तीचा एक ऑक्सिजन सिलिंडर आम्हांला दिसला. माझ्या शेरपाने तो चटकन मला अडकवला. सावकाश आम्ही त्या 'डेथ झोन'मधून सहीसलामत खाली उतरलो. वर चढण्यापेक्षा खाली उतरताना होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे...आणि आम्ही ते ओलांडून आलो होतो. 'माझा दिवस' अखेर आला होता...गिर्यारोहकांच्या चढाईच्या टप्प्यातले एक महत्त्वाचे शिखर 'एव्हरेस्ट' मी सर केले होते!

गिर्यारोहणाने मला खूप महत्त्वाचे काही धडे दिले. माझ्यात आत्मविश्वास जागवला. नेतृत्व, गटबांधणी यांचे धडे तर मिळालेच; पण एक पोलादी कणखरपणा माझ्यात निर्माण केला. मित्रांनो, आपण आयुष्यात काय मिळवतो हे महत्त्वाचं नाही, तर ही कमाई आपल्याला अधिक चांगली व्यक्ती कशी बनवते, हे महत्त्वाचं वाटतं मला. आपण इतरांशी कसे वागतो यावरून आपण एक उत्तम व्यक्ती आहोत की नाहीत हे ठरतं.

तुम्हां कुमार वयोगटांतल्या मुलामुलींना एक सांगावंसं वाटतं, की आपलं ध्येय साध्य करताना प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नसतं, तर जेव्हा ध्येयच कमकुवत असतं, तेव्हा त्याला अपयश म्हटलं जातं.

(छात्र प्रबोधन, मार्च २०१६)

## कृती

**(१) आकृती पूर्ण करा.**

अरुणिमाचा ध्येयवादी दृष्टिकोन स्पष्ट करणाऱ्या कृती

**(२) खालील कृतींतून अभिव्यक्त होणारे अरुणिमाचे गुण लिहा.**

(अ) भाईसाब यांनी दिलेला सल्ला शिरोधार्य मानला.

(आ) चोरांना लाथाबुक्क्यांचा प्रसाद दिला.

(इ) उठता-बसता, खाता-पिता केवळ एव्हरेस्टचाच विचार ती करू लागली होती.

(ई) ब्रिटिश माणसाने ओझे होते म्हणून फेकून दिलेला ऑक्सिजन सिलेंडर अरुणिमाने वापरला.

**(३) कोण ते लिहा.**

(अ) एव्हरेस्ट सर करणारी पहिली महिला-

(आ) सर्वांत मोठा मोटिव्हेटर-

(इ) अरुणिमाच्या कुटुंबातील महत्त्वाचे निर्णय घेणारे-

(ई) फुटबॉल आणि व्हॉलीबॉलची नॅशनल चॅम्पियन-

**(४) अरुणिमाच्या कणखर/धाडसी मनाची साक्ष देणारी वाक्ये पाठातून शोधून लिहा.**

**(५) अरुणिमाविषयी उठलेल्या खालील अफवांबाबत तुमची प्रतिक्रिया लिहा.**

(अ) शरीराला जखमा झाल्यामुळे बहुधा अरुणिमाच्या डोक्यावरही परिणाम झालेला दिसतोय.

(आ) अरुणिमाकडे प्रवासाचे तिकीट नव्हते म्हणून तिने रेल्वेतून उडी मारली.

**(६) पाठातून तुम्हांला जाणवलेली अरुणिमाची स्वभाववैशिष्ट्ये लिहा.**

**(७) पाठात आलेल्या इंग्रजी शब्दांना प्रचलित मराठी शब्द लिहा.**

(१) नॅशनल

(२) स्पॉन्सरशिप

(३) डेस्टिनी

(४) कॅम्प

(५) डिस्चार्ज

(६) हॉस्पिटल

**(८) पाठात आलेल्या खालील वाक्यांचे मराठीत भाषांतर करा.**

(१) Now or never!

(२) Fortune favours the braves

**(९) 'नेहरू गिरिभ्रमण प्रशिक्षण केंद्रा'तील अरुणिमाचे खडतर अनुभव लिहा.**

(अ) ______________________________

(आ) ______________________________

(इ) ______________________________

(ई) ______________________________

**(१०) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून, अर्थ न बदलता वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) प्रत्येक व्यक्तीत काही ना काही गुण असतोच.

(आ) सूर्योदयाचे वेळी सूर्याची विविध रूपे अनुभवता येतात.

(इ) खालील प्रश्नांची उत्तरे संक्षिप्त असावीत.

(ई) प्रयत्नाने बिकट वाट पार करता येते.

**(११) खालील वाक्यांतील क्रियापदे ओळखा.**

(अ) सायरा आज खूप खूश होती.

(आ) अनुजाने सुटकेचा नि:श्वास टाकला.

(इ) मित्राने दिलेले गोष्टींचे पुस्तक अब्दुलला खूप आवडले.

(ई) जॉनला नवीन कल्पना सुचली.

**(१२) खालील तक्ता पूर्ण करा.**

| शब्द | मूळ शब्द | लिंग | वचन | सामान्य रूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) कागदपत्रांचे | | | | | | |
| (२) गळ्यात | | | | | | |
| (३) प्रसारमाध्यमांनी | | | | | | |
| (४) गिर्यारोहणाने | | | | | | |

**(१३) स्वमत.**

(अ) 'आपलं ध्येय साध्य करताना प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नसतं', या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

(आ) 'प्रत्येकामध्ये एक जिद्दी अरुणिमा असते', याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

(इ) तुमच्या मनातील एव्हरेस्ट शोधा आणि शब्दबद्ध करा.

**(टिपा –** • CISF – Central Industrial Security Force– केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल.
• AIIMS – All India Institute of Medical Sciences– अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान.**)**

DBQZL4

# अपठित गद्य आकलन

**(अ) उतारा वाचून दिलेल्या कृती करा.**

(१) खालील भाव व्यक्त करणारे वाक्य उताऱ्यातून शोधून लिहा.

(अ) वृक्ष बहरू लागले आहेत. ....................

(आ) नदी, नाल्यात भरपूर पाणी आहे. ....................

(२) स्पष्ट करा.

(अ) पाणी समजूतदार वाटते ....................

(आ) पाणी क्रूर वाटते ....................

वर्षाऋतूचा काळ आहे. आभाळ ढगांनी व्याप्त आहे. दिशा पाणावलेल्या आहेत. अधूनमधून पावसाच्या सरी कोसळताहेत. वृक्ष-पर्णांनी अंग धरले आहे. करंगळीची सोंड झाली आहे. उसळत घुसळत नवे पाणी फेसाळत चालले आहे. कुठे काठाला भिडले आहे, कुठे काठावर चढले आहे, कुठे संथ-गंभीर राहून दबदबा दाखवत आहे. भव्य, स्तब्ध पुलाच्या कमानीखालून जाणारे पाणी समजूतदार वाटते, शहाण्यासारखे वागते; पण तेच पुढे जाऊन काठावरची गरीब बिचारी खोपटी उद्ध्वस्त करून आपल्याबरोबर घेऊन जाताना क्रूर, अडाणी आणि उद्दाम वाटते. पुढे जाता जाता कुठे झाडावर चढते, कुठे गच्चीवर लोळते, कुठे घाट बुडवते तर कुठे वाट तुडवते. पाणी येते आणि जाते. एवढे उदंड येणारे पाणी लांब समुद्राच्या पोटात गुडुप्प होते. पाणी किती शहाणे असते! जोवर कोणी अडवत नाही, शेतमळे, बागा फुलवत नाही, रान-रान हसवत नाही तोवर पाण्याने तरी काय करावे? दरवर्षी वर्षाऋतूत यावे अन् वाहून जावे. पाण्याला जाता जाता कृतार्थ होऊन जावे, फुलवत-खुलवत, पिकवत जावे असे वाटल्याशिवाय का राहत असेल? पण पाण्याचे मन कोण जाणणार?

– राजा मंगळवेढेकर

**(आ) खालील आकृत्या पूर्ण करा.**

(१) **वर्षाऋतूतील निसर्गाचे रूप**



(२) **पुढे वाहता वाहता पाण्याकडून होणाऱ्या विविध क्रिया**



**(इ) तक्ता पूर्ण करा. खालील वाक्यांतील अधोरेखित अव्यये ओळखा व त्यांचा प्रकार लिहा.**

| वाक्य | अव्यय | अव्ययाचा प्रकार |
|---|---|---|
| (१) पाणी <u>कुठे</u> गच्ची<u>वर</u> लोळते. | ........ , ........ | ........ , ........ |
| (२) पाणी येते <u>आणि</u> जाते. | ................ | ................ |

- **उताऱ्यातून कळलेला 'पाण्याचा स्वभाव' तुमच्या शब्दांत लिहा.**
- **वर्षाऋतूतील पाणी निष्फळ वाहून जाऊ नये म्हणून माणसाने काय काय करायला हवे, याबाबत तुमचे विचार लिहा.**

# १२. भरतवाक्य

**मोरोपंत** (१७२९ ते १७९४) :

पंडित कवी. काव्य-नाटक-व्याकरण-अलंकारादी शिकून न्याय व वेदान्त यांचे अध्ययन. त्यांनी विपुल काव्यरचना केली आहे. २६८ काव्यकृती त्यांच्या नावावर आहेत. त्यांपैकी 'आर्याभारत', 'केकावलि', 'मंत्रभागवत', 'मंत्ररामायण', 'श्रीकृष्णविजय' व 'हरिवंश' या रचना प्रसिद्ध आहेत. त्यांनी संस्कृत काव्यरचनाही केली आहे. त्यांचे समग्र वाङ्मय 'कवीवर्य मोरापंतांचे समग्र ग्रंथ : खंड १ ते १२' यामध्ये संग्रहित करण्यात आले आहे.

मोरोपंतांनी या रचनेत सज्जन माणसांच्या सहवासाचे व सद्विचारांच्या श्रवणाचे महत्त्व यांकडे लक्ष वेधले आहे. खोटा अभिमान बाळगू नये, भक्तिमार्गाकडे वळताना कोणत्याही मोहाला बळी पडू नये असे आवाहन केले आहे. सत्कर्मात व सज्जनांच्या सहवासात राहण्याची शिकवण या पद्य रचनेतून दिली आहे.

सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रिकमळीं दडो; मुरडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो ।।

न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो; ।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।


मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली; ।
कृपा करिशि तूं जगत्त्रयनिवास दासावरी,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी ।।

(केकावलि)

## कृती

### (१) आकृती पूर्ण करा.

(अ)




(आ)




### (२) योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.

(अ) कवींच्या मते मनातील सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात म्हणून ____________

(१) सतत परमेश्वराच्या सान्निध्यात राहावे.

(२) सतत परमेश्वराचे नामस्मरण करावे.

(३) सतत आत्मबोध घ्यावा.

(४) चारधाम यात्रा करावी.

(आ) सदंघ्रिकमळीं दडो; म्हणजे ____________

(१) कमळाच्या फुलात चित्त सदैव गुंतो.

(२) कमळातून मधुसेवन करणाऱ्या भुंग्याप्रमाणे सज्जनांच्या पायाशी मन गुंतो.

(३) कमळाच्या व भ्रमराच्या सौंदर्यात मन गुंतो.

(४) कमळात मन लपून राहो.

### (३) खालील गोष्टींच्या बाबतीत कवी परमेश्वराजवळ कोणती विनंती करतात ते लिहा.

| गोष्टी | विनंती |
|---|---|
| (१) निश्चय | |
| (२) चित्त | |
| (३) दुरभिमान | |
| (४) मन | |

**(४) खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) मति सदुक्तमार्गीं वळो ________

(२) न निश्चय कधीं ढळो ________

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) 'सुसंगती सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;' या ओळींचे रसग्रहण करा.

(आ) 'स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(इ) सत्प्रवृत्त व्यक्तीची तुम्हांला जाणवलेली वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

(ई) वाईट गोष्टींचा मोह टाळण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ते लिहा.

(टिपा –
- संदघ्रिकमळीं – सत् + अंघ्रि + कमळी. अंघ्रि–पाय. सज्जनांच्या पदकमलाच्या ठिकाणी.
- भरतवाक्य– नाटकातील शेवटचे वाक्य. इथे, 'केकावलि' ग्रंथाच्या उपसंहारातील शेवटची पद्यरचना.)

DBZVMR

# १३. कर्ते सुधारक कर्वे

**डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे (१९५२) :**

प्रसिद्ध कवी आणि लेखक. 'एप्सिलॉन', 'ये, सखे, ये', 'स्वातंत्र्याचे मृत्युपत्र' हे कवितासंग्रह; 'राजा शहाजी' ही महाकादंबरी; 'शिवछत्रपती' ही पटकथात्मक कादंबरी; 'अरण्यकांड', 'प्रचारक', 'पंचमस्तंभ', 'जन्मभूमी', 'पाताळयंत्र' इत्यादी कादंबऱ्या; 'शून्यपूर्ण' हा एकांकिकासंग्रह असे चौफेरे लेखन प्रकाशित. महाराष्ट्राबाहेर बडोदा येथील प्रादेशिक साहित्य संमेलनाचे तसेच वणी येथील ६६ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

महर्षी कर्वे यांचे नाव समाजसेवक म्हणून चिरस्मरणीय आहे. कर्वे यांनी आपली सर्व कार्यशक्ती स्त्रीशिक्षणावर केंद्रित केली. 'महिला विद्यापीठ' ही कल्पना मूर्त रूपात साकार केली. समाजासाठी केलेल्या एकूण महान कार्यासाठी महर्षी धोंडो केशव कर्वे यांना १९५८ साली 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन भारत सरकारने त्यांच्या कार्याचा गौरव केला. प्रस्तुत पाठात लेखकाने महर्षी कर्वे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्यांचा परिचय करून दिला आहे.



रेडिओवर रात्रीच्या बातम्यांत आले होते, की भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे वयाच्या एकशे पाचाव्या वर्षी निधन झाले. माझ्या आजोबांचे डोळे टिचले. कळत्या वयात जाणवू लागले, की नातेवाईक नसलेले गृहस्थ एकशे पाचाव्या वर्षी जाऊनसुद्धा त्यांच्यासाठी डोळे भरून येत असतील, तर त्यांचे कार्य खूपच मोठे असले पाहिजे!

स्वातंत्र्यसमराच्या ऐन धुमाळीच्या काळात, म्हणजे १८ एप्रिल, १८५८ रोजी महर्षी कर्वे यांचा जन्म झाला. नंतर १५ ऑगस्ट, १९४७ रोजी राष्ट्रीय स्वातंत्र्यही त्यांच्या डोळ्यांदेखत कमावले गेले; पण स्वातंत्र्य केवळ राष्ट्रीय मिळून भागत नाही स्वातंत्र्य संपूर्णच हवे असते, हे त्यांना आधीपासून जाणवत होते. या देशातली स्त्री गुलाम आहे राष्ट्रीय स्वातंत्र्य कमावल्यावरसुद्धा ती गुलामच राहील, हे त्यांना दिसत होते. तिला स्वतंत्र व्हायचे असेल तर तिला भान यावयास हवे, की आपण गुलाम आहोत आणि हे भान शिक्षणाशिवाय येऊ शकत नाही. मात्र, खुद्द भारतीय स्त्रीवर संस्कारच असे होते, की ती आपल्या गुलामीला दागिना मानीत असे! आपल्या समाजात स्त्रीचे स्थान देवीचे आहे, असे भासवले जात असेलही; पण, तिला शूद्रातिशूद्र समजून तिचा प्रच्छन्न छळच केला जाई. सबब, तिने शिक्षित व्हायलाच पाहिजे, हे कर्व्यांना ठामपणे वाटत होते! तथापि, हे कार्य अतोनात कठीण आहे, हेही त्यांना दिसत होते. स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे, असे वाटणे म्हणजे खडकावर डोके आपटण्यासारखे होते. शांत सोशिकपणे, सहिष्णू वृत्तीने राहिलो तर हे असिधाराव्रत परिपूर्ण होऊ शकेल, याची त्यांनी खूणगाठ बांधली. सावकाश तरी हमखास हे कार्य करणे गरजेचे होते! नुसत्या अडीअडचणी येतील असे नव्हते. संपूर्ण समाजाविरूद्ध विद्रोह करावा लागणार होता. असे केले, तर समाज आपल्याला गिळून टाकायला येईल, हे कळत होते.

पंडिता रमाबाई यांचे जीवनचरित्र आणि ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे जीवनकार्य यांतून महर्षी कर्वे यांना हुरूप मिळाला. ईश्वरचंद्रांनी पोथ्यांचा पिट्ट्या पाडून विधवाविवाह होऊ शकतो, हे दाखवून दिले. स्वत: विधवेशी विवाह करून कर्व्यांनी त्याचा वस्तुपाठ घालून दिला. सुरुवात त्यांनी स्वत:पासून केली, म्हणून त्यांना बोलायची कोणास सोय उरली नाही. प्रा. धोंडो केशव कर्वे हे कॉलेजात गणित शिकवत. विद्वत्तेचा ते महामेरू होते. त्यामुळे त्यांच्याशी वाद घालायला कोणी धजले नाही. केवळ 'सत्पुरुषांचा छळ करावा', एवढेच 'ऐतिहासिक कार्य' तेव्हाच्या अज्ञ समाजाने केले. या समाजाबद्दल महर्षी अण्णासाहेब कर्वे अर्थातच क्षमाशील होते. त्यांना छळवादी समाजवृत्तीचा आधीपासूनच अंदाज होता. समाजाने केलेल्या धक्काबुक्कीत अण्णासाहेबांचे कपडे फाटत. रोज त्यांना आपला शर्ट नाही तर कोट, जिथे फाटला तिथे, शिवून घ्यावा लागत असे. फाटके कपडे ते वापरत नसत. गावातील सुशिक्षित समजल्या गेलेल्या लोकांनी ससेहोलपट चालवली तरी कर्व्यांनी ना त्यांना शिव्याशाप दिले ना आपल्या कार्यातून कर्वे विचलित झाले. जसे, संत ज्ञानेश्वरांचाही छळ झाला

होता; पण त्यांच्या साहित्यात ते कुठेही उमटले नाही, तसे! कर्व्यांचे आचरण ज्ञानेश्वरांच्या कवितेसारखेच राहिले.

महर्षी कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रमा'ची मुहूर्तमेढ रोवली. कालांतराने बालिकाश्रमाचे हिंगणा येथे स्थलांतर करून 'हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था' असे त्यांनी तिचे नामांतर केले. 'पै पै चा निधी' व 'मुरुड निधी' त्यांनी जमवला. त्यांच्यावर चाल करून येणाऱ्या समाजालाही या गोष्टीची पूर्ण कल्पना होती, की यांतील पै पै चा हिशोब कर्व्यांजवळ असणार आहे! कर्व्यांनी जमा केलेल्या निधीची उधळपट्टी तर केवळ असंभव! कर्वे स्वत: मोटार वापरत नसत. मैलोनगणती लांब असलेल्या आश्रमात ते पायी जात. समाजाचे पैसे वापरणे दूरच स्वत:चे पैसेसुद्धा ते समाजासाठी वापरतात, हे मात्र समाजाला माहीत होते. जेवढे खर्च घरात आवश्यक होते तेवढे, आपल्या कमाईतून, ते करत. उर्वरीत सर्व पैसा ते समाजकार्यात वापरत. ते स्वत:च्याच विश्वात वावरतात, अशी कुरबूर, घरच्यांच्या मनांत घर करून राहिली होती. वस्तुत: समाज सुस्वरूप करण्याची महर्षी कर्वे यांची जिद्द होती; पण त्या जिद्दीने कुटुंबाला कुठेही कुरूप केले नाही! नेमकेपणा हा गणिताचा गुणधर्म त्यांना तेथे उपयोगी पडला. ते बोलत नसत. विचार करत. विचार पक्का झाला, की आचरणात आणत. त्यांच्या कार्यातूनच लोकांना अंदाज येई, की त्यांच्या चित्तात काय चालले आहे! हे डावपेच नव्हते; उलटपक्षी, बोलके सुधारक असण्यापेक्षा कर्ते सुधारक असणे, हेच श्रेयस्कर असते!

महर्षी कर्वे यांजमध्ये स्थितप्रज्ञाची लक्षणे होती. जो स्वत:च्या सुखदु:खात अविचल राहातो; मात्र, दुसऱ्याच्या दु:खात दु:खी होतो, दुसऱ्याच्या सुखात सुखी होतो, तो खरा स्थितप्रज्ञ! महर्षी कर्वे यांचे लक्ष केवळ समाजसुधारणेत होते. त्यांना कुणावर ऋण ठेवायचे नव्हते तसेच त्यांना कुणाच्या ऋणातही राहायचे नव्हते. कर्व्यांना कुठे जेवावे लागले तर ते पैसे काढून ताटाशेजारी ठेवून उठत. आपल्यावर पैसे कोणाला खर्च करू देत नसत. इतरांना सहसा न साधणारे कार्य करायचे होते महर्षी कर्वे यांना!

भारताचे अर्धांग जे स्त्रिया; त्याच अनपढ राहिल्या तर देश अर्धांगवायू झालेल्या व्यक्तीसारखा होईल. एका बाजूला या देशाला आपण भारत'माता' म्हणतो; सरस्वतीला आपण वाङ्मयाची जननी मानतो आणि दुसरीकडे स्त्री निरक्षर अज्ञानी ठेवतो, हा चीड आणणारा विरोधाभास त्यांना घालवायचा होता. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी, जपानच्या धर्तीवर इ. स. १९१६ साली भारतातले पहिले महिला विद्यापीठ पाच स्त्रियांना दाखल करून स्थापन केले. आगबोटीने प्रवास करण्याच्या त्या जुन्या जमान्यात, महर्षी कर्व्यांनी जगप्रवास करून स्त्रीशिक्षणाचे माहात्म्य सर्वत्र बिंबवले. जगभर स्त्रीशिक्षणाबद्दल सभा केल्या. स्त्री ही स्वाभिमानी असली पाहिजे, ती शिकली पाहिजे, उच्चविद्याविभूषित होऊन पुरुषांशी स्पर्धा करू शकली पाहिजे, हे त्यांचे स्वप्न होते. त्यांत त्यांना दोन कार्ये करावयाची होती. एका टोकावर, स्त्री साक्षर करणे हे जटिल कार्य व दुसऱ्या टोकावर, तिला पुरुषांच्या बरोबरीने स्पर्धेत उतरवणे हे अटीतटीचे कार्य! पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांवरील पारतंत्र्याचे जोखड उखडून टाकावे हे महाकठीण काम होते. गुरुत्वाकर्षणाविरुद्ध पृथ्वीबाहेर पडणाऱ्या रॉकेटसारखीच क्षमता तेथे आवश्यक होती.

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातल्या शेरावली या गावी जन्मलेला हा मुलगा जन्मत:च महर्षी किंवा भारतरत्न म्हणून गणला गेला नाही. आपल्या जगत्या आयुष्यात, हालअपेष्टांची तमा न बाळगता, एखादा मनुष्य केवढे अलौकिक कार्य करू शकतो, त्याची मिसाल आहेत डॉ. धोंडो केशव कर्वे. लोकमानसाने त्यांना अभिमानाने महर्षी मानले. राजमानसाने १९५८ साली, 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने, डोक्यावर घेतले.

एकदा विद्यापीठातल्या कर्व्यांच्या पुतळ्यामागे एक मुलगी रडत बसली होती. केवढ्याने रागावलो मी तिला! मी तिला म्हटले, ''कर्व्यांच्या पुतळ्यापाशी बसून रडायला तुला काहीच कसे वाटत नाही? तू मुळीच रडू नये, यासाठीच कर्व्यांनी हे विद्यापीठ निर्माण केले ना!''

स्त्री शिक्षण होतच आहे. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या कर्तेपणाने एसएनडीटी महिला विद्यापीठ निर्माण झाले. महिला शिकतात; पण, जोवर पुरुष खऱ्या अर्थाने शिक्षित होत नाही तोवर स्त्रियांवरले अत्याचार थांबतील, असे वाटत नाही. परंपरागत संस्कारांमुळे कित्येक पुरुषांच्या हे ध्यानांतच येत नाही, की आपण आपल्या आईशी, बहिणीशी, बायकोशी, कन्येशी पुष्कळदा चुकीचे वागतो. स्त्री ही दुय्यम नागरिक किंवा वस्तू नाही. तिलाही तिची स्वप्ने, भावभावना,

आकांक्षा, विचार असतात. तिचे हे ‘अस्तित्व’ मानायला शिकवणे, म्हणजे ‘पुरुषशिक्षण’! पुरुष शिक्षित झाला, की त्याला स्त्रीस्वातंत्र्याचा अर्थ उमजेल.

पुरुषांचेही ‘शिक्षण’ झाले, की भारतरत्न महर्षी धोंडो केशव उपाख्य अण्णासाहेब कर्वे या कर्त्या सुधारकाने सुरू केलेले महान कार्य पूर्णत्वास जाईल. ... मग डोळे टिचणार नाहीत; तिथे हसू फुलेल!

## कृती

### (१) खालील आकृत्या पूर्ण करा.

(अ) महर्षी कर्वे यांना अपेक्षित असलेले स्वातंत्र्य प्रकार

(आ) महर्षी कर्वे स्त्री स्वातंत्र्याबद्दलचे विचार

(इ) महर्षी कर्वे यांची प्रेरणास्थाने

(ई) महर्षी कर्वे यांचे स्त्रियांबाबतची स्वप्ने

### (२) महर्षी कर्वे यांच्या कार्यकुशलतेचा ओघतक्ता तयार करा.

कार्यात नेमकेपणा होता.

↓ __________

↓ __________

↓ __________

विचार पक्का झाला की

↓ __________

↓ __________

### (३) हे केव्हा घडेल ते लिहा.

(अ) कर्त्या सुधारकाने सुरू केलेले कार्य पूर्णत्वास जाईल...........

(आ) स्त्री पुरुषांशी स्पर्धा करू शकेल...........

### (४) चौकटी पूर्ण करा.

(अ) लेखकांच्या मते दुसऱ्याच्या दु:खात दु:खी व सुखात सुखी होणारा–

(आ) कर्वे यांना लोकमानसाने दिलेली पदवी–

### (५) पाठाच्या आधारे वाक्यांचा उर्वरित भाग लिहून वाक्ये पूर्ण करा.

(अ) स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे म्हणजे–

(आ) समाजाविरूद्ध विद्रोह केला तर–

(इ) लोकांनी कर्वे यांची ससेहोलपट चालवली तरी–

**(६) 'कार्य' या शब्दासाठी पाठात आलेली विशेषणे शोधा.**

**(७) खालील वाक्यांतील वाक्प्रचार शोधा.**

(अ) शिक्षकांनी सांगितलेली हृद्य आठवण आमच्या मनात घर करून राहिली.

(आ) वक्त्याचे विचार अनेकांच्या पचनी पडले नाहीत.

**(८) खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये शोधून लिहा.**

(अ) त्याने लाडू व करंज्या खाल्ल्या.

(आ) पाऊस आला आणि गारा पडल्या.

(इ) तो येणार, कारण त्याला पैशांची गरज आहे.

(ई) आजी म्हणाली, की मी उद्या गावाला जाणार आहे.

**(९) केवलप्रयोगी अव्ययांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) ..............! काय सुंदर देखावा आहे हा!

(आ) ..............! असा प्रसंग वैऱ्यावर देखील येऊ नये.

(इ) ..............! तुझी कल्पनाच मुळी मला पसंत नाही.

(ई) ..............! आज तू खूप चांगला खेळलास.

**(१०) स्वमत.**

(अ) 'स्त्रियांनी शिकणे अत्यंत गरजेचे आहे', या विधानामागील अण्णांचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

(आ) 'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' हे वचन महर्षी कर्वे यांच्या जीवनाला कसे लागू पडते, ते स्पष्ट करा.

(इ) 'कर्ते सुधारक कर्वे' या पाठातून महर्षी अण्णा कर्वे यांचे तुम्हांला जाणवलेले वेगळेपण, तुमच्या शब्दांत सांगा.

DC9RPE

# १४. काळे केस

**ना. सी. फडके (१८९४ ते १९७८) :**

मराठीतील लोकप्रिय कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार. 'कलेकरिता कला' हा पक्ष सातत्याने मांडणारे समीक्षक. 'लघुनिबंध' किंवा 'गुजगोष्टी' या वाङ्‌मयप्रकाराचे आद्यप्रवर्तक म्हणूनही ते ओळखले जातात. वेधक व्यक्तिरेखाटन, संवादचातुर्य, रचनेच्या दृष्टीने बांधेसूदपणा, प्रसन्न, लालित्यपूर्ण भाषा, वाचकांशी चटकन संवाद साधण्याचे कौशल्य ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. त्यांचे 'दौलत', 'जादूगार', 'प्रवासी', 'अखेरचे बंड' इत्यादी शंभराहून अधिक कादंबऱ्या; 'गुजगोष्टी', 'धूम्रवलये' हे लघुनिबंधसंग्रह; 'प्रतिभासाधन', 'प्रतिभाविलास' हे लेखन प्रसिद्ध आहे. १९४० साली रत्नागिरी येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९६२ साली भारत सरकारने 'पद्‌मभूषण' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला आहे.

या लघुनिबंधात स्वत:च्या अजूनही काळ्या राहिलेल्या केसांच्या निमित्ताने लेखकाने आपल्या मनात येणारे विचार खुसखुशीत भाषेत प्रकट केले आहेत.

''तुमचे केस अजून काळे कसे राहिले आहेत?''

मला भेटावयास आलेल्या त्या गृहस्थांचा प्रश्न ऐकून मला आश्चर्य वाटलं नाही. या प्रश्नाची मला आता सवय झालेली आहे. कुठे परगावी व्याख्यानासाठी मी गेलो, की पूर्वी शाळेत अगर कॉलेजात माझ्याबरोबर असलेली व आता त्या गावी राहत असलेली जुन्या परिचयाची माणसं भेटायला येतात. जुन्या आठवणी निघतात. आता आपला तो हा कुठे असतो, अमका तो हा काय करतो, असल्या प्रश्नांची व उत्तरांची देवघेव होते. घड्याळाचे काटे मागे फिरवून कित्येक वर्षांपूर्वीचे दिवस उकरले जातात. मातीच्या ढिगात सुख-दु:खांचे माणिकमोती आढळतात. त्याकडे न्याहाळून पाहताना सुस्कारे सोडण्यात आल्हाद वाटतो. अशा गप्पा रंगात आल्या, की परस्परांच्या वयाचेही अंदाज पडताळले जातात आणि मग मला भेटावयास आलेला माणूस माझ्याकडे क्षणभर टक लावल्यासारखे करतो आणि विचारतो, ''तुमचे केस अजून काळे कसे राहिले आहेत?''

त्या प्रश्नातली गर्भित प्रशंसा उघड असते. स्तुती-निंदेची पर्वा न करणारा मी; पण ही तारीफ ऐकून मला बरे वाटते. मी हसतो व गप्प बसतो किंवा दुसरा विषय काढतो. प्रश्न विचारणाऱ्या माणसाला उत्तर हवंच असतं असंही नाही. तुमचे केस अजून काळे आहेत ही मोठी आश्चर्याची व भाग्याची गोष्ट आहे, एवढंच त्याला म्हणायचं असतं. तुमचं हे बोलणे ऐकून मला आनंद झाला एवढा अभिप्राय माझ्या हसण्यात व्यक्त झालेला असतो. त्याचा हेतू साधलेला असतो. माझं कर्तव्य मी केलेलं असतं. मी विषय बदलला तरी त्याची हरकत नसते.

पण एकदा एक गृहस्थ माझ्या खनपटीलाच बसले. ते म्हणाले, ''विषय नका बदलू. केस काळे राहावेत म्हणून तुम्ही काय युक्ती केलीत सांगा!'' मी त्यांच्याकडे आश्चर्याने पाहिलं. माझ्या मनात आलं, केसांच्या क्षुल्लक प्रश्नाचा तगादा लावून हा गृहस्थ मला केसभर विषयांतर करू देत नाही. हा काय चमत्कार? पण त्याच्या डोक्याकडे नीट निरखून पाहिल्यावर तो तसं का करत होता ते माझ्या डोक्यात आलं. वाढत्या वयाबरोबर डोक्यावर पसरू पाहणारा पांढरा रंग छपवण्यासाठी बाजारी कलप वापरणाऱ्या लोकांना पांढऱ्या केसांवर झाकण घालता येते; पण हलके पांढरं पडण्याची लागण केसात भलत्याच प्रमाणात होते, सारंच आभाळ फाटल्यासारखं होतं, कलपाची रंगपंचमी नित्यनेमाची होऊन बसते, माणूस कंटाळतो आणि मेहनत सुटली, की पैलवानांची पोटं जशी केविलवाणी होतात तशी त्यांच्या केसांची दुर्दशा होते. त्या केसांचा पांढरेपणा पुरता बुजलेला असतो, कलपाचा काळेपणा त्यावर चढलेला नसतो. केसांच्या रंगाची छटा हुबेहूब वठवणं निष्णात चित्रकारालादेखील अशक्य वाटेल. मी आपले केस काळे राखण्यासाठी काही तरी विशेष उपाय केला असला पाहिजे अशी समजूत माझ्या मित्रांनी का करून घेतली होती ते माझ्या लक्षात आलं. मी म्हटलं, ''मी कोणतीही युक्ती केलेली नाही. केस काळे राहिले झालं!'' ते म्हणाले, ''तुम्ही खरं सांगत नाही. केस आपोआप काळे राहतात काय? बोला, खरं बोला. काय इलाज केलेत?'' मग मला त्यांची थोडी चेष्टा करण्याची लहर आली व मी म्हटलं,

''तुम्ही पिच्छाच पुरवताहात तेव्हा सांगणं भाग आहे-''

''आत कसं बोललात?'' ते खुशीत येऊन म्हणाले, ''सांगा काय केलंत?'' मी म्हटलं, ''असं पाहा, केस कशामुळे पांढरे होतात? फार विचार केल्यानं, नाही का?''

हे कारण मान्य करण्यात ते स्वत: फार विचारी ठरत होते. त्यामुळे क्षणाचाही विचार अगर विलंब न करता ते म्हणाले, ''हो, असं तज्ज्ञांचं मत आहे खरं.''

मी म्हटलं, ''मग या मतावरूनच केस पांढरे होऊ न देण्याचा उपाय उघड नाही का होत? तोच उपाय मी केला!''

ते म्हणाले, ''लक्षात नाही आलं!''

मी म्हटलं, ''उगीच भ्रम आहे लोकांना!'' असं म्हणून मी त्या गृहस्थांना तो विषय तेवढ्यावर सोडायला लावला. ते माझा निरोप घेऊन गेल्यावर माझ्या मनात आलं, तुम्ही विचार केव्हा करता असा प्रश्न मला कोणी केला तर मी काय उत्तर देईन? तुमची लिहायची वेळ कोणती असा प्रश्न मला नेहमी विचारला जातो. त्याप्रमाणेच मला जर एखाद्यानं विचारलं, तुमची विचार करायची वेळ कोणती, तर माझं उत्तर काय असेल?

माझी विचार करण्याची वेळ कोणती? विचार करण्यासारखा प्रश्न आहे खरा!

हा प्रश्न टाळता येण्यासारखा नाही. याचा एकदा निकाल लावलाच पाहिजे!

या निश्चयानं मी स्वत:चं बरेच दिवस निरीक्षण केलं आणि आता मी निकाल लावला आहे. माझं उत्तर तयार आहे. उत्तर थोडंसं चमत्कारिक आहे; पण ते तुम्हांला सांगायला हरकत नाही. मात्र माझी विचार करण्याची वेळ कोणती असं मला नका विचारू, कारण अमुकच वेळी नव्हे तर सदा सर्वकाळच मी विचार करत असतो. लेखनाचा उद्योग करणाऱ्या माणसानं तो करायलाच हवा. नव्या नव्या कल्पनांच्या शोधात तो असतो. अर्धवट सुचलेल्या कल्पनांच्या आकृती पूर्ण करण्याचा त्याचा यत्न असतो. गाढ झोपेच्या घटका सोडल्या तर त्याचं मन सतत विचार करतच असतं. त्याची सावली ज्याप्रमाणे त्याला कधी सोडणार नाही तद्वत तो कोणत्याही उद्योगात कसला तरी विचार करत असतो. तेव्हा माझी विचार करण्याची वेळ कोणती ते काय सांगू?

पण विचार करण्यासाठी कोणती वेळ मला सर्वांत आवडते, अगर कोणत्या वेळी सर्वांत जास्त विचार मला सुचतात असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देता येईल. माझं जे उत्तर आहे तेच इतर लेखक देतील की नाही कोणास ठाऊक? माझा अनुभव तेवढा मी सांगतो. तो असा, की सकाळी दाढी करण्याची वेळ ही माझी विचार करण्याची सर्वांत आवडती वेळ आहे आणि त्या वेळी मला नवे नवे विचार सुचतातही!

मी सकाळी उशिरा उठतो आणि खोलीत खुर्चीवर बसून नव्हे तर गॅलरीतल्या एका खांबाला लावलेल्या आरशापुढे उभा राहून रोज दाढी करतो. डाव्या अंगाला सूर्य पुष्कळ वर आलेला असतो. त्याच्या किरणांचा झोत माझ्यावर पडतो. तिसऱ्या मजल्याच्या उंचीवरून समोर उजव्या बाजूला भिंतींच्या व कौलारांच्या उंच-सखल आडव्या-उभ्या रांगा दिसतात. पावसाळ्यात दिशा धूसर झालेल्या असतात. कधी पावसाची नाजूक झिमझिम, कधी गर्जणारी वृष्टी सुरू असते; पण बाकीच्या ऋतूंत सबंध देखावा उन्हानं झळकत असतो. खालच्या रस्त्यात दिवसाच्या सुरुवातीची रहदारी चालू झालेली असते. वाहनांचे, फेरीवाल्यांचे, संभाषणांचे, आयांनी लहान मुलांना मारलेल्या हाकांचे आवाज उठत असतात. माझं लक्ष त्यांकडे नसतं. स्नानगृहातल्या फवाऱ्यातून पडणाऱ्या जलधारांच्या तुषाराप्रमाणे अंगावर झाडांच्या किरणांच्या स्पर्शाची मौज घेत आणि प्रकाशानं ताजी झिलई दिलेल्या झाडांच्या, जमिनीच्या व टेकड्यांच्या रंगाची चमचम बघत मी क्षणभर उभा राहतो. तो देखावा मला मुक्या शब्दांनी म्हणतो, ''नमस्ते!'' मी उलट म्हणतो, ''नमस्ते!'' मग मी, गरम पाण्यात पडून वाट पाहणारा ब्रश उचलतो, साबणाच्या कांडीवर घासतो आणि गालांवर, हनुवटीवर, गळ्यावर साबणाच्या फेसाचा जाड थर माखवायला प्रारंभ करतो!

आणि त्याच क्षणी नवे विचार, नव्या कल्पना माझ्या मनात कारंज्याच्या तुषारांप्रमाणे उडू लागतात!... माझ्या लेखनातल्या कितीतरी गोष्टींचा जन्म अशा प्रकारे दाढी करण्याच्या वेळी झालेला आहे. या वेळीच माझ्या विचारांना का भरती यावी ते मला सांगता येणार नाही. ते एक मला अजून न उकललेलं गूढ आहे. कदाचित असं असेल की दाढी करण्याच्या वेळी माझ्याजवळ कोणी नसतं, असलेलं मला आवडतही नाही आणि या वेळी मिळणारा एकांत इतर सर्व

वेळच्या एकांताहून निराळ्या स्वरूपाचा असतो. कदाचित हेही कारण असेल, की साबणाचा सुगंधी, शुभ्र, गुदगुल्या करणारा फेस तोंडावर फासताना व नंतर वस्तऱ्याच्या पात्यानं तो काढताना विचार करण्याचा माझा मुळीच हेतू नसतो आणि म्हणूनच नाना विचार माझ्या मनात येतात, कारण कल्पना ही देखील लक्ष्मीसारखी लहरी आहे. तिची आराधना करण्यासाठी तिच्यापुढे गुडघे टेकले, की ती रुसून दूर होते. उलट तिची पर्वा न करता पाठ फिरवली, की ती मागे लागते. इतर वेळी मी मुद्दाम विचार करण्याचा प्रयत्न करतो. मला काही सुचत नाही. दाढी करायच्या वेळेस मी विचारांच्या प्रयत्नात मुळीच नसतो. मनावर विलक्षण प्रसन्नता आलेली असते. कल्पना सुचतात... पण हे सारे माझे तर्क आहेत! खरं म्हणजे दाढी करण्याच्या वेळेस कल्पना उचंबळून का यावी हे माझं मलाच सांगता येत नाही. माझा एक अनुभव तुम्हांला सांगितला. तो तुम्हांला पटला नाही तर सोडून द्या. मात्र पटावा म्हणून एवढंच सांगतो, की हा छोटासा लेखसुद्धा दाढी करता करताच मला सुचला व मी लेखनिकाला सांगितला.

(पडछाया)

## कृती

### (१) आकृत्या पूर्ण करा.

(अ) तिसऱ्या मजल्यावरून पावसाळ्यात लेखकाला दिसलेली दृश्ये

(आ) लेखक सर्वकाळ विचार करताना शोध घेणाऱ्या गोष्टी

### (२) कारणे शोधा.

(अ) लेखकाला स्वत:च्या केसांच्या काळेपणाबद्दल विचारलेल्या प्रश्नाचे आश्चर्य वाटले नाही, कारण..........

(आ) लेखकाच्या खनपटीला बसलेला माणूस केसांच्या क्षुल्लक प्रश्नाचा तगादा लावत होता, कारण..........

### (३) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(अ) केसभर विषयांतर

(आ) केसांत पांढरं पडण्याची लागण

(इ) प्रकाशानं ताजी झिलई दिलेले झाड

### (४) खालील वाक्प्रचारांचे अर्थ लिहून तक्ता पूर्ण करा.

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (अ) गुडघे टेकणे. | |
| (आ) खनपटीला बसणे. | |
| (इ) तगादा लावणे. | |
| (ई) निकाल लावणे. | |
| (उ) पिच्छा पुरवणे. | |

**(५) खालील शब्दांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

निष्णात, झिलई, नित्यनेम, लहरी, तगादा

**(६) खालील वाक्यांतील अलंकार ओळखा.**

(अ) नव्या कल्पना कारंजाच्या तुषारांप्रमाणे उडू लागतात.

(आ) तो देखावा मुक्या शब्दांनी बोलतो.

(इ) कल्पना ही देखील लक्ष्मीसारखी असते.

**(७) खालील वाक्यांतील परस्परविरोधी शब्दांचे शब्दसौंदर्य अनुभवा आणि त्याचा आस्वाद घ्या. अशा वाक्यरचना करण्याचा प्रयत्न करा.**

(अ) मातीच्या ढिगात सुख-दु:खांचे माणिकमोती आढळतात.

(आ) त्या प्रश्नातली गर्भित प्रशंसा उघड असते.

(इ) स्तुती-निंदेची पर्वा न करणारा मी.

(ई) प्रश्न विचारणाऱ्या माणसाला उत्तर हवंच असतं.

**(८) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) अवरोह ×

(आ) अल्पायुषी ×

(इ) सजातीय ×

(ई) दुमत ×

(उ) नापीक ×

**(९) स्वमत.**

(अ) लेखकाने खनपटीला बसलेल्या माणसाशी कलप लावण्याबाबत केलेल्या विनोदी चर्चेबाबत तुमचे मत लिहा.

(आ) परगावी गेल्यानंतर लेखकाला आलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) प्रत्येकाची विचार करण्याची सवय आणि वेळ स्वतंत्र असते, याबाबत तुमचा विचार स्पष्ट करा.

## भाषाभ्यास

### तत्पुरुष समास

• **खालील तत्पुरुष समासातील सामासिक शब्दांच्या विग्रहाचा अभ्यास करून त्यांतील विभक्ती ओळखा.**

| सामासिक शब्द | विग्रह | विभक्ती |
|---|---|---|
| (अ) सभागृह | सभेसाठी गृह | |
| (आ) कलाकुशल | कलेत कुशल | |
| (इ) ग्रंथालय | ग्रंथांचे आलय | |
| (ई) कष्टसाध्य | कष्टाने साध्य | |
| (उ) रोगमुक्त | रोगापासून मुक्त | |

- **विभक्ती तत्पुरुष समासाची वैशिष्ट्ये–**

(अ) समासातील पहिले पद नाम किंवा विशेषण असते.

(आ) विग्रह करताना प्रथमा व संबोधन सोडून अन्य विभक्ती लागते.

**ज्या तत्पुरुष समासात कोणत्यातरी विभक्तीचा किंवा विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा लोप करून दोन्ही पदे जोडली जातात, त्यास 'विभक्ती तत्पुरुष समास' म्हणतात.**

- **खालील वाक्यांतील सामासिक शब्द ओळखा व त्या शब्दांचा विग्रह करा.**

(अ) आज स्वच्छ सूर्यप्रकाश आहे.

(आ) सैनिकांच्या देशापर्णाचा आदर करावा.

(इ) प्रत्येकाने ऋणमुक्त राहण्याचा प्रयत्न करायलाच हवा.

(ई) पाठ्यपुस्तकातील सर्व कविता संकेतला तोंडपाठ आहेत.

DCIHR2

# १५. खोद आणखी थोडेसे

**आसावरी काकडे** (१९५०) :

प्रसिद्ध कवयित्री. त्यांचे 'अनु मनु शिरू', 'ऋतुचक्र', 'टिक टॉक ट्रिंग', 'भिंगोऱ्या भिंग' हे बालकविता संग्रह; 'आकाश', 'आरसा', 'उत्तरार्ध', 'मी एक दर्शन बिंदू', 'लाहो', 'शपथ सार्थ सहजीवनाची', 'स्त्री असण्याचा अर्थ' हे कवितासंग्रह; 'तरीही काही बाकी राहील', 'बोल माधवी', 'लम्हा लम्हा' हे अनुवादित कवितासंग्रह इत्यादी लेखन प्रकाशित आहे. १९९० साली विशाखा पुरस्कार व १९९२ साली राज्य पुरस्कार यांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.


जीवनात प्रयत्न आणि सकारात्मकता यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ध्येय साध्य करताना संयमाने, जिद्दीने, आत्मविश्वासाने, चिकाटीने कार्यरत रहावे लागते. चांगुलपणावर विश्वास ठेवणे आवश्यक असते. वास्तव आनंदाने स्वीकारावे आणि कोणत्याही भ्रमात राहू नये, उमेदीने जगण्यासाठी कष्टाची कास धरावी, असा संदेश कवितेतून व्यक्त होतो. आपण जिथे थांबतो, तिथून चिकाटीने आणखी थोडेसेच पुढे गेले तर यश निश्चितच मिळते. 'आणखी थोडेसे' हा शब्द चिकाटी, जिद्द, आशावाद सूचित करणारा आहे.

*खोद आणखी थोडेसे*
*खाली असतेच पाणी*
*धीर सोडू नको, सारी*
*खोटी नसतात नाणी.*

*घट्ट मिटू नये ओठ*
*गाणे असते गं मनी*
*आर्त जन्मांचे असते*
*रित्या गळणाऱ्या पानी.*

*मूठ मिटून कशाला*
*म्हणायचे भरलेली*
*उघडून ओंजळीत*
*घ्यावी मनातली तळी.*

*झरा लागेलच तिथे*
*खोद आणखी जरासे*
*उमेदीने जगण्याला*
*बळ लागते थोडेसे!*



(लाहो)

## कृती

### (१) योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण करा.

(अ) 'खोदणे' या शब्दाचा कवितेतील अर्थ म्हणजे ······

(१) विहीर आणखी खोदणे.
(२) जिद्दीने आणखी प्रयत्न करणे.
(३) घरबांधणीसाठी खोदणे.
(४) वृक्षलागवडीसाठी खोदणे.

(आ) गाणे असते मनी म्हणजे ······

(१) मन आनंदी असते.
(२) गाणे गाण्याची इच्छा असते.
(३) मनात नवनिर्मिती क्षमता असते.
(४) गाणे लिहिण्याची इच्छा असते.

### (२) आकृती पूर्ण करा.

**'मनातले गाणे' असे म्हटल्यावर तुम्हांला सुचणाऱ्या कल्पना**

↓ ↓ ↓ ↓

### (३) कवितेतील खालील संकल्पना आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.

| कवितेतील संकल्पना | संकल्पनेचा अर्थ |
|---|---|
| (१) सारी खोटी नसतात नाणी | (अ) मनातील विचार व्यक्त करावेत. |
| (२) घट्ट मिटू नका ओठ | (आ) मनातील सामर्थ्य व्यापक बनवावे. |
| (३) मूठ मिटून कशाला म्हणायचे भरलेली | (इ) सगळे लोक फसवे नसतात. |
| (४) उघडून ओंजळीत घ्यावी मनातली तळी | (ई) भ्रामक खोट्या समजुती बाळगू नयेत. |

### (४) कवितेच्या आधारे खालील विधाने योग्य की अयोग्य ते लिहा.

(१) संयमाने वागा–
(२) सकारात्मक राहा–
(३) उतावळे व्हा–
(४) चांगुलपणावर विश्वास ठेवा–
(५) नकारात्मक विचार करा–
(६) खूप हुरळून जा–
(७) संवेदनशीलता जपा–
(८) जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास कायम ठेवा–
(९) जुन्याच निर्मितीवर विश्वास ठेवा–
(१०) नवनिर्मितीवर विश्वास ठेवा–
(११) धीर सोडू नका–
(१२) यशाचा विजयोत्सव करा–

### (५) काव्यसौंदर्य.

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.
'झरा लागेलच तिथे, खोद आणखी जरासे'

(आ) 'आर्त जन्मांचे असते, रित्या गळणाऱ्या पानी', या ओळींमधील अर्थ तुमच्या भाषेत स्पष्ट करा.

(इ) 'गाणे असते गं मनी', या ओळीतील तुम्हांला समजलेला नवनिर्मिती क्षमतेचा संदेश स्पष्ट करा.

(ई) 'परिश्रमाशिवाय फळ मिळत नाही', याबाबतीत तुम्ही घेतलेला अनुभव लिहा.

DCSISP

## ❁ वीरांगना (स्थूलवाचन)

स्वत:चे दैनंदिन कार्य यथायोग्य रीतीने पार पाडत असतानाच सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या, आपण समाजाचे काही देणं लागतो याची जाणीव ठेवून वेगळी वाट चोखाळणाऱ्या व्यक्ती समाजाला कायमच भूषणावह असतात. प्रस्तुत पाठात देशहित आणि समाजहित जपणाऱ्या दोन वीरांगनांचा परिचय करून दिलेला आहे.

विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्ती व समाजऋण यांची जाणीव निर्माण व्हावी, हा या पाठाचा उद्देश आहे.

देशासाठी सदैव शीर तळहातावर घेणारा वीर सैनिक व त्याला तितक्याच प्राणपणाने साथ देणारी वीरपत्नी हे देशाचे भूषण आहेत. नियतीच्या आघाताने खचून जाणे, हे वीरपत्नीच्या स्वभावातच नसते. वीरगती प्राप्त झालेल्या कर्नल संतोष महाडिक यांच्या पत्नी स्वाती महाडिक यांचा निर्धार उभ्या महाराष्ट्राला अभिमानास्पद आहे. वीरपतीचे निधन आयुष्यातील सर्वांत दु:खद क्षण; परंतु याचवेळी कर्नल महाडिक यांचे सैन्यात राहण्याचे अपूर्ण स्वप्न आपण सैन्यात भरती होऊन पूर्ण करायचं हा स्वाती महाडिक यांचा निर्धार, आपल्या दोन्ही मुलांनाही सैन्यातच पाठवण्याचा त्यांचा निर्णय आणि त्यांच्या पूर्ततेसाठी खडतर प्रशिक्षणातून स्वत:ला सिद्ध केलेल्या या वीरांगनेचा हा परिचय तुम्हांला निश्चितच प्रेरक ठरेल.



लेफ्टनंट स्वाती संतोष महाडिक

महाराष्ट्र कन्या लेफ्टनंट स्वाती महाडिक यांचा, 'भावुक वीरपत्नी ते सज्ज वीरांगना' असा प्रवास अत्यंत धाडसी, प्रेरक आणि थक्क करणारा आहे.

शिवाजी विद्यापीठातून बी. एससी व एम. एस. डब्ल्यू अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पुणे महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्वसन विभागात दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठीच्या विविध योजना राबवण्याचे काम स्वाती महाडिक करत होत्या. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी सुखी संसार करण्याची स्वप्ने पाहिली होती. दरम्यानच्या काळात त्यांचा विवाह भारतीय लष्करातील अधिकारी श्री. संतोष महाडिक यांच्याशी झाला. लग्नानंतर त्यांनी बी.एड आणि इतर अनेक व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केले. त्यानंतर आर्मी पब्लिक स्कूलमध्ये शिक्षिकेची नोकरी केली. साडेबारा वर्षांच्या सुखी संसारातील कार्तिकी व स्वराज ही त्यांची दोन अपत्ये. कर्नल संतोष महाडिक यांचे पहिले प्रेम म्हणजे 'भारतीय सैन्य दल आणि आपली वर्दी.' याची जाणीव स्वाती महाडिक यांनाही होतीच. भारतीय सैन्यदलात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीचा व आगळ्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा कर्नल संतोष महाडिक यांनी निर्माण केलेला होता. आणि अचानक... १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी जम्मू काश्मीरच्या कुपवाड्यात ४१ राष्ट्रीय बटालियनचे कर्नल संतोष महाडिक यांना दहशतवाद्यांशी निकराने लढा देताना वीरमरण आले.

नियतीच्या आघाताने खचून जाणे वीरपत्नीच्या स्वभावातच नसते. असीम धैर्य असलेल्या स्वाती महाडिक यांनी पतीच्या अंत्यविधीच्या वेळीच भारतीय सैन्यात रुजू होण्याचा निश्चय केला. वयाच्या चाळिशीच्या आसपास असूनही वीरपत्नीने निश्चय पूर्तीचा ध्यास घेतला. त्यासाठी विशेष परवानगी घेऊन प्रयत्नपूर्वक वयाची अट शिथिल करून घेतली. स्टेट सिलेक्शन बोर्डाची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन स्वाती महाडिक यांनी शारीरिक व वैद्यकीय चाचण्याही यशस्वीपणे पार पाडल्या. त्यातून त्यांची निवड ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी, चेन्नई येथे झाली. तेथे त्यांनी अकरा महिन्यांचे अतिशय खडतर प्रशिक्षण पूर्ण केले आणि ९ सप्टेंबर २०१७ रोजी लेफ्टनंट म्हणून लष्करात दाखल झाल्या. आपल्या खांद्यावर अभिमानाचे दोन स्टार मिळवले. त्या वेळी त्यांची मुलगी कार्तिकी ही सातवीत तर मुलगा स्वराज हा इयत्ता दुसरीत शिकत होता. या वीरपत्नीने देशासाठी पतीने केलेल्या बलिदानानंतर खचून न जाता सैन्यदलात भरती होऊन

केवळ आपल्या अपत्यांसमोरच नव्हे, तर देशातील प्रत्येक स्त्री, प्रत्येक मूल यांच्यासमोर एक अनोखा आदर्श उभा केला आहे. त्याबद्दल त्यांचे आईवडील, सासरची मंडळी व मुलांनाही त्यांचा सार्थ अभिमान वाटतो. ''स्वाती लहानपणापासून धाडसी होती'', असे त्यांच्या आई सांगतात. पतीच्या मृत्यूनंतर समाजाने त्यांना शिक्षणक्षेत्रात तसेच राजकीय क्षेत्रात मानाच्या अनेक संधी, अनेक सुखासीन आयुष्य देऊ केले होते; परंतु ती सर्व प्रलोभने झुगारून त्यांनी सैन्यात भरती होऊन, पतीचे 'पहिले प्रेम' जिवंत ठेवण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्याचवेळी पित्याचे छत्र हरवलेल्या आपल्या 'दोन्ही मुलांना सैन्यातच पाठवणार!' हा स्वातीताईंचा निर्धार हे देशप्रेमाचे, जिद्दीचे मूर्त रूप आहे.

खडतर प्रशिक्षणाच्या काळात आपल्यापेक्षा साधारण निम्मे वय असलेल्या २२-२३ वर्षांच्या तरुण मुलींबरोबर प्रशिक्षण घेताना स्वातीचा उत्साह सरत्या काळालाही लाजवणारा होता. हे प्रशिक्षण त्यांना खडतर वाटले नाही. उलट त्यांच्या दु:खावर मात करण्याचे ते एक साधन ठरले. अन्यथा या वेदनेतून बाहेर येणे कठीण होते, असे त्या म्हणतात.

मुक्कामापेक्षा नियोजनबद्ध प्रवासावर अधिक विश्वास ठेवणे स्वाती महाडिक यांना महत्त्वाचे वाटते, कारण त्यांच्या मते, एखादे मुक्कामाचे ठिकाण कधी येणार याचा विचार करतो तेव्हा ते अधिक खडतर वाटते. जेव्हा आपण त्या प्रवासाचा आनंद घेत मार्गक्रमण करतो तेव्हा तो प्रवास खडतर वाटत नाही. स्वाती महाडिक म्हणतात, ''आर्मीचे जीवन ही फक्त नोकरी नाही, तर तो जीवन जगण्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण मार्ग आहे. ''तेथे शारीरिक क्षमतेपेक्षा मानसिक बल, आत्मबल अधिक महत्त्वाचे आहे.'' निग्रही, करारी आणि धाडसी अशा या रणरागिणीचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.

आपण जे काम करतो, मग ते कोणतेही असो, त्याच्याबद्दल आणखीन जाणून घेणं, अधिक शिकणं हे जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर महत्त्वाचे असते, असे त्या म्हणतात. पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या भारतातील अनेक मुलींना व स्त्रियांना सैन्यदलात भरती होण्याची प्रेरणा देऊन वैभवशाली नव्या भारताचे स्वप्न त्या उभे करतात.

पतिनिधनाचे असीम दु:ख बाजूला ठेवून पतीचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्याच्या हेतूने भारतमातेची सेवा करण्यासाठी सज्ज झालेल्या या वीरांगनेला सादर प्रणाम!

## कृती

(अ)

**(१) खालील आकृती पूर्ण करा.**

**लेफ्टनंट स्वाती महाडिक**

- त्यांचे शिक्षण
- त्यांचा निर्धार
- त्यांचा स्वभाव

**(२) 'कठोर परिश्रमांमुळेच स्वाती महाडिक यांना स्वत:चा निर्धार पूर्ण करता आला', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**(३) 'पती निधनानंतर आपण सैन्यात भरती व्हायचं', स्वाती महाडिक यांच्या या निर्धारातून समाजाला काय संदेश मिळतो, ते तुमच्या शब्दांत लिहा.**

**(४) टिपा लिहा.**

(अ) देशप्रेमी कर्नल संतोष महाडिक (आ) जिद्दी लेफ्टनंट स्वाती महाडिक

**(५) 'प्राप्त परिस्थितीतून आत्मविश्वासाने आणि परिश्रमाने कार्य करणे म्हणजेच यश', पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**(६) 'मुक्कामापेक्षा नियोजनबद्ध प्रवासावर अधिक विश्वास ठेवावा', या विधानाविषयीचे तुमचे विचार स्पष्ट करा.**

**(७) हा पाठ वाचल्यावर तुमच्या मनात येणारे भाव शब्दबद्ध करा.**

शिक्षण हे खऱ्या अर्थाने उन्नतीचे साधन आहे. सुशिक्षित आणि सुसंस्कृत जनता ही राष्ट्राची संपत्ती असते. अनेक वेगवेगळ्या कारणांमुळे शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जाणाऱ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे महत्त्वाचे असते. त्यासाठी प्रयत्न करणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे.

शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, आयुष्याच्या वाटेवरून भरकटलेल्या मुलांना पुन्हा मार्गावर आणून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे समाजहिताचे मोलाचे कार्य करणाऱ्या सबइन्स्पेक्टर रेखा मिश्रा यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणायदायीच आहेत. समाजहितासाठी सतत कार्यरत असणाऱ्या या वीरांगनेचा परिचय तुम्हांला निश्चितच प्रेरक ठरेल.



सबइन्स्पेक्टर रेखा मिश्रा

उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या व सध्या मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील रेल्वे पोलीस दलात आपल्या विशेष कामगिरीने नावाजलेल्या कुमारी रेखा मिश्रा महाराष्ट्र राज्याचाही अभिमानबिंदू ठरल्या आहेत, कारण त्यांचे सामाजिक कामही स्तुत्य आहे. अलाहाबाद विद्यापीठातून इंग्रजी विषयात एम. ए. करून त्यांनी बी. एड. सुद्धा केले व नंतर रेल्वे पोलीस दलाची परीक्षा उत्तीर्ण होऊन २००८ मध्ये मुंबई मध्य रेल्वे पोलीस दलात उपनिरीक्षक (सबइन्स्पेक्टर) म्हणून त्यांनी आपली सेवा सुरू केली. रेल्वे पोलीस दलातील पहिल्या अडीच वर्षांच्या सेवेतील एक वर्ष त्यांनी महिला सुरक्षा यंत्रणेत काम पाहिले व पुढील अवघ्या दीड वर्षांच्या कालावधीत रेल्वे स्थानकावर भटकताना सापडलेल्या ४३४ अल्पवयीन मुलामुलींना त्यांच्या पालकांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचवण्याचे कार्य केले. विविध कारणांमुळे स्वत:चे घर सोडून निघून आलेल्या, मुंबईसारख्या मायानगरीत पोहोचलेल्या व भरकटलेल्या या बालकांना योग्य मार्गावर आणण्याचे मोठे कार्य रेखा मिश्रा यांनी केले. त्याबद्दल समस्त रेल्वे प्रशासनाला त्यांचा अभिमान वाटतो.

पहिल्याच केसमध्ये घरातून पळून आलेल्या १४ वर्षीय मुलाचे मनपरिवर्तन करून त्यांनी त्याला सुखरूप त्याच्या आईवडिलांच्या ताब्यात दिले. सर्वसाधारणपणे असलेला पोलिसी बडगा दाखवण्याऐवजी 'मुझसे दोस्ती करोगे?' म्हणत भरकटलेल्या मुलामुलींना आईच्या प्रेमळ हृदयाने सन्मार्ग दाखवण्याचे कार्य त्यांनी केले व त्या करत आहेत.
वेगवेगळ्या कारणांनी पालकांशी भांडण करून, स्वत:चे घर सोडून पळून आलेली मुले, मुंबई शहराचे व अनेकदा बॉलीवूडचे आकर्षण असलेली मुले, शहरातील पत्ता माहीत नसताना कुठेतरी राहत असलेल्या नातेवाइकांना भेटायला आलेली व चुकलेली मुले, गरिबीमुळे त्रस्त होऊन कामाच्या शोधात मुंबई शहरात आलेली मुले, क्वचित प्रसंगी समाजकंटकांनी अवैध कामासाठी फसवून पळवून आणलेल्या मुलामुलींनाही सोडवण्याचे काम रेखा मिश्रा यांनी केले. त्यामुळेच कुटुंबांपासून दुरावलेली अनेक मुले पुन्हा शाळेत जाऊन नाचूबागडू लागली. त्यांना जीवनानंद मिळाला. एकदा दक्षिण भारतातून अपहरण करून आणल्या गेलेल्या तीन तमिळ भाषिक शाळकरी मुलींना सोडवून घरी पोहोचवण्याच्या कामात रेखाजींना सलग ४८ तास ड्युटीवर रहावे लागले. अथक प्रयत्न करून या मुलींना सुरक्षितपणे त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करेपर्यंत त्या स्वस्थ बसल्या नाहीत.

एक प्रसंग कथन करताना त्या सांगतात, की फेसबुकवरील गप्पातील (चॅट) अनोळखी व्यक्तीच्या मैत्रीच्या शोधार्थ आलेल्या मुलींना समजावून सांगणे व त्यांना सुरक्षित त्यांच्या घरी पोहोचवणे हे तर फारच जिकिरीचे असते. कारण १४– १५ या वयोगटांतील भरकटलेल्या मुलामुलींच्या भावभावनांना आवर घालणे सोपे नसते. काही वेळा प्रेमाने तर काही वेळा कायद्याचे भय दाखवून या मुलांना चुकीच्या गोष्टींपासून दूर करावे लागते. हे मोठे आव्हानच असते. रेखाजींच्या प्रसंगावधानाने ही मुले कोणत्याही गैरप्रवृत्तींना बळी न पडता पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात सामील झाली, अन्यथा त्यांचे भविष्य काय असते याची कल्पना न केलेलीच बरी. भरकटलेल्या मुलांच्या आयुष्याला वळण देणे, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचे भविष्य घडवणे, अशा कार्याची समाजाला नेहमीच गरज असते. राष्ट्रघडणीत त्याचा वाटाही मोलाचा असतो, म्हणूनच सबइन्स्पेक्टर रेखा मिश्रा यांनी स्वीकारलेल्या या अनोख्या कार्याला मानाचा मुजरा!

**(१) खालील कृती करा.**

मुद्द्यांवरून एक परिच्छेद तयार करा.

रेखा मिश्रा यांचे
- शिक्षण
- कार्य

**(२) पाठाच्या आधारे टिपा लिहा.**

(अ) मुले भरकटण्याची कारणे

(आ) रेखाजींच्या कार्याचा परिणाम

**(३) 'प्रेम आणि आपुलकी' या गोष्टींमुळे भरकटलेली मुले पुन्हा स्वगृही जाण्यास तयार होतात, हे पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**(४) 'भरकटलेल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी रेखाजींनी केलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत', हे पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**(५) सबइन्स्पेक्टर रेखा मिश्रा यांच्या कार्याची माहिती वाचून तुमच्या मनात येणारे विचार स्पष्ट करा.**

## भाषाभ्यास

### कर्मधारय समास

- **खालील वाक्ये वाचून त्यातील सामासिक शब्द ओळखा व त्यांचा विग्रह करा.**

उदा., तलावातील नीलकमल किती शोभून दिसते आहे!

नीलकमल – नील असे कमल.

(अ) महाराष्ट्र राज्य समृद्ध आहे.

(आ) या पुस्तकाचे भाषांतर चांगले झाले आहे.

(इ) आकाशात पांढराशुभ्र ढग तरंगत आहे.

- **कर्मधारय समासाची वैशिष्ट्ये.**

(अ) दोन्ही पदे एकाच विभक्तीत असतात.

(आ) कधी पूर्वपद विशेषण असते. उदा., नीलकमल

(इ) कधी उत्तरपद (दुसरे पद) विशेषण असते. उदा., घननीळ

(ई) कधी दोन्ही पदे विशेषणे असतात. उदा., श्यामसुंदर

(उ) कधी पहिले पद उपमान तर कधी दुसरे पद उपमान असते. उदा., कमलनयन, नरसिंह

(ऊ) कधी दोन्ही पदे एकरूप असतात. उदा., विद्याधन

**ज्या समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत म्हणजे प्रथमा विभक्तीत असतात, त्याला 'कर्मधारय समास' असे म्हणतात.**

- **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

(अ) रक्तचंदन– (आ) घनश्याम– (इ) काव्यामृत– (ई) पुरुषोत्तम–

## द्विगू समास

- **खालील वाक्ये वाचून त्यातील सामासिक शब्द ओळखा.**

उदा., नेत्रांच्या पंचारतींनी सैनिकांना ओवाळावे.

पंचारती – पाच आरत्यांचा समूह.

(अ) असा माणूस त्रिभुवन शोधले तरी सापडायचा नाही. [ ]

(आ) नवरात्रात ठिकठिकाणी गरबा नृत्य चालते. [ ]

(इ) शाळेत आता हिंदी सप्ताह चालू आहे. [ ]

- **द्विगू समासाची वैशिष्ट्ये**

(अ) द्विगू समासात पूर्वपद संख्यावाचक असते.

(आ) हा समास नेहमी एकवचनात असतो.

(इ) सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा बोध होतो.

**ज्या समासातील पहिले पद संख्याविशेषण असते व त्या सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा अर्थ दर्शवला जातो तेव्हा, त्यास द्विगू समास असे म्हणतात.**

- **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

(अ) अष्टाध्यायी–

(आ) पंचपाळे–

(इ) द्विदल–

(ई) बारभाई–

(उ) त्रैलोक्य–

# अपठित गद्य आकलन

- **उतारा वाचून दिलेल्या कृती करा.**

**(अ) तक्ता पूर्ण करा.**

| जंगलाचा स्वभाव | माणसाचा स्वभाव |
|---|---|
| (१) .................... | (१) .................... |
| (२) .................... | (२) .................... |

जंगलाने सर्वांचे स्वागत केले-दिलखुलास, मनमोकळे. जंगलाचा स्वभावच असा मोकळाढाकळा असतो. अढी धरावी, तेढ बाळगावी यासाठीसुद्‌धा एखादा कोपरा लागतो. जंगलाला असा कोपरा नसतो. माणसं आणि त्यांची घरं यांना कोपरे असतात म्हणून ती जंगलाइतकी मुक्त, मोकळी नसतात. जंगल मनमोकळे असते. सहजसुंदर असते. ऊनपावसाशी ते लपंडाव खेळते. थंडीवाऱ्याशी गप्पा मारते. फुलताना, खेळताना, डुलताना, हसताना ते मनापासून सगळे काही करते. एप्रिलचा हा महिना, उन्हाळ्याचे दिवस, भामरागडच्या जंगलाची वेश बदलण्याची वेळ, तर त्या जंगलाने अंगाखांद्यावरची पर्णभूषणे ढाळलेली दिसली. त्यातही संकोच नाही, की संशय नाही. त्यामुळे जमीन दिसू नये इतका हातभर खाली वाळलेल्या पानांचा सुदूर सडा. राखाडी, पिंगट रंगाचा. वारा हलकेच त्यात शिरायचा तेव्हा सळसळ आवाज व्हायचा. नागमोडी पाऊलवाटेने जेव्हा पावले त्यावर पडायची तेव्हा त्यातून चर्रचर्र आवाज उठायचा. जणू जंगल बोलते आहे असे वाटते. जंगल कुजबुजते आहे असे भासते. वेळूच्या घनदाट बनात वारा घुमतो तेव्हा तो गाणे होऊनच घुमत घुमत बाहेर पडतो. पानं, फांद्या, फुलं सर्वांनीच जंगल हसते, गाते आणि डुलते. पावसाच्या सरी झेलते. सचैल न्हाते. भिजत चिंब होऊन जाते.

**-राजा मंगळवेढेकर.**

**(आ) चौकटी पूर्ण करा.**

**जंगल करत असलेल्या मानवी क्रिया**

[ ] [ ] [ ] [ ]

**(इ) खालील कृती करा.**

(१) खालील शब्दांची जात ओळखा.

(i) जंगल → [ ]    (ii) नागमोडी → [ ]

(२) सूचनेप्रमाणे सोडवा.

(i) जंगल मनमोकळे असते. (काळ ओळखा.)

(ii) सहसंबंध लिहा.

कोपरे : [ ]    पाने : पान

- **स्वमत.**

जंगलाचा मनमोकळा स्वभाव सोदाहरण स्पष्ट करा.

# १६. आकाशी झेप घे रे

**जगदीश खेबुडकर** (१९३२-२०११) :

प्रसिद्ध कवी, साहित्यिक, गीतकार. पटकथा, संवाद, लघुकथा, नाटक, दूरदर्शन मालिका यांसाठी त्यांनी साहित्य निर्मिती केली आहे. साधे, सोपे परंतु अर्थगर्भ व नादमय शब्द ही त्यांच्या गीतांची वैशिष्ट्ये होत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना अकरा वेळा सन्मानित करण्यात आले आहे. त्याशिवाय गदिमा पुरस्कार, कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. मराठी चित्रपटसृष्टीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर गीतांचे लेखन केले आहे.

कवीने सुरक्षिततेचे, परावलंबित्वाचे कवच काढून टाकून स्वकष्टाने जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आपल्या क्षमतांवर, सामर्थ्यावर विश्वास ठेवावा. कवी पाखराच्या प्रतीकातून माणसाला स्वसामर्थ्याची ओळख करून देतात. प्रस्तुत कवितेतून कवी परावलंबित्वाचे कवच फोडून स्वसामर्थ्यावर ध्येयाची उंच शिखरे पादाक्रांत करा, उत्तम यश मिळवून त्याचा निखळ आनंद घ्या, असा संदेश देतात.

आकाशी झेप घे रे पाखरा
सोडी सोन्याचा पिंजरा

तुजभवती वैभव, माया
फळ रसाळ मिळते खाया
सुखलोलुप झाली काया
हा कुठवर वेड्या घेसी आसरा

तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने
दरि-डोंगर, हिरवी राने
जा ओलांडुनी या सरिता-सागरा

कष्टाविण फळ ना मिळते
तुज कळते परि ना वळते
हृदयात व्यथा ही जळते
का जीव बिचारा होई बावरा

घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले
घर प्रसन्नतेने नटले
हा योग जीवनी आला साजिरा



## कृती

**(१) योग्य पर्याय ओळखा.**

(अ) सुखलोलुप झाली काया म्हणजे........

(१) सुखाचा तिरस्कार वाटतो.

(२) सुखाबद्दल प्रेम वाटते.

(३) सुखाचे आकर्षण वाटते.

(४) सुख उपभोगण्याची सवय लागते.

(आ) पिंजरा सोडून झेप घेतल्याने ........

(१) काया सुखलोलुप होते.

(२) पाखराला आनंद होतो.

(३) आपल्याला स्वसामर्थ्याची जाणीव होते.

(४) आकाशाची प्राप्ती होते.

**(२) तुलना करा.**

| पिंजऱ्यातील पोपट | पिंजऱ्याबाहेरील पोपट |
|---|---|
| | |
| | |
| | |

**(३) पाखराला स्वसामर्थ्याची ओळख करून देणाऱ्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

**(४) कवीने यशप्राप्तीच्या संदर्भात सांगितलेली सुवचने लिहा.**

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

‘घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले’

(आ) ‘आकाशी झेप घे रे पाखरा सोडी सोन्याचा पिंजरा’, या ओळीतील मथितार्थ स्पष्ट करा.

(इ) ‘स्वसामर्थ्याची जाणीव’ हा उत्तम व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे, हे विधान स्पष्ट करा.

(ई) ‘घर प्रसन्नतेने नटले’, याची प्रचिती देणारा तुमचा अनुभव लिहा.

**उपक्रम :**

कवी दत्त यांची ‘पिंजऱ्यातील पोपट’ ही कविता मिळवा. ‘पिंजऱ्यातील पोपट’ व ‘आकाशी झेप घे रे’ या दोन्ही कवितांच्या भावार्थातील साम्य शोधा.

DD2EUC

# १७. सोनाली

**डॉ. वा. ग. पूर्णपात्रे** (जन्म-१९२०) :

प्रसिद्ध लेखक. त्यांचे वन्यप्राण्यांविषयीचे 'सोनाली' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. प्राणीजगत् हा सर्वांच्याच कुतूहलाचा व जिव्हाळ्याचा विषय आहे. लहानपणापासून पाळीव प्राणी व जंगली प्राणी या दोघांबद्दलही आपल्याला आकर्षण असते. पाळीव प्राणी व हिंस्र प्राणी यामध्ये भेद आहेतच; परंतु जंगली प्राण्यांच्या हिंस्रपणाबाबत लहानपणापासून आपल्या मनात एक प्रकारची भीती व गैरसमज असतो. सोनाली हा पाठ सिंह या हिंस्र श्वापदामध्येही माणसावर प्रेम करण्याची वृत्ती असू शकते याचे सत्य उदाहरण आहे. हिंस्र श्वापदाला घरात पाळणे, नैसर्गिक वातावरणापासून त्याला दूर ठेवणे हे योग्य नाही; परंतु हिंस्र श्वापदातील पशुत्वावर प्रेमाने मात करता येऊ शकते. खरे म्हणजे मानवामध्ये सुद्धा प्रेम व संतापी वृत्ती अशा दोन्ही प्रकारच्या प्रवृत्ती आढळतात. आपल्यातील नकारात्मक प्रवृत्तींवरही मनुष्य मात करू शकतो याचाही हा वस्तुपाठ आहे.

सोनाली हा सत्यकथेवर आधारित असलेला संवेदनशील पाठ माणसातील पशुत्व, वाईट प्रवृत्ती दूर व्हाव्यात, ही प्रेरणा देणारा आहे. माणसाने प्राण्यांवर प्रेम करावे असा संदेश या पाठातून मिळतो.

३१ मार्च १९७४, सोमवारचा दिवस. आमच्या साऱ्या घरात आज सुतकी वातावरण होतं. आमच्या लाडक्या सोनालीचा आज आमच्या घरातला शेवटचा दिवस. आज सोनाली पुण्याला जाणार होती. आपल्या कायमच्या घरी. तिथल्या पेशवे उद्यानात यापुढे तिचं कायम वास्तव्य राहणार होतं. आज मी स्वत: सोनालीला घेऊन पुण्याला निघालो होतो. गाडी पुढे चालली होती; पण मी मात्र मनानं भूतकाळात शिरलो होतो.

अजून तो दिवस आठवतोय मला. २९ ऑगस्ट, १९७३. वेळ सायंकाळची. डॉ. चित्रे यांनी छोटासा पिंजरा तयार करूनच ठेवला होता. त्या तीन पिलांना त्यांनी मादीपासून दूर केलं आणि म्हणाले, ''हो, डॉक्टर, सांगा तुमचा चॉइस.'' तिन्ही बछड्यांना जन्मून दोन महिने झाले होते. मी तिन्ही पिल्लांना गोंजारलं; पण सगळीच फिसकन अंगावर आली. मी त्यातल्या त्यात कमी फिसकारणारं, थोड्या शांत स्वभावाचं एक पिल्लू निवडलं. ते इतरांपेक्षा थोडं सशक्तही होतं. बच्च्याला आम्ही पिंजऱ्यात ठेवलं. रात्रभर प्रवासात माझ्या मनात त्या छाव्याशिवाय दुसरा कशाचाच विचार नव्हता. दोन वर्षांचे झाले, की वाघ-सिंह पूर्ण ताकदीचे होतात. मग त्यांना शिकवणं, माणसाळवणं अवघड असतं. पुन्हा माझ्या डोळ्यांसमोर नुसतं सर्कशीसारखं वन्य पशूंना ट्रेनिंग देणं हा हेतू नव्हता. मला एका जंगली जनावरावर प्रेम करायचं होतं. अगदी पोटच्या मुलासारखं. ती जेवल्याखेरीज मी जेवणार नव्हतो. तिला जवळ घेतल्याखेरीज मी झोपणार नव्हतो. आजपर्यंत पूर्णपात्रे घराण्यातील पराक्रमी लोकांनी शिकारी करून कीर्ती मिळवली होती; पण पशूमधील पशुत्वाची आज मी शिकार करायला निघालो होतो. आम्ही घरात प्रवेश केला. पहिला दिवस तसाच गेला. या सिंहकन्येचं आगमन होण्यापूर्वी पंधरा दिवस 'रूपाली'चं आगमन झालं होतं. कापसासारखे शुभ्र पांढरे केस असलेली दीड महिन्यांची ही कुत्री आमच्या घरात सर्वांची लाडकी झाली होती. तिचे ते रुपेरी केस पाहून आम्ही तिचं नाव 'रूपाली' ठेवलं होतं. माझा मुलगा डॉ. सुभाष याला पहिली मुलगी झाली. घरात दीप आला, म्हणून आत्यानं, म्हणजेच सुचेतानं सुचवलेलं 'दीपाली' नाव ठेवलं. म्हणजे एकाच ऑगस्ट महिन्यात (१९७३) आमच्या संगम बंगल्यात 'रूपाली' आली, नात 'दीपाली' आली आणि आता सिंहकन्याही आली होती. असा हा मनोहर त्रिवेणी संगम इथं झाला होता. काय बरं या छाव्याचं नाव ठेवावं? सोन्यासारखे केस असलेली सुवर्णकांतीची ती मादी कोचावर बसली होती. तिच्या पाठीवरून हात फिरवताना एकदम मला नाव सुचलं- 'सोनाली'.

सुरुवातीला रूपालीचं आणि सोनालीचं मुळीच पटेना. रूपाली सोनालीवर भुंकायची आणि सोनालीही फिसकून अंगावर जायची. तीन चार दिवस हा प्रकार चालू होता; पण चार दिवसानंतर दोघींचीही गट्टी जमली. मग एकत्र बसणं, झोपणं सुरू झालं. हिंडताना रूपाली पुढे व सोनाली मागे. रूपाली सीनियर असल्यामुळे तो मान तिचाच होता. पुढे तर दोघींना एकमेकींचा इतका लळा लागला, की त्यांचं जेवणही एकत्र होऊ लागलं आणि रूपालीप्रमाणे सोनालीही माझ्याजवळ माझ्या पायथ्याशी झोपू लागली.

झोपायची वेळ झाली, की सोनाली उडी मारून बिछान्यात शिरे; पण चटकन झोपी जायचा तिचा स्वभावच नव्हता. बिछान्यात आली, की ती माझं तोंड चाटू लागे, मग केस चाटे. पंजानं माझे केस विस्कटून टाकी. कधी ती अन् रूपाली यांची दंगामस्ती माझ्याच बिछान्यात चालायची. दोघीही बिछान्यात चक्क नाचत, कुदत, थकल्या-दमल्या, की दोघीही आपापली जागा पकडून झोपायला येत. फुस्स करून रूपा अंग टाकी आणि झोपी जाई; पण सोनालीला मात्र अशी झोप येत नसे. लहान मुलासारखं तिला मला थोपटून झोपवावं लागे. तेव्हा कुठे बाईसाहेब झोपत. ती झोपे तीही एखाद्या लहान मुलासारखी अस्ताव्यस्त. झोपेत बाईसाहेब लोळतही भरपूर. शेवटी त्या दोघींच्या मध्ये मलाच झोपायला पुरेशी जागा मिळत नसे.

सोनाली आणि रूपाली लहान होत्या तोपर्यंत रूपालीच अंगापिंडानं मोठी होती. वयानं तर ती सोनालीपेक्षा चांगली सात दिवसांनी मोठी. त्यामुळे ती सोनालीवर ताईगिरी करी. सोनालीवर गुरगुरे, तिला दमात घेई. सोनाली बिचारी गरीब. रूपाली तिच्यावर गुरगुरली, की बापडी कोपऱ्यात जाऊन निमूट बसे.

पण दोघी वाढू लागल्या आणि सारं दृश्यच बदललं. रूपाली लहानखुरी राहिली आणि सोना बघता बघता तिच्या दुप्पट-चौपट झाली. ती रूपालीला सहज तोंडात उचलून धरी; पण सोनालीचे दात कधी रूपालीला लागले नाहीत. रूपालीने मात्र आपला ताईपणा शेवटपर्यंत सोडला नाही. सोनाली फार वाह्यातपणा करू लागली, की रूपाली गुर्र करून दटावीत असे.

मुंबईहून दोघींसाठी गळपट्टे व साखळ्या आणल्या. लहानपणापासून जर त्यांना साखळीची सवय लावली नाही; तर मोठेपणी ही जनावरं साखळी घालू देत नाहीत. घराच्या गच्चीवर सोनालीचं बिऱ्हाड थाटलं.

गच्चीवर मी नेहमी दोघींना मोकळं ठेवत असे. पुढे गच्चीवर सोनाली आणि रूपाली मोकळेपणानं खेळू लागल्या, एकमेकींचा पाठलाग करू लागल्या. माझ्या पायांतून पळू लागल्या; पण सिंहकन्या, एक श्वानकन्या आणि एक डॉक्टर कन्या असा हा अवर्णनीय सामना. मला त्या वेळी कोणत्याच गोष्टींचे भान राहत नसे. एक विलक्षण अवर्णनीय आनंद मी लुटत असे, अगदी भरभरून. याच गच्चीवर त्या दोघी पहिल्या पावसाळ्यात नाचल्या होत्या. फारच जोराचा पाऊस आला म्हणजे मात्र सज्जाचा आडोसा त्या घेत. एरवी साऱ्या गच्चीवर पावसात हुंदडत.

जळगावला बॅडमिंटन टूर्नामेंटस् होत्या. सोनालीला घेऊन मी कोर्टावर गेलो. तिथे माझे मित्र डॉ. आठवले आपल्या अल्सेशियन कुत्र्याला घेऊन आले होते. चांगला उंच व दांडगा कुत्रा होता तो. त्याची व सोनालीची गाठ पडली. आधी त्या कुत्र्याला हे मांजराचं पिल्लू आहे असं वाटलं असावं. तो तिच्या अंगावर धावला. सोनाली त्याच्यापुढे फारच लहान दिसत होती; पण किंचितही न घाबरता ''फिस्'' करून ती त्याच्या अंगावर धावली, मग मात्र तो अल्सेशियन कुत्रा पळू लागला व सोनाली त्याचा पाठलाग करू लागली. कोर्टावरील साऱ्या खेळाडूंना हा प्रकार पाहून मजा वाटली.

रूपालीच्यापेक्षा सोनालीची वाढ एकदम झपाट्याने झाली. ती चांगलीच मोठी दिसू लागली. वाढत्या वयाप्रमाणे सोनालीच्या आहारातही मी वाढ केली. आता सोनाली पाच महिन्यांची झाली होती.

सोनालीचं जेवण तीनदा होत असे. सकाळी नाश्ता. नाष्ट्यासाठी तिला दूध व अंडी देत होतो. दुपारी जेवताना मी तिला खिमा देत असे. रात्री मात्र सोनाली शुद्ध शाकाहारी जेवण घेत असे. दूधपोळी, नाहीतर दूधभाताचं आणि त्यासाठी मग ती आमच्या गंगूबाई स्वयंपाकिणीशी लाडीगोडी लावी. जेवायची वेळ झाली, की ती स्वयंपाकघरात जाई आणि स्वयंपाकीणबाईच्या पायांत घोटाळत राही. त्यांच्याभोवती फिरत राही. तोंडानं लाडिक ''आव आव'' करत त्यांच्याकडे जेवणाची मागणी करी; पण तिचं जेवण ताटलीत टाकलं, की ती गुरगुरायला लागे. ताटली खाली ठेवली, की ताटलीवर तुटून पडे. जिभेनं ताटली चाटून पुसून साफ करून होईपर्यंत तोंडानं तिची गुरगुर चालूच राही. दूधपोळी नि दूधभात खाणारी जगातली ती एकमेव सिंहीण असावी.

तिला व रूपालीला मी मोटारीतून बाहेर फिरायला नेऊ लागलो. दोघींची मोटारीतून बसायची जागाही पक्की ठरलेली. ड्रायव्हरच्या शेजारची सीट ही त्यांची जागा. जाणाऱ्या येणाऱ्यांकडे दोघी खिडकीतून टक लावून पाहत राहत. दोघींचे

पुढील पंजे दाराच्या बाहेर ऐटीत टाकलेले असत. बैलगाड्या, टांगे, गुरं यांकडे ही जोडी डोळे विस्फारून पाहत असे.

आता सोनाली वर्षाची झाली होती. तिची उंची वाढली होती. अंगात ताकद आली होती. साखळी लावल्यानंतर आम्ही तिला न्यायच्याऐवजी तीच आम्हांला ओढू लागली होती. आता ती पूर्ण आहार घेत असे. रोज साडेतीन किलो मटण तिला लागत असे. रात्री एक लिटर दूध आणि चार पोळ्या आम्ही तिला देत असू. फार आवडीने ती त्या खायची. अर्थात प्रत्येक वेळी तिला बरोबर रूपाली लागत असे. रूपाली नसली तर सोनाली जाळीच्या दरवाजावर पंजे मारत असे. मी तिला माझ्या हातानं खायला देत असे.

दवाखान्याच्या कामामुळे मला कधी कुठं जावं लागेल याचा नेम नसे. मग माझ्या अनुपस्थितीत अण्णांकडे किंवा गड्याकडे सोनालीच्या जेवणाची व्यवस्था असे. तशी सवय करणं आवश्यक होतं.

अण्णा प्रथम जाळीच्या दरवाजाच्या आत बसून चिमट्याने तिला खाऊ घालत. कधीकधी गच्चीच्या कठड्यात असलेल्या सिमेंटच्या जाळीमधून खाऊ घालत. असं करून त्यांचा विश्वास वाढला आणि स्वत: हातानं तिला खाऊ घालावं असं त्यांनी ठरवलं; पण एकदा त्यांना विचित्र अनुभव आला. त्या दिवशी दवाखान्यात मला काम होतं. सोनालीला जेवू घालण्याचं काम मी अण्णांकडे सोपवलं. जेवणाचा डबा घेऊन अण्णा नेहमीप्रमाणे जाळीच्या दरवाजाजवळ आले. डबा दरवाजाजवळ हॉलमध्ये ठेवून दार उघडून ते गच्चीवर सोनालीकडे गेले. दरवाजा गच्चीकडून त्यांनी बंद केला. गच्चीवर गेल्याबरोबर सोनाली त्यांच्या मागे मागे गेली. तिला वाटलं त्यांनी जेवणाचा डबा आणला आहे; परंतु त्यांच्याजवळ खाणं नाही हे लक्षात येताच सोनाली परत दरवाजाकडे धावत गेली.

सोनाली त्यांच्या अंगावर गुरगुरू लागली; पण अण्णांना तिच्या गुरगुरण्याचा अर्थ कळला नाही. तिला उद्‌देशून ते म्हणाले, ''सोना, थांब मी डबा आणतो, बाजूला हो.'' असं ते दरवाजापाशी जाताच सोनालीने एक मोठी डरकाळी फोडली.

सोनालीची डरकाळी साऱ्या बंगल्याच्या आवारात घुमली. काय झालं आहे ते कोणालाच कळेना. मी हातातलं काम टाकून दरवाजाजवळ धावत गेलो. तोच ''शांताराम धाव'' अशी अण्णांची हाक ऐकू आली. मी प्रत्यक्ष तेथे पोहोचलो तेव्हा अण्णा सोनालीला ''चूप राहा'' असं सांगत होते.

मी पाहिलं, तर सोनालीचा आवेश फारच भयंकर होता. मी घाईघाईनं लोखंडाची पट्टी घालून जाळीचा दरवाजा उघडला व जेवणाचा डबा घेऊन गच्चीवर प्रवेश केला; परंतु नेहमी खाण्यासाठी लाडीगोडी करणारी सोनाली आज इतकी रागावलेली होती, की तिनं उडी मारून माझ्या हातातला डबा पंजाने फटकारा मारून दूर उडवला. मटण गच्चीवर इतस्तत: पसरलं. ती गुरगुर करत त्यावर तुटून पडली. पंधरा-वीस मिनिटांत तिनं सर्व फस्त केलं. खाल्ल्यावर सोनाली शांत झाली आणि येऊन माझे पाय चाटू लागली. जणू काही झाल्या प्रकाराबद्‌दल ती आमची क्षमाच मागत होती.

अण्णांना मी म्हणालो, ''जेवताना पशूंना कोणी फसवलं, त्यांची खोडी काढली अथवा थोडा विलंब जरी लागला तरी ते त्यांना सहन होत नाही.''

सोनालीच्या दातांत विलक्षण ताकद आली होती. एकदा नेहमीप्रमाणे सोनालीला मी रात्री पितळी पातेल्यामधून दूध प्यायला दिलं. तेवढ्यात कोणीतरी आलं म्हणून मी तसाच उठलो. पातेलं परत न्यायचं विसरलो. इकडे सोनालीने दूध पिऊन झाल्यावर पातेलं चावायला सुरुवात केली. रात्रभर तिची त्या पातेल्याशी मस्ती चालू होती. सकाळी उठल्यावर मी गच्चीवर गेलो. पाहतो तर त्या पितळी पातेल्याची सोनालीने अक्षरश: चाळणी केली होती. वन्यपशूंच्या दातांत केवढी ताकद व चिवटपणा असतो. याचा मला अनुभव आला. सोनालीनं चाळण केलेलं ते पातेलं मी अजूनही जपून ठेवलं आहे.

सोनाली आता आमच्या घरच्यापैकी एक झाली होती. सोनालीचा जसा रूपालीवर जीव तसा दीपालीवरही होता. दीपाली सोनालीच्या जाळीपाशी जायची व आपल्या बोबड्या आवाजात ''छोना, छोना तू काय कत्ते?'' असं म्हणून तासन्‌तास तिच्याशी खेळत असायची. एकदा दोघी अशा खेळत असताना एक पेशंट तिथं आला, त्याला वाटलं पोर चुकून सिंहिणीपाशी आली. त्यानं घाईघाईनं दीपालीला उचललं. त्यासरशी सोनाली मोठ्याने फिसकारली व त्या गृहस्थाच्या

अंगावर धावली. तिचं अवसान पाहून त्यानं दीपालीला तेथेच टाकलं.

आतल्या बाजूला अण्णा होते. सोनालीचा आवाज ऐकून अण्णा स्वयंपाकघरातून बाहेर आले व म्हणाले, ''काय रे, काय झालं?''

''दीपा सिंहाच्या तावडीत सापडली आहे,'' त्यानं अण्णांना सर्व प्रकार सांगितला.

''तू पुन्हा दीपालीला उचल, मी पाहतो.'' अण्णा म्हणाले. पुन्हा तो गृहस्थ गेला. दीपाली जाळीपाशीच होती. त्यानं पुन्हा दीपालीला हात लावताच सोनाली पुन्हा पहिल्यासारखीच चवताळून या गृहस्थाच्या अंगावर धावली.

अण्णांनी मग सोनालीला शांत केलं. दीपाली ही आपल्या घरची आहे आणि तिला कोणी इतरांनी उचलता कामा नये, ही मोठी जाणीव सोनालीला झाली होती. अण्णांनी एका हातात दीपालीला घेतलं व दुसऱ्या हातानं प्रेमळपणे सोनालीला थोपटलं.

आम्ही येणार, सोनालीला घेऊन येणार ही बातमी पुण्याच्या पेपरमध्ये आली होती. आमची वाट पाहत शेकडो पुणेकरांनी आधीच 'कॅफे गुडलक'च्या चौकात गर्दी केली होती. येणारा जाणारा विचारे, ''काय हो, कोण येणार आहे?''

मग फूटपाथवरील एखादा तरुण सांगू लागे, ''अहो, मोटारीतून सिंहीण येणार आहे.''

''उघड्या मोटारीतून?''

''मग, आम्ही काय खोटं सांगतोय काय?''

पाहता पाहता गर्दी वाढू लागली.

सोनाली आली. गर्दीत एकच उत्साहाची लाट आली. प्रत्येकजण सोनालीला पाहण्यासाठी धडपडत होता. मान उंच करून, टाचा वर करून लोक पाहत होते; पण जरा दुरूनच लोकांना पाहण्यासाठी सोनालीला व रूपालीला आवारातच साखळ्यांनी बांधून ठेवलं. दोघींना खूप तहान लागली होती, म्हणून बरोबर आणलेल्या दगडीतून त्यांना पाणी पाजलं. जमलेल्या बघ्यांपैकी कुणी अंडे आणलं, कुणी दूध आणलं होतं. वेळ रात्रीची होती. मी अतिशय थकलो होतो; पण मला झोप येईना. उठल्या उठल्या मी कमिशनरना फोन केला. ''सोनाली आली आहे'' म्हणून सांगितलं.

पेशवे बाग. शेवटचा टप्पा. तिथेही स्त्री-पुरुष, लहान मुलं यांची गर्दी. महापौरांनी सोनालीचा औपचारिक स्वीकार केला. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आता तिला आतल्या पिंजऱ्यात सोडायचं होतं, म्हणून सोनालीच्या गळ्याभोवती असलेला माझा पट्टा व साखळी मी सोडली. माझी सोनालीवरची प्रेमाची मालकी संपली. अण्णा कसेबसे अश्रू आवरून धरत होते. दु:खाचा एकेक कढ आवंढ्याबरोबर मी गिळत होतो. सारेच अधिकारी व प्रेक्षक स्तब्ध होते. काय बोलावं तेच मला समजेना. सोना आतल्या पिंजऱ्यात जायला तयार नव्हती. मी आत गेलो, की ती आतल्या पिंजऱ्यात येई. मी बाहेर आलो, की ती बाहेर येई. आता फसवायचं होतं. फसवूनच तिला आत कोंडणं शक्य होतं, म्हणून रूपालीला मी प्रथम आतल्या पिंजऱ्यात पाठवली. तिच्या पाठोपाठ सोनाली पिंजऱ्यात गेली. मी दरवाजा बंद केला, मग पिंजऱ्याचा दरवाजा थोडासा उघडून रूपालीला बाहेर ओढलं व चटकन दरवाजा लावला.

सोनाली एकटीच पिंजऱ्यात राहिली. मुकेपणानं प्रेम करणारी रूपाली पिंजऱ्यासमोर उभी राहून डोळे भरून तिच्याकडे पाहत होती. रूपाली बाहेर, मी बाहेर, अण्णा बाहेर. सोनाली आळीपाळीने आमच्याकडे पाहत होती. ते गज, ती कडीकुलपं...सोनाली बिथरली. गरगरा फिरू लागली. मोठ्याने ओरडू लागली. पिंजऱ्याबाहेर येण्यासाठी धडपडू लागली.

जड अंत:करणाने मी पिंजऱ्याकडे पाठ फिरवली आणि मुकाट्याने गाडीत जाऊन बसलो.

## कृती

**(१) आकृत्या पूर्ण करा.**

(अ) लेखकाने निवडलेल्या पिलाची वैशिष्ट्ये

(आ) सोनाली आणि रूपाली यांची झोपण्यापूर्वीची दंगामस्ती

**(२) तुलना करा.**

| सोनाली | रूपाली |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

**(३) खालील वाक्यांतून दिसणारे सोनालीच्या स्वभावाचे पैलू लिहा.**

(अ) सोनालीचे दात कधी रूपालीला लागले नाहीत–

(आ) रूपाली सोबत नसली तर सोनाली जाळीच्या दारावर पंजे मारी–

(इ) सोनालीने एक मोठ्ठी डरकाळी फोडली–

(ई) सोनाली शांत होऊन लेखकाचे पाय चाटू लागली–

(उ) मोठ्ठ्याने फिस्कारून सोनाली गृहस्थाच्या अंगावर आली–

(ऊ) सोनाली आळीपाळीने आमच्याकडे पाहत होती–

**(४) पुढील घटना केव्हा घडल्या ते लिहा.**

| घटना | घटना केव्हा घडली |
|---|---|
| (अ) सोनाली अण्णांवर रागावली. | |
| (आ) सोनालीने पातेल्याची चाळणी केली. | |
| (इ) सोनाली गृहस्थाच्या अंगावर धावली. | |
| (ई) सोनाली बिथरली, गरागरा फिरू लागली. | |

**(५) सोनाली आणि रूपाली यांच्यातील मैत्री दर्शवणाऱ्या त्यांच्या दोन सवयी लिहा.**

**(६) खालील वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

(अ) डोळे विस्फारून बघणे–

(आ) लळा लागणे–

(इ) तुटून पडणे–

(ई) तावडीत सापडणे–

**(७) स्वमत.**

(अ) सोनाली व दीपाली यांच्यातील जिव्हाळा व्यक्त करणारा प्रसंग तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) 'पशूंना कोणी फसवलं, तर त्यांना राग येतो', यासंबंधी तुम्ही अनुभवलेली एखादी घटना तुमच्या शब्दांत सांगा.

## भाषाभ्यास

### द्‌वंद्‌व समास

- **खालील वाक्ये वाचा आणि त्यातील सामासिक शब्द ओळखा.**

(अ) ती दोघे बहीणभाऊ आहेत.

(आ) खरेखोटे समजल्याशिवाय अभिप्राय देऊ नये.

(इ) कष्टाची मीठभाकर आयत्या पक्वानापेक्षा गोड लागते.

**ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्ट्या प्रधान असतात, त्याला 'द्‌वंद्‌व समास' असे म्हणतात.**

**द्‌वंद्‌व समासाचे एकूण तीन प्रकार आहेत.**

(१) इतरेतर द्‌वंद्‌व समास (२) वैकल्पिक द्‌वंद्‌व समास (३) समाहार द्‌वंद्‌व समास

### (१) इतरेतर द्‌वंद्‌व समास–

- **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

उदा., आईवडील–आई आणि वडील.

(अ) नाकडोळे

(आ) सुंठसाखर

(इ) कृष्णार्जुन

(ई) विटीदांडू

**ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि', 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्या समासाला 'इतरेतर द्‌वंद्‌व' समास म्हणतात.**

- **इतरेतर द्‌वंद्‌व समासाची वैशिष्ट्ये**

(अ) अर्थासाठी दोन्ही पदांची अपेक्षा असते.

(आ) या समासाचा विग्रह करताना 'आणि', 'व' ही समुच्चयबोधक अव्यये वापरावी लागतात.

**(२) वैकल्पिक द्वंद्व समास–**

- **खालील वाक्ये वाचा आणि त्यातील सामासिक शब्द ओळखा.**

उदा., बरेवाईट प्रसंग सगळ्यांच्याच जीवनात येतात.

बरेवाईट – बरे किंवा वाईट

(अ) कुठलीही गोष्ट स्वीकारण्यापूर्वी सत्यासत्याचा विचार करावा.

(आ) सभेला चारपाच माणसेच उपस्थित होती.

**ज्या समासाचा विग्रह करताना 'किंवा', 'अथवा', 'वा' या विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययाचा उपयोग करावा लागतो, त्यास 'वैकल्पिक द्वंद्व समास' असे म्हणतात.**

- **वैकल्पिक समासाची वैशिष्ट्ये**

(अ) दोन्ही प्रधान पदांपैकी एकाचीच अपेक्षा असते.

(आ) समासाचा विग्रह करताना 'किंवा', 'अथवा', 'वा' यांपैकी एखादे विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय वापरावे लागते.

**(३) समाहार द्वंद्व समास–**

उदा., सहलीला जाताना पुरेसे अंथरुण-पांघरुण सोबत घ्यावे.

अंथरुण-पांघरुण– अंथरण्यासाठी व पांघरण्यासाठी लागणाऱ्या वस्तू व इतर कपडे.

- **खालील वाक्ये वाचा व त्यांतील सामासिक शब्द ओळखा.**

(अ) कोपऱ्यावरच्या मंडईत भाजीपाला चांगला मिळतो.

(आ) गरिबास कपडालत्ता द्यावा, अन्नपाणी द्यावे.

**ज्या समासातील पदांचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश केलेला असतो, त्यास 'समाहार द्वंद्व समास' असे म्हणतात.**

- **समाहार द्वंद्व समासाची वैशिष्ट्ये**

(अ) समासातील पदांचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही समावेश केलेला असतो.

(आ) समासात आलेल्या आणि त्या जातीच्या इतर वस्तूंच्या समुदायाला महत्त्व असते, म्हणून हा समास एकवचनी असतो.

- **तक्ता पूर्ण करा.**

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| पालापाचोळा | | |
| केरकचरा | | |
| तीनचार | | |
| खरेखोटे | | |
| कुलूपकिल्ली | | |
| स्त्रीपुरुष | | |

DDBAVZ


# १८. निर्णय

**डॉ. सुनील विभुते (१९५९) :**

प्राध्यापक व लेखक. त्यांचे विविध वर्तमानपत्रांतून आणि नियतकालिकांतून विज्ञान विषयांवर १८० हून अधिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची 'किस्से शास्त्रज्ञांचे', 'विस्मयकारी विज्ञान कथा' ही पुस्तके प्रकाशित आहेत. तसेच त्यांच्या विज्ञानविषयक सहा कथांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत. पुणे, सोलापूर, उस्मानाबाद या आकाशवाणी केंद्रांवरून त्यांच्या पर्यावरण, प्रदूषण व वैज्ञानिक विषय यांवर आधारित ८० हून अधिक व्याख्यानांचे प्रसारण झालेले आहे.

प्रस्तुत पाठात वेटर म्हणून काम करणारा रोबो हा यंत्र आहे. त्याला दिलेले काम उत्तम करता येईल; पण त्याला विचार करता येणार नाही, त्याला भावना नसतात, तो दुसऱ्याचे दुःख, संकट समजून घेऊ शकत नाही. उलट मानव हा संवेदनशील व भावनिक आहे. तो दुसऱ्याच्या भावना समजून घेऊ शकतो. पाठातील संकटात सापडलेल्या स्त्रीला रोबो वाचवू शकत नाही. प्रामाणिक व प्रसंगावधानी मनोजच तत्परतेने तिच्या मदतीला धावून जातो, तिचे प्राण वाचवतो. यंत्र हे यंत्रच आहे, ते माणसाची जागा घेऊ शकत नाही, असा संदेश आपणास या पाठातून मिळतो.

न्यू एज रोबो कंपनीचा एजंट आम्हांला लॅपटॉपवर माहिती सांगत होता. 'हॉटेल व्यवसायाच्या गरजा लक्षात घेऊन वेटर, आचारी, स्वीपर, मॅनेजर असे वेगवेगळे यंत्रमानव म्हणजेच रोबो आम्ही बनवले आहेत. आम्ही बनवलेले रोबो हुबेहूब माणसाप्रमाणे दिसतात आणि वागतातही. एका रोबोची किंमत एक लाख रुपये आणि दर दोन महिन्यांना सर्व्हिसिंगचे अडीच हजार रुपये. लाखाची गोष्ट निघाल्याबरोबर सोमनाथ पटकन उठत मला म्हणाला, ''राजाभाऊ, उठा आता, हे काही आपल्याला परवडणार नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे रोबो वेटरची सर्व कामं करणं कसं शक्य आहे?'' सोमनाथप्रमाणे माझाही त्या एजंटवर विश्वास बसत नव्हता. फक्त पाच मिनिटं.. माझं म्हणणं तुम्ही ऐकून घ्या. माझ्या सांगण्यावर तुमचा विश्वास बसत नाही; पण आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाचा हा चमत्कार आहे. मोठमोठ्या शहरांतील हॉटेलमध्ये अनेक रोबो काम करत आहेत. आमच्या रोबोबाबत वेटरच्या खाण्यापिण्याचा, पगाराचा, कामचुकारपणाचा विचार करण्याची गरज नाही. आमचा रोबो वेटर मानवी वेटरपेक्षा दुप्पट काम करेल आणि तुम्हांला दुप्पट कमाई करून देईल याची मी खात्री देतो.'' एजंटच्या शेवटच्या वाक्याने आम्ही विचार करू लागलो.




मी आणि माझा बालमित्र सोमनाथ ऊर्फ सोमा दोघे मिळून गेली चार वर्षे हॉटेल चालवतो आहोत. शहराच्या बाजारपेठेत असणारे आमचे 'हॉटेल हेरिटेज' चांगले प्रशस्त आहे. हॉटेलचा कोणताही प्रश्न आम्ही चुटकीसरशी सोडवतो; पण याला अपवाद म्हणजे वेटरचा प्रश्न. आमच्या हॉटेलमध्ये अनेक वेटर आले आणि गेले; पण त्यांच्या कटकटी कायम होत्या. कामचुकारपणा, अचानक दांड्या मारणे, भांडणं करणे अशा तक्रारींमुळे आम्ही हैराण झालो होतो. 'वाळवंटातील हिरवळ' म्हणून नमूद करण्यासारखी एक बाब म्हणजे आमचा एक वेटर मनोज बराच काळ आमच्याकडे टिकून आहे. मन्यामध्ये बाकी अनेक दुर्गुण असले तरी प्रामाणिकपणा आणि प्रसंगावधान हे अभावाने दिसणारे गुण त्याच्यामध्ये आहेत, म्हणून आम्ही त्याला टिकवून धरलं आहे.

वेटरचा प्रश्न कायमचा निकालात काढण्यासाठी आम्ही चार रोबो वेटर खरेदी केले. मी आणि मनोजने त्यांना

रामू, शामू, दिपू व विजू अशा हाका मारण्यास सुरुवात केली. आमचे दिवस बघता बघता पालटले. हॉटेल बंद केल्यानंतर रात्री अकरा ते सकाळी सहापर्यंत चारही वेटरचे चार्जिंग मी करत होतो. सकाळी सहा वाजता त्यांच्या अंगावर कडक इस्त्रीचे कपडे चढवले आणि त्यांच्या डाव्या खांद्यावरील पॉवर स्वीच सुरू केला, की ते 'गुड मॉर्निंग, सर' म्हणून कामाला लागायचे. हॉटेलच्या सर्व कामांचा समावेश असलेले मेमरी कार्ड त्यांच्या डोक्यात बसवलेले असल्यामुळे सर्व कामे ते न सांगता करत. कंपनीची सर्व्हिस चांगली होती. दर दोन महिन्यांनी सर्व्हिस इंजिनियरची भेट ठरलेली असे. वेटर सर्व्हिसिंगच्या वेळी मी स्वत: हजर राहून इंजिनियरकडून बऱ्याच गोष्टी शिकून घेतल्या. हॉटेलमधील स्वच्छता, टापटीप, विनम्र व तत्पर सेवा यांचा परिणाम आम्हांला दोन-तीन महिन्यांत जाणवू लागला. दिवसेंदिवस आमची कमाई वाढू लागली.

दुसरं वर्ष सुरू झालं. कंपनीने आम्हांला सांगितलं, ''यापुढे एका वेटरच्या सर्व्हिसिंगला अडीच ऐवजी पाच हजार रुपये पडतील.'' सर्व्हिसिंगची दुप्पट फी आम्हांला परवडण्यासारखी नव्हती. इंजिनियर सर्व्हिसिंगच्या वेळी जे करतो ते आपण करू शकतो आणि रोबोचे मेकॅनिक आता आपल्या शहरात आहेत, त्यामुळे किरकोळ दुरुस्तीला अडचण येणार नाही, असा विचार करून आम्ही कंपनीची सर्व्हिस घेणं बंद केलं. एवढंच नव्हे, तर सर्व रोबो वेटरचं एक सर्व्हिसिंग मी स्वत: केलं. विशेष म्हणजे सर्व वेटरचं काम महिनाभर सुरळीत चालू होतं. त्यामुळे आपण वीस हजार रुपये वाचवले याचा मला आनंद वाटत होता; पण हा आनंद जास्त काळ टिकला नाही.

त्या दिवशी दुपारी एकची वेळ होती. लंच सेक्शनमधून गोंधळ ऐकू येऊ लागला. सोमाला काऊंटरवर बसवून मी लंच सेक्शनमध्ये गेलो. शामूकडं बोट दाखवून दोघं-तिघं तावातावाने म्हणाले, ''काय मालक? हे कासव कोठून आणलं? तो किती सावकाश काम करतो बघा.'' त्यांचं बोलणं पूर्ण होण्याआधीच टोपी घातलेला एक जण राजूकडे बोट दाखवून म्हणाला, ''पंधरा मिनिटाअगुदर बेणं माजलेल्या वळूगत हुंदडत हुतं, मला जेवणाचं ताट दिलं आन त्याच्या अंगातलं अवसान गळालं बघा.'' त्यांचं बोलणं संपलं, की कोपऱ्यातील टेबलला बसलेली बाई तिच्या मांडीवरील बाळाकडं बोट करून म्हणाली, ''माझ्या तान्ह्या पोराला भूक लागली म्हणून त्याला एक कप दूध आणायला सांगितल हुतं...एक घंटा उलटून गेला तरी अजून दूध आणतोय...पोरगं झोपलंय...म्हणून बरं...नाहीतर एवढ्या येळात माझं पोरगं तीन वेळा रांगत जाऊन दूध पिऊन ढेकरा देत बाहेर आलं असतं...'' परिस्थितीचं गांभीर्य पाहून मी मनोजला लंच सेक्शन सांभाळण्यास सांगितलं आणि शामूला घेऊन किचनमध्ये गेलो. त्याची बॅटरी क्षीण झाली असावी किंवा चार्जिंग कमी झाल्यामुळे त्याच्या हालचाली मंदावल्या असाव्यात असं मला वाटलं, म्हणून त्याच्या पोटावरील 'एनर्जी' अशी अक्षरे असलेले बटण चार-पाच वेळेला दाबले...काय आश्चर्य! शामू पूर्वीसारखा काम करू लागला, हे पाहून माझा आनंद गगनात मावेना. लंच सेक्शनमध्ये शामू मनोजसोबत ठेवून मी काऊंटरला येऊन बसलो.

शामूला दुरुस्त केल्याचा माझा आनंद फार काळ टिकला नाही. मनोज घाबरलेल्या आवाजात मला सांगत आला. ''मालक...लवकर चला तिकडं... सगळ्यांनी गोंधळ घातलाय.'' मी जाऊन पाहिलं, तर शामू भराभर ताटं उचलतो आहे आणि पुन्हा मांडतो आहे. या अनपेक्षित, अनाकलनीय प्रकारामुळे गिऱ्हाईक एकमेकांकडे तर कधी शामूकडे अचंबित... नजरेने पाहत आहेत असे दिसले.

असे प्रसंग पुन्हा घडू नयेत म्हणून दुसऱ्या दिवशी कंपनीत फोन लावून सर्व्हिस इंजिनियरला ताबडतोब बोलावून घेतलं. त्याने आमचे वेटर एका दिवसात दुरुस्त केले. आमच्यावर ओढवलेले विचित्र प्रसंग सांगून सोमाने रोबो वेटरची क्वालिटी चांगली नसल्याचे इंजिनियरला सुनावले. तेव्हा तो म्हणाला, ''आमची सर्व्हिस होती तोपर्यंत सर्व वेटरनी विनातक्रार तुमची सर्व कामे पंधरा-पंधरा तास अखंडपणे केली आहेत. एका वर्षानंतर केवळ पैशांचा विचार करून तुम्ही आमची सर्व्हिस बंद केली आणि त्यानंतरच फजितीचे प्रसंग घडले आहेत. प्रमाणापेक्षा जास्त वापर झाल्यामुळे तुमचे रोबो वेटर निकामी झाले आहेत. आता सर्व्हिसिंग केल्यामुळे ते एक महिना चालतील. नंतर मात्र तुम्हांला नवे वेटर घ्यावे लागतील. नवीन वेटरची क्वालिटी यापेक्षा उत्तम आहे. रिमोट कंट्रोल सिस्टिममुळे तुम्ही लांबून वेटरवर कंट्रोल ठेवू शकाल. आमची सर्व्हिस असेपर्यंत तुम्हांला काडीचाही त्रास होणार नाही, याची खात्री मी देतो. तुमचा निर्णय लवकर

कळवा कारण रोबो वेटरची मागणी खूप वाढली आहे.''

सर्व्हिस इंजिनियरच्या म्हणण्यावर आम्ही बरीच चर्चा केली. रोबो वेटर नको या निर्णयावर सोमा ठाम होता; परंतु मी द्‌विधा मन:स्थितीत होतो. इंजिनियरचं बोलणं आठवलं, की रोबो वेटर घ्यावेसे वाटायचे आणि झालेली फजिती आठवली, की रोबो वेटर नकोसे वाटायचे. अजून एक महिन्याचा अवधी हाताशी होता त्यामुळे सर्व बाजूंनी विचार करून निर्णय घेण्याचं मी ठरवलं.

आता सर्व सुरळीत चाललं होतं; परंतु झालेल्या घटनांचा परिणाम आम्हांला जाणवत होता. कारण हॉटेलमध्ये गिऱ्हाईक जेमतेम येत होतं. शनिवारी दुपारी साडेबाराची वेळ होती. साधारण पस्तिशीची एक स्त्री दोन मुलांसह कारमधून उतरून एसी रूममध्ये गेली. एसी रूमकडे रोबो रामूची ड्युटी होती. तो तत्परतेने आत गेला. एसी सुरू करून त्याने ऑर्डर घेतली. थोड्या वेळाने त्याने ऑर्डर आत नेऊन दिली आणि तो दुसऱ्या कामाला लागला. पाच-दहा मिनिटांनी एसी रूममधून लहान मुलाचा रडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. थोड्या वेळाने तो वाढल्यासारखा वाटू लागला. काही वेळाने एकाऐवजी दोन रडण्याचे आवाज ऐकू येऊ लागले तेव्हा मी रामूला एसी रूममध्ये पाहून येण्यास सांगितले. सर्व व्यवस्थित आहे मालक, मॅडम झोपल्या आहेत म्हणून दोन्ही मुलं रडत आहेत असं सांगून तो किचनमध्ये गेला. मला शंका आली म्हणून मी मनोजला एसी रूममध्ये पाठवलं. मनोजने घाबरलेल्या आवाजात आम्हांला हाका मारल्या आणि आम्ही तिकडे धावतच गेलो. बाई चक्कर येऊन बेशुद्‌ध अवस्थेत खाली पडली होती. तिच्या सर्वांगाला घाम सुटला होता, तोंडातून फेस येत होता. मी मनोजला ड्रायव्हरला बोलावून आणण्यास सांगितले. आम्ही तिघांनी त्या बाईला व तिच्या दोन्ही मुलांना गाडीत घालून हॉस्पिटलमध्ये नेलं. डॉक्टरांनी तिला तपासून पुढील उपचार तातडीने सुरू केले. एक-दीड तासानंतर ती बाई शुद्‌धीवर आली. मनोज आणि ड्रायव्हरवर तेथील जबाबदारी सोपवून मी हॉटेलकडे परतलो.

मी त्या बाईंची भेट घेतली. नंतर डॉक्टरांना भेटलो, त्या वेळी डॉक्टर म्हणाले, त्यांची ब्लड शुगर एकदम कमी झाली होती, त्यामुळे त्या बेशुद्‌ध झाल्या. येथे लवकर आणलं म्हणून मी त्यांना वाचवू शकलो, अन्यथा केस हाताबाहेर गेली असती. आता त्यांना कसलाही धोका नाही. त्यांना फक्त विश्रांतीची गरज आहे.''

रात्री अंथरुणावर पाठ टेकल्यावर माझ्या मनात सहज विचार आला. दुपारी एसी रूममध्ये मी मनोजला पाठवलं नसतं तर कदाचित अनर्थ ओढवला असता आणि आमची एवढी नाचक्की झाली असती, की आम्हांला हॉटेल बंद करावं लागलं असतं; पण आमचं दैव बलवत्तर, बाईंचा जीव वाचला.

रोबो वेटर खरेदीपासूनच्या सर्व घटना पाहिल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट होत होती, ती म्हणजे रोबो-वेटरमुळं आम्हांला पैसा मिळाला; पण त्यापेक्षा अधिक बदनामी वाट्याला आली होती. एका कृतीने बदनामीचा कलंक धुतला गेला. दिवसभरात अनपेक्षित घटना घडल्या. आलेल्या प्रसंगाला तोंड देताना आम्ही माणुसकीचा धागा पकडून ठेवला; पण तो व्यवसायाचा एक भाग म्हणून. मनोजने तो धागा उत्स्फूर्तपणे आणि निरपेक्ष रीतीने पकडून ठेवला होता. माणुसकीमुळेच माणूस श्रेष्ठ बनतो हेच खरं. नवीन रोबो वेटर खरेदी करावे की करू नयेत याबद्‌दल बरेच दिवस मी द्‌विधा मन:स्थितीत होतो; परंतु आता माझी द्‌विधा मन:स्थिती कायमची संपली आणि मी शांतपणे कधी झोपी गेलो, हे मलाही समजलं नाही.

**(विस्मयकारी विज्ञानकथा)**

## कृती

**(१) खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) दुकानातील रोबोची वैशिष्ट्ये

(आ) हॉटेलमधील मनोज या वेटरच्या अंगचे गुण

**(२) कारणे लिहा.**

(अ) हॉटेल मालकाने चार रोबो खरेदी केले, कारण ................

(आ) हॉटेल मालकाची द्विधा मन:स्थिती संपली, कारण ................

**(३) रोबोंना कामे करण्यासाठी सज्ज करण्याच्या कृतींच्या घटनाक्रमाचा ओघतक्ता तयार करा.**

(अ) चार्जिंग सुरू करणे.

(आ) ________

(इ) ________

(ई) ________

**(४) खालील शब्दसमूहांचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) वाळवंटातील हिरवळ ________

(आ) कासवगती ________

(इ) अचंबित नजर ________

(ई) द्विधा मन:स्थिती ________

**(५) खालील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ शोधा व लिहा.**

(अ) आनंद गगनात न मावणे–

(१) आनंद हद्दपार होणे.
(२) आकाश हातात न मावणे.
(३) खूप आनंद होणे.
(४) आकाशाशी नाते जडणे.

(आ) काडीचाही त्रास न होणे–

(१) प्रचंड त्रास होणे.
(२) काडीमोड होणे.
(३) अजिबात त्रास न होणे.
(४) खूप त्रास न होणे.

**(६) शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा.**

(अ) अपेक्षा नसताना

(आ) ज्याचे आकलन होत नाही असे

(इ) कुठलीही अपेक्षा न ठेवता

## (७) स्वमत.

(अ) रोबो व माणूस यांच्या वागण्यातील ठळक फरक पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(आ) 'तंत्रज्ञान हे माणसाला पूरक आहे, पर्याय नाही', या विधानाबाबत तुमचे विचार लिहा.

(इ) 'माणसुकीमुळेच माणूस श्रेष्ठ ठरतो', या विधानाचा अर्थ स्पष्ट करा.

**उपक्रम :** 'यंत्रमानवाचा रिमोट माणसाच्या हातात', या विधानाबाबत वर्गात चर्चा करा व चर्चेतील मुद्द्यांचा अहवाल लिहा.

## भाषाभ्यास

- **खालील कृती सोडवा.**

(अ) आला हा दारि उभा वसंत फेरीवाला
पोते खांद्यावरि सौद्याचे, देईल ज्याचे त्याला

(१) वरील उदाहरणातील अलंकार-

(२) त्या अलंकाराची वैशिष्ट्ये- (i)

(ii)

(आ) लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ।
ऐरावत रत्न थोर । त्यासि अंकुशाचा मार ।

(१) संत तुकाराम महाराजांनी वरील अभंगात ज्या दोन गोष्टींची तुलना केली आहे त्या गोष्टी-

(२) वरील उदाहरणातील अलंकार-

(३) या अलंकाराची वैशिष्ट्ये- (i)

(ii)

(इ) संसार सागरी विहरे जीवन नौका

(१) वरील उदाहरणातील उपमेये-

(२) वरील उदाहरणातील उपमाने-

(३) वरील उदाहरणातील अलंकार-

(ई) खालील ओळी वाचून रिकाम्या जागा भरा.

सावळा ग रामचंद्र । रत्नमंचकी झोपतो ।
त्याला पाहता लाजून । चंद्र आभाळी लोपतो ।।

| उपमेय | उपमान | अलंकाराचे नाव | अलंकाराची वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| | | | |

**आई** : तुषार, अरे तुषार आवर लवकर. आपल्याला किराणा सामान खरेदी करायला जायचं आहे. थोडे कपडेही खरेदी करायचे आहेत, चल आवर लवकर.

**तुषार** : आई, आज नको ग. मला खूपच कंटाळा आला आहे. आज मला सुट्टी आहे. खरेदीला गेलो, तर मला खेळायलाही मिळणार नाही.

**आई** : अरे, असं काय करतोस. आपण लवकर परत येऊ.

**वडील** : (तुषारच्या आईस) अग, तुझा आणि तुषारचा खरेदीसाठी कशाला वेळ घालवतेस. आजकाल सर्व वस्तूंची खरेदी घरबसल्या करता येते. ऑनलाइन खरेदी कशी करायची ते मी तुला शिकवतो. यामुळे तुझा वेळ आणि श्रमही वाचतील. प्रयत्न करशील, तर तूही नक्कीच शिकशील.



**आई** : अहो, तुमचेही बरोबर आहे. घरबसल्या ऑनलाइन खरेदी केल्याने कितीतरी कामे सोपी होत आहेत. मला माझ्या कामाच्या पद्धतीत बदल केलाच पाहिजे. आजपासून मीही ऑनलाइन खरेदी करण्याचा नक्कीच प्रयत्न करणार आहे.

**वडील** : बरोबर आहे. काळानुरूप प्रत्येकानेच नवनवीन बदल स्वीकारले पाहिजेत.

# १९. तू झालास मूक समाजाचा नायक

**ज. वि. पवार** (१९४४) :

प्रसिद्ध कवी, कादंबरीकार. १९६६ नंतरच्या दलित साहित्य चळवळीतले प्रमुख लेखक. 'बलिदान' ही कादंबरी; 'नाकेबंदी' हा काव्यसंग्रह; 'वडवानल' ही दीर्घ कविता; 'उच्छ्वास युगंधराचे', 'अस्तित्वाच्या रेषा', 'सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर' ही संपादने; 'आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ' हा राजकीय विश्लेषणाच्या स्वरूपाचा लेखसंग्रह इत्यादी त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्याचा जो सत्याग्रह केला त्या घटनेला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रूढ, सामाजिक परंपरा नाकारून नव्या समाजाची जडणघडण केली. अशा या समाजाच्या नायकाला कवितेतून विनम्र अभिवादन केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाचे वर्णन या कवितेत करण्यात आले आहे.

तू निघालास तेव्हा काळोखाचं राज्य होतं.
सूर्यफुलांनी पाठ फिरविली होती.
मळवाटेने जायचे नाकारलेस तेव्हा
खाचखळग्यांनी तुझे स्वागत केले.

तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत.

तू फुंकलेस रणशिंग अगाध ज्ञानाच्या बळावर
तू तोडल्यास गुलामांच्या पायांतल्या बेड्या
आणि केलेस उभे चवदार तळ्याच्या काठावर
युद्धात जवानांना उभे करावे तसे.

तुझे शब्द जसे की
महाकाव्ये तुझ्या पायाजवळ गळून पडावीत
तुझा संघर्ष असा की
काठ्यांच्या संगिनी व्हाव्यात.
तुझ्या डरकाळीने हादरलं आकाश; डचमळली पृथ्वी
आणि बघता बघता चवदार तळ्याला आग लागली.

आज पन्नास वर्षांनी अनुभवतोय
सूर्यफुले तुझा ध्यास घेतायत
बिगूल प्रतीक्षा करतोय
चवदार तळ्याचं पाणी, तेही आता थंड झालंय.

(नाकेबंदी)

## कृती

**(१) खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाकारलेली गोष्ट- [ ]

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वागत करणारे- [ ]

(आ) **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य**

[ ] [ ] [ ] [ ]

**(२) कवितेतील संदर्भ आणि स्पष्टीकरणे यांच्या जोड्या लावा.**

| कवितेतील संदर्भ | स्पष्टीकरण |
|---|---|
| (१) मळवाट | (अ) अन्यायाविरुद्‌ध आवाज उठवू न शकणारा समाज |
| (२) खाचखळगे | (आ) पारंपरिक वाट |
| (३) मूक समाज | (इ) अडचणी, कठीण परिस्थिती |

**(३) चवदार तळ्याच्या घटनेनंतरच्या पन्नास वर्षांत वातावरणात झालेल्या बदलाचे वर्णन करणाऱ्या ओळी लिहा.**

**(४) चवदार तळ्याच्या घटनेसंदर्भाने तुलना करा.**

| पन्नास वर्षांपूर्वीची परिस्थिती | पन्नास वर्षांनंतरची परिस्थिती |
|---|---|
| .................... | .................... |
| .................... | .................... |
| .................... | .................... |

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) 'तुझे शब्द जसे की
महाकाव्ये तुझ्या पायाजवळ गळून पडावीत
तुझा संघर्ष असा की
काठ्यांच्या संगिनी व्हाव्यात.', या ओळींचे रसग्रहण करा.

(आ) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कवितेतून जाणवलेले कर्तृत्व तुमच्या शब्दांत लिहा.

(ई) अगाध ज्ञानाच्या बळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य, तुमच्या शब्दांत थोडक्यात लिहा.

DDU2ZA

# २०. सर्व विश्वचि व्हावे सुखी

**डॉ. यशवंत पाठक** (१९४८) :

ललित लेखक व प्राध्यापक. मराठी संतसाहित्य आणि लोकजीवन, लोककला व लोकसंस्कृती या गोष्टींशी असलेल्या आंतरिक जिव्हाळ्यातून डॉ. पाठक यांचे सर्व लेखन निर्माण झाले आहे. 'नाचू कीर्तनाचे रंगी', 'ब्रह्मगिरीची सावली', 'मातीचं देणं' हे ललित लेखसंग्रह; 'नक्षत्रांची नाती' हे व्यक्तिचित्र; 'स्पंदने श्रीसमर्थाची', 'तुकारामांचे अभंग', 'निरंजनाचे माहेर' ही समीक्षात्मक पुस्तके; 'आभाळाचे अनुष्ठान' हा कथासंग्रह इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. पुणे विद्यापीठाच्या ज्ञानेश्वर अध्यासनाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे.

'हे विश्वचि माझे घर' या संत ज्ञानेश्वरांच्या वचनाचा प्रत्यय आज तंत्रयुगात आपण घेत आहोत. दळणवळण आणि संपर्काच्या आधुनिक साधनांनी 'वैश्विक खेड्याची' संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. गाव ते जग या स्तरावर माणूस माणसाला भेटतो. तो जवळ यावा, जोडला जावा. एकेक माणूस जोडला, माणसे मनाने जवळ आली, की अवघी मानवता सुखी होईल. संतांच्या वाङ्मयातील हाच विचार अतिशय परिणामकारकरीत्या प्रस्तुत पाठात मांडला आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत म्हणजे सत्पुरुष. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती परउपकारें ।' ही संतांची खरी भूमिका आहे. संतांच्या साहित्याचा आत्मा भक्तीबरोबरच समाजप्रबोधन, समाजकल्याण हा आहे. संत परमेश्वराकडे स्वत:साठी काहीही मागत नाहीत; परंतु 'बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणउनि ।।' यासाठी श्री चक्रधर स्वामी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, वारकरी संप्रदायातील सर्व संत, संत कबीर, गुरुनानक, संत महात्मा बसवेश्वर अशा सर्वच संतांनी आपल्या साहित्यातून विश्वकल्याणासाठी परमेश्वराकडे, गुरूंकडे साकडे घातले आहे.

संत ज्ञानेश्वरांपासून अगदी आधुनिक संत गाडगेबाबा यांच्यापर्यंत सर्वच संतांच्या प्रार्थना म्हणजे मानवतेचा आविष्कार आहेत. त्यांच्या प्रार्थनेमध्ये विश्वकल्याण, माणुसकी व सहृदयता यांचे प्रतिबिंब दिसते. माणसाच्या मनातील माणुसकीचा झरा जिवंत असेल तरच विश्वकल्याण शक्य आहे, कारण 'मी' पासून 'आम्ही' या संकल्पनेप्रमाणे 'अवघे विश्वचि माझे घर', 'वसुधैव कुटुम्बकम्' या संकल्पना संतांच्या साहित्यातून प्रकट झाल्या आहेत. सर्व संतांच्या प्रार्थनेतील साधर्म्याचा धागा 'विश्वकल्याण' याचा परिचय या पाठातून करून घेऊया.

संत ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात पसायदान आहे. पसायदान म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी विश्वात्मक देवाला केलेली प्रार्थना. आपली वैयक्तिक इच्छा पूर्ण व्हावी म्हणून आपण नेहमीच प्रार्थना करतो. अशी प्रार्थना आपल्यापुरती मर्यादित असते; परंतु संत ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाला सारे जग सुखी करण्याची विनंती केली.

संत ज्ञानेश्वर 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सांगून पूर्ण करण्याच्या तयारीत होते, तेव्हा संत निवृत्तीनाथ त्यांना म्हणाले, ''आपण ग्रंथ पूर्ण करत आला आहात. तेव्हा सगळ्यांसाठी देवाजवळ काहीतरी मागा'', यावर संत ज्ञानेश्वर म्हणाले, ''मी देवापाशी आधी मागितले आहे. ते, म्हणजे देवाने आम्हा सर्वांना चांगली बुद्धी द्यावी.'' संत निवृत्तीनाथ म्हणाले, ''ग्रंथाचा समारोप करताना प्रार्थना येणे आवश्यक आहे. तुम्ही सुरुवातीला मंगलाचरणात जे म्हटले आहे ते आता विस्ताराने सांगा.'' यातून पसायदान निर्माण झाले.

संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेली ही प्रार्थना मराठी मनाच्या स्मरणात कायम आहे. पसायदान याचा अर्थ विनम्र मनाने परमेश्वराला हात जोडून केलेली विनंती. निसर्गातील फुले, फळे, वृक्ष, नद्या, निर्झर, समुद्र, सूर्य, चंद्र, तारे एकोप्याने राहतात. त्यांचा दाखला देत, 'आपणही गुण्यागोविंदाने राहावे', हे संत ज्ञानेश्वरांनी सांगितले. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात म्हटले आहे,

**'जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।**
**भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।**
**दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।**
**जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।**

माणसाने आपल्या मनातील दुष्टावा नाहीसा केला पाहिजे. संत ज्ञानेश्वरांनी याला 'खळांची व्यंकटी सांडो' असे म्हटले आहे किंवा **'दुरिताचें तिमिर जावो'** असे म्हटले आहे. दुरित म्हणजे दुष्कर्म. या जगातून दुष्कर्माचा अंधार नाहीसा होवो, ज्याला जे जे हवे ते ते मिळो अशी विश्वकल्याणाची प्रार्थना त्यांनी केली. असेच मागणे संत नामदेवांनीही परमेश्वराकडे मागितले. एका अभंगात ते म्हणतात,

**'अहंकाराचा वारा न लागो राजसां ।**
**माझ्या विष्णुदासां भाविकांसी ।।'**

संत नामदेवांनी देवाला अशी विनंती केली आहे, की देवा मला सतत नम्र राहू दे. मला कधीही अहंकारी होऊ देऊ नकोस. माणसात उर्मटपणा आला तर तो कधीही यशस्वी होत नाही. आपल्याला आयुष्यात मोठे व्हायचे असेल तर नम्र राहायला हवे. विनम्रता केव्हाही जगाला आपलेसे करते. थोरांची चरित्रे आपल्याला हेच शिकवतात.

संत एकनाथांनी **'सर्वांभूती भगवद्‌भावो । हा चि निजभक्तीचा ठावो ।'** असे म्हटले आहे. प्राणिमात्रात मैत्री असली, की विश्व आनंदाने राहू शकते. मैत्री म्हणजे नुसते देणे घेणे नव्हे. मानवी सुखदु:खाशी सहृदय मनाने समरस होणे, दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणे, दुसऱ्याच्या दु:खात त्याला आधार देणे, हा आपला आणि तो परका असे मनात कधीही न आणणे; असे झाले तरच जीवाचे मैत्र होते. संत एकनाथ 'सर्वांभूती भगवद्‌भावो ।' असे म्हणतात तर संत ज्ञानेश्वर यासाठी **'भूतां परस्परें पडो, मैत्र जीवाचें'** असे म्हणतात.

संत तुकारामांनी देवापाशी **'संतसंग देईं सदा'** असे मागणे मागितले आहे. संतांच्या संगतीमुळे चार माणसे एकत्र आली, तर चांगल्या प्रकारचे काम उभे राहते. परस्पर सहकार्यातूनच मानवी जीवनाचे कल्याण होते. त्यासाठी संत तुकाराम महाराज सांगतात, **'एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ।'** संत स्वत:साठी काहीही मागत नाहीत. जगाच्या कल्याणासाठीच ते प्रार्थना करत असतात.

संत रामदास यांनीही विश्वकल्याणासाठी प्रार्थना केली आहे.

**'कल्याण करीं देवराया, जनहेत विवरीं ।**
**तळमळ तळमळ होतचि आहे, हे जन हातीं धरीं ।**

संत रामदास यांना जनहिताची तळमळ वाटते, म्हणून ते परमेश्वराजवळ सर्वांचे कल्याण कर, असे मागणे मागतात.

संत गाडगे महाराजांनी सामाजिक प्रबोधन करताना प्रत्यक्ष कृतीवर भर दिला आहे. वेळ वाया घालवणे, व्यर्थ गप्पा मारत बसणे हे संत गाडगे महाराजांना मान्य नव्हते. त्यापेक्षा सर्वांनी शिक्षित व्हावे यावर त्यांचा कटाक्ष होता.

शिक्षणाचे महत्त्व सांगताना संत गाडगे महाराज म्हणतात–

**'नको धर्मकृत्ये पैसा खर्चूनिया**
**घेण्यासाठी विद्या तोच खर्चा ।।**
**स्वत:चा उद्‌धार करा प्रयत्नाने**
**शक्तीने, मुक्तीने सुखी व्हावे ।।'**

शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत व्हावा, माणूस जोडला जावा, त्यातून मानवाचे कल्याण व्हावे, हेच संत गाडगेबाबांना अभिप्रेत आहे.

संत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेत स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. आपले गाव हे देवाचे मंदिर आहे. अशा मंदिरात 'मानव देवमूर्ति सुंदर' असे ते म्हणतात. समभावाने सेवा केली पाहिजे, अज्ञान नाहीसे व्हावे यासाठी ज्ञानविज्ञानाची कास धरावी, सर्वांनी ग्रंथ वाचावे, सत्य बोलावे असे तुकडोजी महाराज म्हणतात. संत तुकडोजी महाराज अशी प्रार्थना करतात, की

'सर्व विश्वचि व्हावे सुखी । ही धर्माची दृष्टि नेटकी ।
ती आणावी सर्व गावलोकी । तरीच लाभ ।।

सर्व संतांनी मागितलेले मागणे म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी केलेली चिरंजीव प्रार्थना आहे. ही प्रार्थना मानवतेची पूजा करणारी आहे. संतांनी माणसाला महत्त्व दिले. माणूस आदर्श व्हावा, त्याने सुसंस्कारांची जोपासना करावी. कुणालाही त्रास देऊ नये, एकोप्याने राहावे. माणूस कधीही एकाकी राहू शकत नाही. त्याला संवादाची नितांत गरज असते, म्हणून माणसाने कुणालाही दुखवता कामा नये. शक्यतो दुसऱ्याच्या उपयोगी पडणे, ही खरी मानवता आहे. संतांनी ही मानवता आवर्जून शिकवली. तशी त्यांनी आचरणातही आणली.

आजच्या विज्ञानयुगात विज्ञान-तंत्रज्ञानातील संशोधनामुळे विश्व जवळ आले आहे. संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात 'हे विश्वचि माझे घर आहे,' ही कल्पना केली होती याचे प्रत्यंतर आज आपण घेत आहोत. आज आपण जगात कुठेही जाऊ शकतो; पण संत ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेला माणसामाणसांना जोडणारा जिव्हाळा आज हरवला आहे. तो जपण्यासाठी मन सुसंस्कृत असायला हवे. नाहीतर, राक्षसी वृत्ती निर्माण होते. ती संतांना नको आहे. चांगल्या मनाने निर्माण केलेल्या कृती जगात महत्त्वपूर्ण ठरतात. विज्ञानातील चांगले प्रकल्प समृद्धी आणतात; पण सुंदर मने ही राष्ट्राची श्रीमंती वाढवतात. संतांनी याकडे लक्ष वेधले आहे.

वडाचे झाड कायम नम्र असते. ते सगळ्यांना सावली देते. त्याची सावली सर्वांना हवीहवीशी वाटते. झाडे स्वत: ऊन सोसतात. लोकांना सावली देतात. पर्वताच्या कुशीत जन्मलेल्या नद्या मोकळ्या मनाने पुढे वाहतात. पर्वत आपल्या जागी स्थिर राहून हे आनंदाने पाहतात. आपण कोणत्याही कामात मन आनंदी ठेवून जर काम केले, तर त्याच्यासारखा दुसरा आनंद नसतो. हे जगण्याचे खरे सूत्र आहे. स्वत: चांगले जगावे आणि स्वार्थापलीकडे जाऊन दुसऱ्याचाही विचार करावा; असे झाले तरच सुंदर समाज निर्माण होईल, सुखी होईल. हेच सर्व संतांच्या प्रार्थना करण्यामागील मर्म आहे.

## कृती

### (१) खालील चौकटी पूर्ण करा.

(अ) संत ज्ञानेश्वर यांनी मानवाच्या कल्याणासाठी केलेली विश्वप्रार्थना- ☐

(आ) मानवी सुखदु:खाशी सहृदयतेने समरस होणे- ☐

(इ) 'सर्वांभूती भगवद्‌भावो' अशी प्रार्थना करणारे संत- ☐

(ई) सामाजिक प्रबोधनावर भर देणारे संत- ☐

(उ) संत तुकारामांचे जीवनसूत्र- ☐

### (२) आकृत्या पूर्ण करा.

(अ) अपयशी माणसासाठी संतांनी केलेले मार्गदर्शन

(आ) संतांना माणसाकडून अपेक्षित असलेल्या आदर्श कृती

(इ)

| संतांनी सांगितलेले मैत्रीचे निकष | | | |
|---|---|---|---|
| | | | |

## (३) फरक सांगा

| सामान्य माणसाचे मागणे | संतांचे मागणे |
|---|---|
| (अ) | (अ) |
| (आ) | (आ) |

## (४) खालील काव्यपंक्तींचा अर्थ लिहा.

(अ) जे खळांची व्यंकटी सांडो

(आ) दुरिताचें तिमिर जावो

## (५) खालील तक्ता पूर्ण करा. त्यासाठी कंसातील शब्दांचा उपयोग करा.

(नम्रता, मैत्रभाव, विश्वकल्याण, स्वप्रयत्न, सहकार्य)

| अ. क्र. | काव्यांश | संतांचे नाव | काव्यांशातून व्यक्त झालेली संतांची इच्छा/भावना |
|---|---|---|---|
| (१) | 'सर्व विश्वचि व्हावे सुखी' | ................................... | ................................... |
| (२) | 'अहंकाराचा वारा न लागो राजसां' | ................................... | ................................... |
| (३) | 'सर्वांभूती भगवद्‌भावो' | ................................... | ................................... |
| (४) | 'एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ' | ................................... | ................................... |
| (५) | 'स्वत:चा उद्‌धार करा प्रयत्नाने' | ................................... | ................................... |

## (६) स्वमत.

(अ) सर्व संतांच्या प्रार्थनेमधील सामाईक सूत्र तुमच्या शब्दांत थोडक्यात लिहा.

(आ) 'भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(इ) या पाठातून तुम्ही काय शिकलात, ते तुमच्या शब्दांत लिहा.

- **खालील ओळींतील वृत्त ओळखा.**

(अ) म्हणे वासरा । घात झाला असा रे
तुझ्या माऊलीचेच हे खेळ सारे
वृथा धाडिला राम माझा वनासी
न देखो शके त्या जगज्जीवनासी

(आ) अविरत पथि चाले, पांथ नेमस्त मानी
कधि न मुळि न थांबे, कोणत्या कारणांनी
वचनि मननि त्याच्या, ध्येय हे एक ठावे
स्वपर जनसमूहा सौख्य कारी बनावे

(इ) मातीत ते पसरले अति रम्य पंख
केले वरी उदर पांडुर निष्कलंक
चंचू तशीच उघडी, पद लांबवीले
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले

DE3Y1X

## ❁ व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन)

इयत्ता नववीमध्ये आपण विश्वकोशाची ओळख करून घेतली. कोणत्याही शब्दाचे वेगवेगळे संदर्भ विश्वकोशातून मिळू शकतात हे आपण अनुभवले. हे शब्द तयार कसे होतात किंवा कसे तयार झाले असावेत, याची उत्सुकता आपल्या सर्वांच्या मनात असते. शब्दाची व्युत्पत्ती पाहणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीने आपल्या मुलीचे नाव 'सई' ठेवले. 'सई' हा शब्द संस्कृतमधील 'सखी' म्हणजे मैत्रीण या शब्दावरून आलेला आहे. हे कळल्यावर त्याला किती आनंद होईल! आपल्या परिचयाच्या शब्दांची व्युत्पत्ती कळल्यावर जो आनंद मिळतो तो विद्यार्थ्यांनाही मिळावा. व्युत्पत्ती कोशाची गरज व महत्त्व कळावे व शब्दांची व्युत्पत्ती अभ्यासण्याची सवय लागावी या हेतूने स्थूलवाचन विभागात समावेश असलेला हा पाठ महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांना भाषेच्या प्रवाहात येणाऱ्या अनेक शब्दांच्या उच्चारांचे व अर्थांचे मूळ व्युत्पत्ती कोशाच्या अभ्यासातून उलगडतात. शब्द हा एकच असतो व तो निरनिराळ्या परिस्थितींमध्ये निरनिराळी रूपे धारण करतो व त्या प्रत्येक रूपाला एक किंवा अनेक अर्थ प्राप्त होतात, हे विद्यार्थ्यांना समजणे हा या पाठाचा उद्देश आहे.

### खालील संवाद वाचा.

**राधा** : आई, हे काय आहे ग कोपऱ्यात?

**आई** : अग, ती सतार आहे. ती आजोबांना इनाम म्हणून मिळालीय महाराजांकडून! गावाकडे होती, ती आज आणली आहे.



**राधा** : इनाम...? इनाम म्हणजे काय ग आई?

**आई** : (हसून) अग, इनाम म्हणजे बक्षीस!

**राधा** : अग, माझ्या वर्गातील तनया आहे ना... तिचे आडनाव आहे 'इनामदार'.

**आई** : हो...मला माहीत आहे ती.

**राधा** : इनाम म्हणजे बक्षीस. मग इनामदार म्हणजे...आईऽऽ कसा झाला असेल ग हा शब्द तयार?

**आई** : थांब. आजोबांच्या खोलीत मराठी व्युत्पत्ती कोश आहे. आपण पाहूया हं त्यात 'इनाम' शब्द कसा तयार झाला असेल? त्याची व्युत्पत्ती आपल्याला त्यात सापडेल.

> **इनाम** न. कायमची देणगी, मोफत वतन, बक्षीस Prize, gift, inam, grant
> [अर. इन्+आम्=वरिष्ठाकडून देणगी]

**आई :** बघितलंस का राधा? हे इथे 'अर.' लिहिले आहे ना! म्हणजे हा अरबी भाषेतला शब्द आहे. आता आपण –दार हा प्रत्यय शोधू.

> **दार** प्र. स्वामित्वदर्शक फारशी प्रत्यय. A termination showing possession

बघ –दार हा फारसी प्रत्यय आहे. स्वामित्वदर्शक म्हणजे एखादी गोष्ट एखाद्याजवळ आहे असे दर्शवणारा प्रत्यय. इथे 'इनामदार' म्हणजे 'ज्याच्याजवळ इनाम आहे तो' असा अर्थ होतो आणि दार म्हणजे एखादी गोष्ट धारण करणारा असा पण अर्थ घेता येईल. 'जबाबदार' हा शब्द तुला माहीत आहे ना! जो जबाबदारी धारण करतो किंवा घेतो, ज्याच्याकडे जबाबदारी असते तो जबाबदार. तसंच 'इनामदार' म्हणजे ज्याच्याजवळ इनाम आहे किंवा ज्याने इनाम धारण केलेले आहे म्हणजेच ज्याला इनाम मिळालेले आहे असा माणूस.

**राधा :** आई, ही माहिती किती छान आहे! आता मी नेहमी असे शब्द शोधत जाईन.




व्युत्पत्ती म्हणजे शब्दाच्या अर्थाचे किंवा शब्दाच्या मुळाचे ज्ञान. एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे म्हणजे व्युत्पत्ती सांगणे. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश.

भाषेत अनेक कारणांनी बदल होत जातात. व्युत्पत्ती कोशात या बदलाचे मूळ आपल्याला शोधता येते.

उदा., भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने जे फरक होतात ते भिन्न भिन्न काळांतील भाषा बोलणाऱ्यांच्या शब्दांच्या उच्चारांचे व समाजामध्ये वापरात असलेल्या शब्दांच्या होणाऱ्या अर्थोचित बदलांचे परिणाम आहेत. व्युत्पत्ती कोश या बदलाचे स्वरूप स्पष्ट करतो.

उदा., मराठीतील 'आग' हा शब्द 'संस्कृत'मधील 'अग्नि' पासून आला, हे आपल्याला व्युत्पत्ती कोशामुळे कळते. भाषेत बदल होण्यामागे बऱ्याचदा सुलभीकरणाची म्हणजे सोपे करण्याची प्रवृत्ती असते.

उदा., 'अग्नि' पासून 'आग' हा शब्द तयार होण्यापूर्वी प्राकृतमध्ये 'अग्गि' हा शब्द तयार झाला. हा उच्चार सोपा होत होत मराठी, हिंदी यांसारख्या आधुनिक भाषांत त्यापासून 'आग' हा शब्द तयार झाला. कुठल्याही दोन भाषा बोलणारे भाषक जेव्हा एकमेकांच्या संपर्कात येतात, तेव्हा त्यांच्या भाषांतील शब्दांची देवाणघेवाण होते (कधी कधी व्याकरणिक घटकांचीही देवघेव होते.) या सर्वांची नोंद व्युत्पत्ती कोशामध्ये पाहायला सापडते. शब्दसिद्धीमध्ये आपण हे पाहतोच.

| भाषा | मूळ शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| संस्कृत | तुण्ड | तोंड |
| कन्नड | तुप्प | तूप |
| अरबी | इत्र | अत्तर |

काळाप्रमाणे शब्दांच्या स्वरूपात, त्यांच्या अर्थात, त्यांच्या परस्परसंबंधात बदल होतात आणि हे बदल अपरिहार्य असतात. निरीक्षण करा, तुमचे आजी-आजोबा बोलत असलेली भाषा, तुमचे आई-बाबा बोलत असलेली भाषा, तुम्ही आणि तुमच्या भावंडांची भाषा, तुम्ही आणि तुमच्या मित्रांमधील भाषा. (उदा., व्हॉटस्‌ॲपची भाषा) या सगळ्यांत खूप फरक आहे हे तुमच्या लक्षात आलंच असेल. कधी कधी पूर्वी अस्तित्वात असलेल्या एखाद्या शब्दाचा अर्थ हळूहळू बदलत जातो किंवा मूळ अर्थाबरोबरच आणखी एखादा अर्थ भाषेमध्ये स्थिरावत जातो. उदा., 'शहाणा' या शब्दाचा अर्थ पूर्वी हुशार, बुद्‌धिमान, चलाख असा होता हा शब्द सज्ञान या शब्दावरून आला असावा असे व्युत्पत्ती कोशावरून दिसते. आता मूळ अर्थाव्यतिरिक्त 'शहाणा'चा 'अतिशहाणा' असा अर्थसुद्‌धा रूढ होत आहे. काही काळाने याची नोंद व्युत्पत्ती कोशात दिसण्याची शक्यता आहे.

एकाच अर्थाचे शब्द निरनिराळ्या संदर्भांत निरनिराळी रूपे धारण करतात. उदा.,


| शब्द अनेक | अर्थ एक | वेगवेगळ्या संदर्भांत वापर |
|---|---|---|
| वात, पवन, मरुत, समीर, अनिल | वारा | पवनचक्की ✓<br>वातचक्की ✕ अनिलचक्की ✕ |
| | | वातचक्र ✓ समीरचक्र ✕ |

तसेच समान दिसणाऱ्या शब्दाचे अर्थ वेगवेगळे असतात.

| शब्द एक | वेगवेगळे अर्थ |
|---|---|
| पाठ | (१) माझी 'पाठ' दुखते आहे. पाठ - शरीराचा अवयव<br>(२) हा 'पाठ' अवघड आहे. पाठ-पुस्तकातील धडा |

## व्युत्पत्ती कोश कसा पाहावा?

आपल्याला एखाद्या शब्दाबद्दल कुतूहल निर्माण झाले, तर आपण व्युत्पत्ती कोश पहातो. उदा., 'दिवाळी' हा शब्द कुठून आला असेल?



**दिवाळी** स्त्री. दिव्यांची रांग, एक सण (दिव्यांसंबंधी)
A row of lights (hence) a Hindu Festival with nocturnal illuminations.
[सं. दीपावलि, दीपालि; प्रा. दिवाली, दीवावली, बं. दिउयाली; ओ. दिआली; हिं/पं. दिवाली, सिं. डिआरी, गु. दिवाळी]

'दिवाळी' हा शब्द आपण पाहिला. मूळ संस्कृत शब्द 'दीपावलि'पासून तो आला आहे. (संस्कृत शब्द 'दीपावलि'चा 'लि' ऱ्हस्व असला तरी मराठीत तो दीर्घ लिहितात. या शब्दांतील 'दी' व 'ली' दोन्ही दीर्घ आहेत; पण 'दिवाळी' हा शब्द मराठी आहे. त्यात 'दि' हा ऱ्हस्व येतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.) विश्वकोशातील या शब्दाची नोंद पाहिल्यावर कंसातील मजकूर पाहताना हे नक्की काय आहे असे तुम्हांला वाटले असेल; पण ही शब्दांची लघुरूपे आहेत हे कळल्यावर आणि त्यांची मूळ रूपे समजल्यावर तुम्हांला ते सोपे वाटेल आणि आपलाच शब्द थोडेसे रूप बदलून इतर भाषांच्या अंगणातही बागडतो आहे हे कळल्यावर मजाही वाटेल.

व्युत्पत्ती कोशात अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे, हेही दाखवलेले असते. वरच्या उदाहरणात शब्दांची लघुरूपे आलेली आहेत ती जाणून घेणे आवश्यक आहे. शब्दात सुरुवातीला शब्दाची जात लिहिलेली असते. नामाच्या बाबतीत मात्र पुं.-पुल्लिंगी, स्त्री.- स्त्रीलिंगी, न/नपुं.-नपुंसकलिंगी असे लिहिलेले असते. 'दिवाळी' हा स्त्रीलिंगी शब्द असल्याने 'स्त्री.' हे लघुरूप पाहायला मिळते. त्यानंतर वेगवेगळ्या भाषांसाठी लघुरूपे वापरलेली दिसतात. सं-संस्कृत, प्रा-प्राकृत, बं-बंगाली, ओ-ओडिया, हिं-हिंदी, पं-पंजाबी, सिं-सिंधी, गु-गुजराती. या व्यतिरिक्त कोशकार कधी एखाद्या शब्दामागचा इतिहास सांगतात. कधी कधी एखाद्या शब्दाची अन्य कोणी मांडलेली वेगळी व्युत्पत्ती सांगून ती आपल्याला योग्य वाटते की नाही हेही सांगतात.

**व्युत्पत्ती कोशाचे कार्य**

- (१) शब्दाचे मूळ रूप दाखवणे.
- (२) अर्थांतील बदल स्पष्ट करणे.
- (३) उच्चारातील बदल व फरक दाखवणे.
- (४) बदलांचे कारण स्पष्ट करणे.

(यांपैकी पहिल्या दोन बाबींचा अगदी थोडक्यात, सोदाहरण परिचय पाठात आला आहे.

**लक्षात ठेवा.**

(१) १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते.

(२) स्वा. सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते.

(३) 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे', असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला.

(४) कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर या कार्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

(५) बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली.

(६) १९४६ साली या मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले. यानंतरही व्युत्पत्ती कोशाच्या आवृत्त्या निघालेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी त्या जरूर पाहाव्यात.

● **ताकास तूर लागू न देणे हा वाक्प्रचार कसा आला असावा हे आपण समजून घेऊया.**

शाळेत नाटक बसवले जाणार होते. नाटकात काम करणाऱ्यांमध्ये शरदची निवड झाली होती. मित्र त्याच्याकडून ही बातमी काढून घेण्यासाठी खूप प्रयत्न करत होते; पण शरदने ताकास तूर लागू दिली नाही. अशा प्रकारचे प्रसंग आपल्यावरही अनेकदा येत असतात. आपणही आपल्या मनात काय आहे हे लोकांना अजिबात कळू देत नाही. लोकांनी विचारलेल्या प्रश्नांना आपण अशी काही उत्तरे देत राहतो, की त्यांना काही कळूच नये. लोकही मग म्हणतात, ''अरे, हा अगदी ताकास तूर लागू देत नाही की!''

आता 'ताकास तूर लागू न देणे' या वाक्प्रचाराचा अर्थ आपल्याला कळला आहेच. कोशातही त्याचा अर्थ ''(एखाद्या गोष्टीचा दुसऱ्यास) बिलकूल थांग लागू न देणे; टाळाटाळी करून स्वत:च्या मनातील विचार दुसऱ्यास न समजू देणे'' अशाच प्रकारचा आहे. पण ताकास तूर लागणे म्हणजे काय! ताक म्हणजे काय? आपण पितो ते ताक? आणि तूर म्हणजे तरी काय? आपल्या मराठी लोकांच्या जेवणात ज्या तुरीच्या डाळीचं वरण असतं ते तूर नावाचं धान्य की काय? ताकाचा अन् तुरीचा संबंध येतो तरी कुठे? येथील शब्द 'ताक' असा नसून 'ताका' असा आहे आणि 'ताका' म्हणजे 'तागा'. 'तागा'चा अर्थ 'मराठी व्युत्पत्ती कोशा'मध्ये कृ. पां. कुलकर्णी यांनी (१) नव्या (अखंड) कापडाचा गठ्ठा; किंवा (२) (विणकराच्या) मागावरली सबंध न फाडलेले (कापडाचे) ठाण असा दिलेला आहे. 'महाराष्ट्र शब्दकोशा'च्या चौथ्या विभागात देखील असा अर्थ दिलेला आहे.

ताका-गा : मागावरील संबंध न फाडलेले कापड; (कापड इत्यादिकांचे) ठाण. (२) दोरा, धागा.

आता 'तूर' या शब्दाचा 'महाराष्ट्र शब्दकोशा'तला अर्थ पाहू. 'तूर' म्हणजे एक प्रकारचं द्विदल धान्य हा अर्थ तर आहेच. पण या शब्दाला दुसराही एक अर्थ आहे. तो असा-

तूर : विणलेले वस्त्र ज्या लाकडाभोवती गुंडाळले जाते ते लाकूड; कोष्ट्याची दांडी

कृ. पां. कुलकर्णी यांनी आपल्या 'मराठी व्युत्पत्ती कोशा'त तूरचा असाच अर्थ दिलेला आहे.

तर 'ताका' (किंवा 'तागा') आणि 'तूर' या शब्दांचे आपल्याला नेहमी माहीत असलेले अर्थ न घेता इथे हे विणकराच्या व्यवसायातले अर्थच ध्यानात घ्यायला हवेत. कारण विणकराच्या मागावरचा ताका किंवा तागा हा वास्तविक 'तुरे'वर म्हणजेच लाकडाभोवती गुंडाळला जायला हवा. पण 'ताका'चा 'तूर' नामक वस्तूशी संबंधच येऊ द्यायचा नाही. ताका व तूर यांचा संबंध टाळायचा. म्हणजे कापड आणि ज्या लाकडाभोवती ते गुंडाळायचे ते लाकूड यांचा संबंध टाळायचा; म्हणजे जे काम खरोखर अपेक्षित असते, व्हायला हवे असते, होणे रास्त असते, तेच मुद्दाम होऊ द्यायचे नाही, असा याचा अर्थ आहे.

**('गंमत शब्दांची' डॉ. द. दि. पुंडे या पुस्तकातून)**

## कृती

### (१) टिपा लिहा.

(अ) व्युत्पत्ती कोशाचे कार्य

(आ) शब्द तयार होण्याचे विविध प्रकार

### (२) खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)

**व्युत्पत्ती कोश**
- निर्मितीचा ठराव
- निर्मितीची जबाबदारी
- निर्मितीसाठी अर्थसाहाय्य
- त्याचे प्रकाशन

### (३) पाठाबाहेरची उदाहरणे शोधून खालील कृती करा.

**व्युत्पत्ती कोश**

**शब्द अनेक, अर्थ एक**

उदा., जल, नीर, तोय...
–पाणी

**शब्द एक, अर्थ अनेक**

उदा., पान–
पान–झाडाचे पान (पर्ण)
पान–पुस्तकाचे पान (पृष्ठ)

**उपक्रम :** शिक्षकांच्या मदतीने व्युत्पत्ती कोशातून खालील शब्दांची व्युत्पत्ती शोधून लिहा.

(अ) प्रावीण्य

(आ) चिल्लर

(इ) वीज

(ई) गुपचूप

## भाषासौंदर्य

### अशी पडते भाषेत शब्दांची भर

कोणतीही भाषा समृद्ध होते ती त्या भाषेच्या वाढणाऱ्या शब्दसंपत्तीमुळे. भाषेमध्ये इतर भाषा व व्यवहार यांतून शब्दांची भर पडत असते. मराठी भाषेमध्येही अशा विविध प्रकारांनी शब्दांची भर कशी पडते, ते खालील उदाहरणांद्वारे अभ्यासा.

**दुसऱ्या भाषेच्या संपर्कातून.**
उदा., इंग्रजीतून आलेले ऑफिस, पेन, टेबल इत्यादी शब्द.

**दुसऱ्या भाषेतल्या शब्दांच्या वेगळ्या उच्चारांतून.**
उदा., 'डॅम बीस्ट' याचे जुन्या मराठीतले 'डॅंबीस' हे रूप

**दोन वेगवेगळ्या भाषांतील शब्द आणि प्रत्ययांचे मिश्रण करून.**
उदा., फारसी ना हा उपसर्ग + पास हा इंग्रजी शब्द = नापास

**प्रत्यय आणि उपसर्ग लागून.**
उदा., वारकरी, प्रतिसाद,

भाषेमध्ये भर घालणाऱ्या अशा अनेक शब्दांचा शोध घ्या व त्यांचा संग्रह करा.

❀❀❀

YC2RQ8

## भाषाभ्यास

### शब्दसिद्धी

आपल्या भाषेत आलेले शब्द मूळचे कुठल्या भाषेतले आहेत याचा शोध घेणे म्हणजे त्या शब्दाची व्युत्पत्ती शोधणे. व्युत्पत्ती आपल्याला व्युत्पत्ती कोशात शोधता येते; पण कोणते शब्द आपण इतर भाषांतून जसेच्या तसे घेतले, कोणत्या शब्दात बदल करून आपण नवीन शब्द घडवला याचा अभ्यास म्हणजे शब्दसिद्धी. शब्द कसा तयार होतो, सिद्ध होतो याचा अभ्यास म्हणजे शब्दसिद्धी होय.

भाषेतल्या शब्दाचे वर्गीकरण दोन प्रकारे करता येते.

(१) **सिद्ध शब्द–** उदा., जा, ये, कर, बोल सारखे मूळ धातू किंवा शब्द.

(२) **साधित शब्द–** उदा., 'कर'सारख्या सिद्ध शब्दापासून तयार झालेले करू, कर्ता, करणारा, होकार, प्रतिकार इत्यादी शब्द.

**भाषेतील शब्द**

| (१) सिद्ध शब्द | (२) साधित शब्द |
|---|---|
| (अ) तत्सम | (अ) उपसर्गघटित शब्द |
| (आ) तद्भव | (आ) प्रत्ययघटित शब्द |
| (इ) देशी | (इ) सामासिक शब्द |
| (ई) परभाषीय | (ई) अभ्यस्त शब्द |

यापूर्वी आपण सिद्ध शब्द व साधित शब्द गटातील सामासिक शब्द यांचा अभ्यास केलेला आहे. आता आपण साधित गटातील 'उपसर्गघटित', 'प्रत्ययघटित' व 'अभ्यस्त' शब्दांचा अभ्यास करणार आहोत.

### (अ) उपसर्गघटित शब्द

**उपसर्ग :**

मूळ धातूच्या किंवा शब्दाच्या मागे एक किंवा अनेक अक्षरे लावून काही **'साधित शब्द'** बनतात, त्या अक्षरांना **'उपसर्ग'** असे म्हणतात.

(१) उपसर्ग स्वतंत्रपणे येत नाहीत.

(२) ही अक्षरे अव्ययरूप असतात. उपसर्ग लागल्याने कधी कधी मूळ धातूचा अर्थ बदलतो.

संस्कृत, फारसी, अरबी या भाषांतून मराठीने अनेक उपसर्ग घेतले आहेत या उपसर्गांना मराठी/इंग्रजी इत्यादी शब्द जोडून अनेक शब्द तयार झाले आहेत.

| उपसर्ग | उपसर्गघटित शब्द |
|---|---|
| अव– | अवजड, अवघड, अवकळा |
| भर– | भरजरी, भरधाव, भरदिवसा |
| नि– | निरोगी, निनावी, निकोप |
| अति– | अतिरेक, अतिशय |
| उप– | उपसंपादक, उपमुख्याध्यापक, उपप्रमुख, उपवास |
| बे– | बेडर, बेफिकीर, बेपर्वा |
| बिन– | बिनचूक, बिनतक्रार, बिनहरकत |
| ना– | नाराज, नाउमेद, नापसंत |

**(आ) प्रत्ययघटित शब्द–** शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही शब्द तयार होतात, अशा अक्षरांना 'प्रत्यय' असे म्हणतात. प्रत्यय लागून तयार झालेल्या शब्दाला **'प्रत्ययघटित'** शब्द असे म्हणतात.

| प्रत्यय | प्रत्ययघटित शब्द |
|---|---|
| –आई | खोदाई, लढाई, चढाई |
| –आऊ | टिकाऊ, जळाऊ, लढाऊ |
| –आळू | झोपाळू, लाजाळू, दयाळू |
| –दार | दुकानदार, जमीनदार |
| –गिरी | गुलामगिरी, कारागिरी, |
| –इक | मानसिक, सामाजिक, लौकिक |
| –इत | आनंदित, प्रेरित |
| –त्व | जडत्व, गुरुत्व |

**(इ) अभ्यस्त शब्द–** द्विवित्त किंवा पुनरावृत्तीने तयार झालेले शब्द म्हणजे **'अभ्यस्त'** शब्द होय.
उदा., लाललाल, हळूहळू, तुकडेतुकडे, धंदाबिंदा, कामबीम, शेजारीपाजारी, कडकड, झटपट, खटपट इत्यादी.

- **खालील चौकटीत दिलेल्या शब्दांचे वर्गीकरण करून तक्ता पूर्ण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इनामदार | धारदार | गल्लोगल्ली | घमघम | अचूक | हुबेहूब |
| आंबटचिंबट | मुलूखगिरी | धबाधब | शिष्टाई | अनाकलनीय | हुरहुर |
| हिरवाहिरवा | मधूनमधून | रस्तोरस्ती | दांडगाई | उपाहार | तिळतिळ |
| शिलाई | लुटूलुटू | वटवट | संशयित | बेशक | मागोमाग |

| उपसर्गघटित शब्द | प्रत्ययघटित शब्द | अभ्यस्त शब्द |
|---|---|---|
| | | |

## रसग्रहण

शिशुवर्गात तालासुरात बडबडगीते म्हणणारा विद्यार्थी जेव्हा मोठा होऊ लागतो, तेव्हा लहानपणी गायलेल्या कवितांचा अर्थ त्याला कळू लागतो किंबहुना मोठ्या वर्गात वृत्त, अलंकार शिकल्यानंतर कवितेचं तंत्र कळू लागतं. कविता वाचताना त्याचं मन एका अनामिक आनंदानं भरून जातं. कधी डोळ्यांत पाणी येतं, कधी मन अंतर्मुख होतं, कधी कवितेतील व्यक्तिचित्र, घटना, नैसर्गिक सौंदर्य डोळ्यासमोर जसंच्या तसं उभं राहतं, तर कधी समाजातील वास्तवाच्या दाहक चित्रणाची जाणीव त्याला होते. या सर्व भावभावनांचा मनात चाललेला व्यापार म्हणजेच कवितेच्या आस्वादाकडे मन वळतं आहे याचं चिन्ह होय.

कृतिपत्रिकेतील पद्यविभागाच्या मूल्यमापनामध्ये कवितेचे रसग्रहण हा घटक समाविष्ट केलेला आहे. 'रस' या घटकाचा अभ्यास तुम्ही इयत्ता नववीत केलेला आहे. या इयत्तेत कवितेचे रसग्रहण करता येणे, कवितेचा आस्वाद घेता येणे, यादृष्टीने कवितांचा अभ्यास करायचा आहे.

कवितेचे रसग्रहण आशयसौंदर्य, काव्यसौंदर्य आणि भाषिक सौंदर्य (भाषिक वैशिष्ट्ये) या तीन प्रमुख मुद्द्यांना धरून केले जाते. या तीन मुद्द्यांमध्ये अगदी स्पष्ट विभाजन रेषा नसते. ते एकमेकांमध्ये मिसळून गेलेले असतात, म्हणूनच कवितेमध्ये त्यांचा एकत्रितपणे अनुभव येतो. कवितेत अल्प शब्दांतून मोठा आशय व्यक्त झालेला असतो. कवितेत अचूक आणि चपखल शब्दनिवड असते. कल्पनांच्या माध्यमातून, कधी प्रतिमांमधून तर कधी भाषिक वैशिष्ट्यांमधून कवितेचा आशय उलगडायला मदत होत असते. याशिवाय कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारणही तुम्हांला सांगता यायला हवे. याशिवाय कवितेचे खालील अंगभूत गुण तुम्हांला माहीत असायला हवेत.

(१) काव्यातील शब्द रमणीय अर्थ व्यक्त करतात.

(२) शब्द उत्कट भावनेचा सहज उद्रेक करतात.

(३) शब्दांना आंतरिक लय असते तर कधी रचनाच तालबद्ध असते.

वरील सर्व मुद्दे लक्षात घेऊन कवितेचा अभ्यास केल्यास कवितेचा आशय आणि भाषासौंदर्याचा एकत्रित अनुभव घेता येतो. लक्षात ठेवा, की संपूर्ण कवितेऐवजी कवितेतील काही ओळींचे रसग्रहण करायचे असेल तर तेही त्या मुद्द्यांना धरून करता यायला हवे. प्रत्येक ओळीच्या बाबतीत सगळेच मुद्दे लागू पडतील असे नाही; परंतु त्या ओळीतील आशयाचे काव्यसौंदर्य उलगडता यायला हवे, हे महत्त्वाचे असते.

| रसग्रहण | | |
|---|---|---|
| **आशयसौंदर्य** | **काव्यसौंदर्य** | **भाषिक वैशिष्ट्ये** |
| कवितेचा विषय, मध्यवर्ती कल्पना, संदेश, उपदेश, मूल्य, कवितेतून मिळणारा एकत्रित अनुभव | अलंकार, रस, विविध कल्पना, प्रतिमा, विविध भावना. | कवींची भाषाशैली (ग्रामीण, बोलीभाषा, संवादात्मक भाषा, निवेदनात्मक, चित्रदर्शी) शब्दालंकार, आंतरिक लय, नादमाधुर्य वृत्त (असल्यास) |

# काव्यसौंदर्य

काव्यसौंदर्याची अभिव्यक्ती म्हणजे कवितेच्या वाचनाने अथवा श्रवणाने मनावर झालेल्या संस्कारांना शब्दात्मक रूप देणे होय. कवींची मूळ संकल्पना, भावना, विचार यांच्या सजावटीसाठी कवीने केलेली विशिष्ट मांडणी, योजलेले शब्दालंकार, अवलंबलेले वृत्त त्याचप्रमाणे कवीने निर्मिलेल्या सृष्टीचे आपल्या मनावर झालेले संस्कार आणि त्यावरून आठवणारी इतर क्षेत्रांतील साम्यस्थळे यांचा एकत्रित परिणाम काव्यसौंदर्यात असतो. कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण समर्पक शब्दांत सकारण कथन करणे म्हणजे काव्यसौंदर्य जाणणे होय.

काव्यसौंदर्यामध्ये विचारसौंदर्य, आशयसौंदर्य आणि भावसौंदर्य अशा वेगवेगळ्या गोष्टींचा समावेश असतो. कवितेत विचार, आशय आणि भाव या तीन वेगवेगळ्या संकल्पना असल्या तरी त्यांच्यातील विभाजनरेषा तितकीशी स्पष्ट नसते कारण त्या परस्पर संबंधित असतात. प्रसंगानुरूप, व्यक्तिपरत्वे या संज्ञा वापरल्या जातात. त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खाली दिलेले आहे. त्यांचा अभ्यास करा.

कवितेत कवी एखादा विषय मांडत असतो.

उदा., 'आश्वासक चित्र' या कवितेत 'स्त्री-पुरुष समानता' हा विषय मांडलेला आहे. 'आकाशी झेप घे रे' या कवितेत श्रमांच्या मूल्याचा विचार मांडलेला आहे.

कवितेत वेगवेगळ्या भावभावना प्रकट झालेल्या असतात.

उदा., 'वस्तू' या कवितेत निर्जीव वस्तूंविषयीची कवींची संवेदनशीलता प्रकट होत असते.

आता तुमच्या लक्षात येईल, की कवितेचा विषय, आशय, कवितेत मांडलेला विचार, कवितेतील मूल्य, दिलेला संदेश आणि भावभावना या सगळ्यांमधून काव्यसौंदर्य प्रकट होत असते. त्यामुळे काव्यसौंदर्याचा अभ्यास करताना प्रत्येक मुद्द्याचा विचार करावा. कृतिपत्रिकेतील काव्यसौंदर्यांतर्गत येणाऱ्या विचारसौंदर्य, भावसौंदर्य व अर्थसौंदर्य यावर आधारित कृतींचा अभ्यास खालील मुद्द्यांना धरून करावा.

| काव्यसौंदर्य | | |
|---|---|---|
| **अर्थसौंदर्य** | **विचारसौंदर्य** | **भावसौंदर्य** |
| कवितेचा विषय, कवितेची मध्यवर्ती कल्पना, आशयाला पुढे नेणारा विषय, शब्दांचा चपखल वापर, अर्थच्छटा, अलंकार इत्यादी. | कवितेतून व्यक्त होणारा विचार, कधी सर्वसमावेशक तर कधी नेहमीपेक्षा वेगळा, अनुभवांचा अंतर्मुख होऊन केलेला विचार इत्यादी. | कवितेतून व्यक्त होणारा भाव, वाच्यार्थाच्या पलीकडील भावार्थ, भावनांचा आविष्कार, संवेदनशीलता रस, कल्पना, प्रतिमा इत्यादी. |

# ♦ उपयोजित लेखन

विद्यार्थी मित्रहो, शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर तुमच्या मूलभूत कौशल्यांचा (श्रवण, भाषण-संभाषण, वाचन, लेखन) विकास झालेला आहे व तुम्ही ती कौशल्ये आत्मसात केलेली आहेत. श्रवणात शब्दांचे उच्चार काळजीपूर्वक ऐकणे, वाक्य ऐकणे, त्यांचा अर्थ समजून घेणे हे घटक येतात. श्रवणातून आपण उच्चार आणि अक्षरे यांचे सहसंबंध मनात पक्के करतो. शब्दांचे अर्थ व कृती यांचे शब्दांशी असलेले नाते आपल्या मनात निश्चित झाले, की आपले संभाषण सुरू होते. एखाद्या विषयाची किंवा घटकाची माहिती मिळवणे, चौकशी करणे इत्यादी प्रसंगी परस्परांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपण संभाषण करतो, संवाद साधतो. यांद्वारे तुमचे भाषण-संभाषण कौशल्य विकसित होत जाते. भाषण-संभाषणातून श्रवण केलेल्या ध्वनींच्या व शब्दांच्या ओळखीतून वाचन कौशल्याचा विकास होत जातो. ते कौशल्य (वाचन) प्राथमिक स्तरावर प्राप्त होते. प्राथमिक स्तरावर प्रकट वाचनाकडून मूक वाचनाकडे प्रगती होत जाते, तर माध्यमिक स्तरावर वाचन कौशल्याची परिपूर्णता गाठली जाते. अशा प्रकारे या मूलभूत कौशल्यांमधील अंतिम कौशल्य म्हणजे लेखन कौशल्य. अर्थात लेखन कौशल्य ही मूलभूत कौशल्यांपैकी शेवटची पायरी असली तरी या पायरीवरही इतर कौशल्येही आवश्यक आहेत. श्रवण, भाषण-संभाषण व वाचन या कौशल्यांमधूनच उत्स्फूर्तपणे व सहजपणे लेखन प्रक्रियेला प्रारंभ होऊन सर्वच कौशल्यांचा विकास सुलभ होऊ लागतो.

अनुभव ग्रहण करणे हा बालजीवनाचा अविभाज्य असा भाग असतो. घेतलेल्या अनुभवाचा आपल्या भाषण-संभाषण व लेखनातून आविष्कार करणे या गोष्टी भावना व विचार यांच्या प्रकटीकरणासाठी आवश्यक आहेत. त्यासाठी पाठ्यपुस्तकात इयत्ता पाचवीपासून ते इयत्ता नववीपर्यंत लेखनाच्या विविध प्रकारांद्वारे लेखन कौशल्य विकसित करण्याची संधी तुम्हांला उपलब्ध करून दिलेली आहे. इयत्ता दहावीमध्ये आपण लेखन कौशल्याचा विकास व त्याचा दैनंदिन जीवनात/भाषिक व्यवहारात उपयोग होईल असे घटक उपयोजित लेखनाच्या अंतर्गत घेतलेले आहेत. काही घटकांची उजळणी तर काहींची नव्याने ओळख करून दिलेली आहे. आत्तापर्यंत मिळालेल्या माहितीचे उपयोजन करून तुम्हांला आपले लेखन कौशल्य अधिक विकसित करायचे आहे.

दैनंदिन व्यवहारात आपले विचार, कल्पना, भावना व अनुभव लेखनातून मांडणे फार महत्त्वाचे असते. इतरांशी संवाद साधण्यासाठी, स्वत:ला आविष्कृत करण्यासाठी लेखनाची गरज असते. विविध कार्यालयांत अनेक निमित्ताने आपल्याला अर्ज करावे लागतात. आप्त, मित्रांशी औपचारिक पत्रव्यवहार करावा लागतो. तंत्रज्ञानाच्या माध्यमांचा प्रभाव सर्वदूर पोहोचला, तरी लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम वृत्तपत्र आहे. वृत्तपत्रांमधून विविध प्रकारचे लेखन केले जाते. त्यातील महत्त्वाचे लेखन म्हणजे बातमी लेखन. याबरोबरच तुम्हांला निबंध, जाहिरात, सारांश, कथा यांसाठी लागणारी लेखन कौशल्ये विकसित करायची आहेत. ही कला आपणाला या वयापासूनच ज्ञात झाली, तर भविष्यात त्याचा उपयोग होऊ शकतो. आपण प्राप्त केलेल्या ज्या लेखन कौशल्याचा उपयोग लेखनाच्या विविध अंगाने व व्यावहारिक जीवनासाठी करता येतो किंवा केला जातो त्यास उपयोजित लेखन म्हणतात.

# ♦ उपयोजित लेखन

## १. पत्रलेखन

पत्रलेखन ही कला आहे. आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे तसेच आपल्या भावना/विचारांचे चांगल्या भाषेत संक्रमण करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

तुम्ही मागील वर्षीही ‘पत्रलेखन’ या घटकाचा अभ्यास केलेला आहे. ते पत्रलेखन तुम्ही पारंपरिक पद्‌धतीने करत होतात. आता तुम्ही तंत्रज्ञान युगात वावरत आहात. संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांद्‌वारे तुमची तंत्रज्ञानाशी गट्टीही झाली आहे.

‘फोन’चा वापर वाढल्यानंतर पत्रलेखनाची गरज काहीशी कमी झालेली आहे. असे असले तरी अनौपचारिक पत्रात आपल्या भावना शब्दांत प्रभावीपणे व्यक्त करता येणे, हे आवश्यक कौशल्य आहे. तसेच औपचारिक पत्रासाठी आपले म्हणणे, विचार, मागणी, तक्रार, विनंती इत्यादी गोष्टी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचवणे, हे आवश्यक कौशल्य आहे. आजही पत्रलेखन ही कला आत्मसात करणे आवश्यक आहे. यापुढे तंत्रज्ञानाच्या लेखनपद्‌धतीने आपले लेखन कौशल्य प्रकट व्हायला हवे.

पत्रलेखनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. यापुढील काळात तुम्हांला मेल पाठवण्याचे तंत्र अवगत करावे लागणार आहे. म्हणूनच या वर्षी आपण पत्राचे प्रारूप हे नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्‌धतीनुसार लक्षात घेणार आहोत.

**या वर्षी आपण खालील पत्रप्रकारांचा अभ्यास करणार आहोत.**

**पत्रलेखन**

**अनौपचारिक** → **कौटुंबिक**
जवळच्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीला पाठवले जाणारे पत्र

**औपचारिक** → **मागणी, विनंती**
कार्यालयीन व व्यावसायिक पत्र

| औपचारिक | अनौपचारिक |
|---|---|
| (१) प्रति, लिहिल्यानंतर व्यक्तीचा हुद्दा समर्पक लिहिणे. | (१) व्यक्तीचा उल्लेख योग्य/नात्याप्रमाणे/सन्मानपूर्वक करणे. |
| (२) पत्राचा विषय लिहिणे. | (२) व्यक्तीचे क्षेमकुशल विचारणे. |
| (३) अचूक शब्दांत नेमका आशय मांडणे. | (३) भावना प्रभावी शब्दांत मांडणे. |
| (४) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे. | (४) नात्यातील जिव्हाळ्यानुसार विस्तृत लेखन करणे. |
| | (५) पत्राचा विषय लिहिण्याची गरज नाही. |
| | (६) पत्रात शेवटी डावीकडे पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक. |

[**टीप –** पत्राला उत्तर मिळण्यासाठी पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहिणे आवश्यक ठरते. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आवश्यकता नाही. (ई-मेलसाठी पाकीट नसते.)]

## पत्राचे प्रारूप नमुना

दिनांक ________

प्रति, ________

माननीय ________,

________

विषय : ________

महोदय,

________________

मुख्य मजकूर

आपला/आपली

________

पत्ता

________

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

## पत्रलेखन नमुना कृती–१

- खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

*वाचनम् हितकारकम् !*

**आनंद पुस्तकालय**

१०२, विकास नगर, गाळा नं.२, जालना



दुकानाच्या वर्धापन दिनानिमित्त
**खास आकर्षण**
कोणत्याही पुस्तकावर २०% सवलत

सवलत दिनांक
१ नोव्हें ते १५ नोव्हें

वेळ : सकाळी १० ते रात्री ८ सोमवारी बंद

रसिक वाचक या नात्याने संबंधित व्यक्तीला स्वत:साठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

शालेय भांडार प्रमुख या नात्याने संबंधित व्यक्तीला शाळेसाठी मागवलेल्या पुस्तकांवर अधिक सवलत देण्याविषयी विनंती करणारे पत्र लिहा.

## पत्रलेखन नमुना कृती-२

- खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.

***'वाचते व्हा! लिहिते व्हा!'***

**कुमारासाठींचे प्रसिद्ध मासिक**

**साहित्यसंपदा**

शब्दमर्यादा कथा, ललित ७०० शब्द

**अंकासाठी विद्यार्थ्यांकडून स्वलिखित लेख, कविता, कथा, ललित साहित्य मागवण्यात येत आहे.**

**संपर्क पत्ता–** संपादक, साहित्यसंपदा, समर्थ नगर, पुणे.

'साहित्यसंपदा'च्या दिवाळी अंकात तुमच्या लहान भावाची कविता प्रकाशित झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

वाचक या नात्याने 'साहित्यसंपदा'चा दिवाळी अंक वाचनीय झाल्याबद्दल संबंधी व्यक्तीचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

## २. सारांश लेखन

'आपले म्हणणे थोडक्यात सांगा' आजच्या धावपळीच्या युगातले हे परवलीचे वाक्य आहे. एखाद्या विस्तृत लेखनाला त्याचा संपूर्ण आशय लक्षात येईल अशा पद्धतीने संक्षिप्त रूप देणे, हे महत्त्वाचे कौशल्य आहे. हे कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने 'सारांश लेखन' या घटकाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

**सारांश लेखनाच्या पायऱ्या :**

(१) दिलेल्या परिच्छेदाचे वाचन.

(२) परिच्छेदातील आशयाचे आकलन होणे.

(३) मध्यवर्ती विचार जाणून घेणे.

(४) समजलेला विचार स्वत:च्या शब्दांत थोडक्यात मांडणे.

(**टीप–** कमीत कमी शब्दांत सारांश लिहिणे व त्यातून परिच्छेदातील आशयाचा पूर्ण अर्थ प्रतिबिंबित होणे महत्वाचे आहे.)

**कृतिपत्रिकेसाठी–**

(१) सारांश लेखन उतारा १०० ते १२० शब्दांचा असेल. (२) दिलेल्या परिच्छेदाचा थोडक्यात (कमीत कमी) शब्दांत सारांश लिहिणे अपेक्षित आहे. (३) परिच्छेदाच्या सारांशातून संपूर्ण आशय लक्षात येणे अपेक्षित आहे. (४) सारांश लेखनाची मध्यवर्ती कल्पना स्वत:च्या शब्दांत मांडणे अपेक्षित आहे. (५) परिच्छेदाचे वा सारांशाचे शब्द मोजून नोंद करणे आवश्यक नाही.

**सारांश लेखन नमुना कृती**

**※ खालील उताऱ्याचे सारांश लेखन करा.**

आपले जीवन सुखी समाधानी आणि यशस्वी व्हावे असे प्रत्येकाला वाटत असते; पण तसे होत नाही. उलट सर्वत्र पाहिले असता 'दु:ख मणभर, सुख कणभर' हाच अनुभव येतो; पण तसे का होते? मानवी जीवनात 'अहंकार' हा राक्षसच सर्व समस्या निर्माण करतो, कारण तो सूक्ष्म रूपातही असतो आणि स्थूल रूपातही. जोपर्यंत माणसाच्या ठिकाणी अहंकार आहे, तोपर्यंत त्याला ज्ञान प्राप्त होणे कठीण. माणसे अहंकाराचा फुगा कळत नकळत फुगवतच असतात. अज्ञानाला आलेला आकार म्हणजे अहंकार. या अज्ञानाचा नाश झाल्याशिवाय माणसाला सत्याचा आणि सुखाचा साक्षात्कार होणे शक्य नाही, म्हणून माणसाला सुखी आणि समाधानी जीवन जगायचे असेल तर अहंकारावर लक्ष केंद्रित करून त्याला ताब्यात ठेवले पाहिजे. अहंकारी माणूस निसर्गाला जिंकण्याची भाषा बोलतो तेव्हा तो हे विसरतो, की माणूस सुद्धा निसर्गाचा घटक आहे.

***प्रत्येक माणसाला दैनंदिन व्यवहारात सुखसमाधानाऐवजी प्रचंड दु:खाचा अनुभव येतो. याचे कारण म्हणजे माणसामध्ये असलेला अहंकाररूपी राक्षस होय. अहंकार विविध रूपांत माणसाला खऱ्या ज्ञानापासून वंचित ठेवतो. म्हणूनच स्वत: निसर्गाचा घटक असूनही माणूस निसर्ग जिंकण्याची भाषा करतो. माणसाने अहंकाराला जिंकायला पाहिजे.***

# ३. जाहिरात लेखन

आजच्या स्पर्धेच्या युगाचा 'जाहिरात' हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या यशस्वितेवर उत्पादनाच्या विक्रीचा आलेख ठरतो, म्हणून एखाद्या उत्पादनाची जाहिरात करणे ही अत्यंत सृजनशील कला आहे आणि ती आत्मसात करणे हे व्यवसायाच्या यशाचे महत्त्वाचे तंत्र आहे.

आजच्या संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट व भ्रमणध्वनी (मोबाईल) यांच्यातील क्रांतीमुळे जाहिरात क्षेत्राची कक्षा अधिक विस्तारते आहे.

लोकांच्या मनात उत्पादनाबाबत आवड निर्माण करणे, त्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हा जाहिरातीचा प्रमुख उद्‌देश असतो.

- **जाहिरात लेखन करताना खालील महत्त्वाचे मुद्‌दे लक्षात घ्यायला हवेत.**

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्त्वाचे माध्यम हे भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्त्वाची ठरते.

(१) कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय हे उत्तम जाहिरातीचे सूत्र आहे.

(२) जाहिरातीकडे लक्ष वेधले जाईल अशी लक्षवेधी शब्दरचना असावी.

(३) कशाची जाहिरात आहे हे ठळकपणे व आकर्षकपणे नमूद करावे.

(४) आलंकारिक, काव्यमय, प्रभावी शब्दांचा वापर करून जाहिरात अधिक आकर्षक करावी.

(५) जाहिराती तयार करताना समर्पक व लक्षवेधी भाषेला महत्त्व असावे.

(६) ग्राहकांची बदलती आवड, सवयी, फॅशन्स व गरज यांचे प्रतिबिंब जाहिरातीत दिसावे.

(७) जाहिरातीमधील उत्पादनाची गुणवत्ता महत्त्वाची असते, त्यामुळे सवलतीचा उल्लेख असणे आवश्यक नाही.

(८) जाहिरातीमध्ये संपर्क स्थळाचा पत्ता, संपर्क क्रमांक (मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) यांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

*** कृतिपत्रिकेमध्ये –** (१) जाहिरात पेनने लिहावी, पेन्सिलचा वापर करू नये.
(२) चित्र काढण्याची आवश्यकता नाही.

### जाहिरात लेखनाच्या मूल्यमापन कृती

- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्‌धतीने पुनर्लेखन करणे.

या व्यतिरिक्त वेगळ्या पद्‌धतीने, सृजनशीलतेने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील, वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.

## जाहिरात लेखन नमुना कृती

(अ) खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.



नागराज पर्वते यांच्या गिर्यारोहक संस्थेतर्फे
गिर्यारोहणाची संधी

पर्वतराजींचे सौंदर्य, उंच कड्यांना स्पर्श करण्याचा
अनुभव घेण्यासाठी

मोजक्या
जागा
शिल्लक

आपले नाव आजच नोंदवा

संपर्क
गिरिप्रेमी गिर्यारोहक संस्था
www......................

- वरील जाहिरातीचे अधिक आकर्षक स्वरूपात पुनर्लेखन करा.

(आ) एखादा विषय देऊन :

अलका ड्रेसेस
(शालेय गणवेशाचे विक्रेते)

- वरील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.

(इ) शब्दांवरून जाहिरात :

बेकरी, केक स्पेशालिस्ट, आईस्क्रीम, ताजे पदार्थ,
ग्राहक समाधान.

- वरील शब्दांचा वापर करून जाहिरात तयार करा.

# ४. बातमी लेखन

आजचे युग हे माहितीचे युग आहे. तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे यांच्यामुळे जग खरेच जवळ आले आहे. जगात कुठेही घडलेल्या घटना, त्याची अचूक माहिती आपल्याला घरात बसून वर्तमानपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन या प्रसारमाध्यमांद्वारे सविस्तर कळते. रोजच्या जीवनातील अगदी **'जलवाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे उद्या शहराचा पाणीपुरवठा बंद राहील'** यांसारख्या आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित बातम्यांपासून **'भारताकडून क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी'** अशा राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या बातम्यांपर्यंत सर्व बातम्या आपल्याला कळतात. माहिती देणे, ज्ञान देणे, समाजप्रबोधन करणे, परिस्थितीची जाणीव करून देणे, हे बातमीचे प्रमुख उद्देश असतात.

थोडक्यात 'बातमी' हा आजच्या जीवनातला अविभाज्य घटक आहे आणि म्हणूनच वस्तुस्थितीचे चित्रण करणारी बातमी तयार करणे (बातमी लेखन करणे) हे आज महत्त्वाचे कौशल्य ठरते. बातमी घडून गेलेल्या घटनांची त्याचप्रमाणे घडणाऱ्या नियोजित कार्यचीही होते. ज्यात काय घडले? कधी घडले? कोठे घडले? कसे घडले? कोण-कोण उपस्थित होते? या प्रश्नांची उत्तरे मिळतात, ती म्हणजे बातमी. बातमी बात-मी 'अशी गोष्ट ज्यात 'मी' नाही' म्हणजेच बातमी लेखनात जसे घडले तसे यथातथ्य वर्णन करायला हवे.

बातमी लेखनासाठी आवश्यक गुण- (१) लेखन कौशल्य (२) भाषेचे उत्तम ज्ञान (३) व्याकरणाची जाण (४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना (५) समग्र वाचन.

कोणत्याही घडलेल्या घटनेची बातमी तयार करताना खालील गोष्टींचे भान राखणे महत्त्वाचे असते.

(१) घटनेची विश्वासार्हता.
(२) तटस्थ भूमिकेतून लेखन.
(३) घटनेचा अचूक व योग्य तपशील.
(४) प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे लेखन होणे महत्त्वाचे.
(५) स्वत:च्या मनाची कोणतीही बाब त्यात समाविष्ट करू नये.

- **बातमी तयार करण्याचे निकष :**

(१) शीर्षक – बातमीचा मथळा हा संपूर्ण बातमीचा/घटनेचा आरसा असतो.
(२) दिनांक, स्थळ, कालावधी संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.
(३) घटना घडून गेल्यानंतर बातमी लेखन होत असल्यामुळे बातमी नेहमी भूतकाळातच लिहिली जावी.
(४) जनक्षोभ वाढेल, कुणाच्याही भावना दुखावल्या जातील अशी वाक्ये/शब्द बातमीत नसावेत असे संकेत आहेत.
(५) बातमी लिहिताना प्रथम महत्त्वाची मुद्दा नमूद करून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

**बातमीचे क्षेत्र**

सांस्कृतिक, क्रीडा, राजकीय, शालेय/शैक्षणिक, सामाजिक, वाङ्मयीन, वैद्यकीय, वैज्ञानिक, दैनंदिन घटना या घटकांच्या संदर्भात घडलेल्या घटनांच्या बातम्या तयार होतात.

- **बातमी तयार करणे – मूल्यमापन कृती :**

(१) दिलेल्या घटनेवर बातमी तयार करणे.
(२) दिलेल्या सूचक शब्दांवरून बातमी तयार करणे.
(३) कार्यक्रमाची बातमी तयार करणे.

## बातमी लेखन
### नमुना कृती

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**
  **'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या उपक्रमास शहरातील सर्वच शाळांकडून उत्तम प्रतिसाद.**

आमच्या वार्ताहराकडून | *लोकजागृती* | दिनांक : १६ जानेवारी

### *मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमास उदंड प्रतिसाद*

१ जानेवारी ते १५ जानेवारी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या निमित्ताने शाळाशाळांमधून मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम आयोजित केले जावेत, या उपक्रमास शहरातील सर्वच शाळांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

आमच्या प्रतिनिधींनी काही शाळांमध्ये स्वत: जाऊन या उपक्रमाची माहिती घेतली. विद्यार्थ्यांसाठी बहुतांश शाळांमधून वाचन तासांचे आयोजन केले होते. याबरोबरच भाषेचे महत्त्व विशद करणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्या निमित्ताने सर्वच शाळांमध्ये ग्रंथ दिंडी, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, कथाकथन स्पर्धा, व्याख्याने अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील १०० शाळांमधून हा उपक्रम यशस्वीपणे राबवला गेला. दरवर्षी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' हा विद्यार्थी हिताचा उपक्रम शाळांमधून राबवला जाईल, अशी ग्वाही शाळांच्या मुख्याध्यापकांनी दिली.

- **खालील शीर्षकावरून बातमी तयार करा.**

शाळेचा शताब्दी वर्ष सांगता समारंभ माननीय शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न.

- **खालील विषयावर बातमी तयार करा.**
  * सर्व नागरिकांसाठी आधार कार्डाचा नंबर आपल्या बँकखात्यास लिंक करणे अनिवार्य.

# ५. कथालेखन

कथा ऐकणे व सांगणे हा आबालवृद्धांच्या आनंदाचा विषय आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती, नवनिर्मिती व सृजनशीलतेला वाव देणारा हा विषय आहे.

‘कथ्यते इति कथा!’ म्हणजेच सांगितली जाते ती कथा. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथा ही आपल्या कल्पनेने, विचाराने, सृजनशीलतेने रचली जाते. ती पूर्णत: काल्पनिक किंवा सत्यघटनेवर आधारित असूनही कथेच्या रूपात मांडली जाऊ शकते. कथेतून आनंद मिळतो त्याप्रमाणे कथा विचारप्रवर्तकही असतात. कथेतून आनंदाबरोबरच विचारांनाही दिशा मिळते. कथाबीजाच्या विषयाला पात्र, घटना, तर्कसंगत विचार यांनी फुलवणे हे लेखन कौशल्य आहे. लेखन कौशल्य विकसित करणे हा कथालेखन घटकाच्या अभ्यासाचा हेतू आहे.

- **उत्तम कथालेखनासाठी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक ठरते.**

(१) कथेला योग्य शीर्षक द्यावे. (तात्पर्य लिहिण्याची आवश्यकता नाही.)

(२) शीर्षकावरून कथेच्या विषयाची (कथाबीजाची) कल्पना यायला हवी.

(३) शीर्षक म्हणून सुविचार, म्हण असावी असे बंधन नाही.

(४) कथा भूतकाळात लिहावी.

(५) लेखनातील घटना, प्रसंगानुसार काळाचे योग्य भान राखले जाणे महत्त्वाचे आहे.

(६) कथेला भाषेचा, घटनांचा ओघ, कालानुक्रम असणे आवश्यक आहे.

(७) कथाबीजाला अनुसरून पात्र व त्यांचे संवाद, पात्रानुसार योग्य भाषा असावी.

(८) कथेत प्रसंगानुसार वातावरण निर्मिती करावी.

- **कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

(१) कथाबीजावरून कथालेखन.

(२) शीर्षकावरून कथालेखन.

(३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.

(४) अपूर्ण कथा पूर्ण करणे.

(अ) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे.

(ब) उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

(५) मुद्द्यांवरून कथालेखन.

[**टीप–** कथालेखनासाठी वर दिलेल्या प्रकारांपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.]

# कथालेखन

## नमुना कृती

**दिलेल्या कथेची सुरुवात वाचा व त्याआधारे पुढील कथा पूर्ण करा.**

आम्हांला उन्हाळी सुट्टी लागणार, म्हणून मी व माझी धाकटी बहीण सानिका खूप खूश होतो. त्याला कारणही तसेच होते. बाबांनी सुट्टीत महाबळेश्वरला नेण्याचे कबूल केले होते. १० मे ते १५ मे अशी ट्रिपची तारीखही नक्की ठरली होती. मी सहलीच्या आनंदात रंगून गेलो होतो. ''वैभवदादा, कॅमेरा बरोबर घ्यायचा का?'' सानिकाच्या या प्रश्नाने मी भानावर आलो. ''अग, हो घेऊया'', म्हणून मी पुन्हा तयारीला लागलो. बरोबर नेण्याच्या वस्तू एकत्रित करणे, महाबळेश्वरची भौगोलिक माहिती आंतरजालावरून मिळवणे, आमचा उत्साह नुसता ओसंडून वाहत होता. बघता बघता १० मे ची पहाट उजाडली. आई, बाबा, मी, सानिका सर्व तयार झालो. आवराआवरी झाली आणि सगळे निघणार एवढ्यात दारावरची बेल वाजली... आणि ....................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..................................

- तुम्ही पूर्ण केलेल्या कथेला योग्य शीर्षक द्या.
- ही कथा वर्गात सादर करा.

# ६. लेखन कौशल्य

## निबंध लेखन

स्वविचारांचे प्रकटीकरण ही क्षमता/कौशल्य आत्मसात करण्यासाठी निबंध लेखन या घटकाचा अभ्यास आवश्यक असतो. निबंध लेखन म्हणजे विचारांची विषयानुरूप केलेली मुद्देसूद मांडणी.

यावर्षी आपण प्रसंगलेखन, आत्मकथन आणि वैचारिक या निबंध लेखन प्रकारांचा अभ्यास करणार आहोत.

## निबंध लेखन

### (१) प्रसंगलेखन/अनुभवलेखन–

पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे चित्र हुबेहूब शब्दांत रेखाटणे यालाच वर्णनात्मक निबंध म्हणतात. निरीक्षणशक्ती व लेखनशैलीच्या विकासासाठी प्रसंगलेखन/अनुभवलेखन हा घटक महत्त्वाचा आहे.

**लेखन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) प्रसंग लेखन करताना घटनांचा तार्किक विचार करावा.

(२) भाषा प्रभावी व चित्रदर्शी (हुबेहूब) वर्णन करणारी असावी.

(३) भाषा सोपी असावी. खूप आलंकारिक नसावी.

(४) लेखन प्रसंगानुरूप, संवेदनशील असावे.

**नमुना कृती**

- **'अकस्मात पडलेला पाऊस' या विषयावर खालील मुद्दे विचारात घेऊन लेखन करा.**



### (२) आत्मकथन–

**आत्मकथन करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार करणे.
(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोग, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.
(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे.
(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रीतीने कल्पना मांडणे.
(५) संपूर्ण लेखन प्रथमपुरुषी एकवचनी भाषेत करणे.

#### नमुना कृती

- **खालील मुद्द्यांच्या आधारे 'आरसा' या घटकाचे आत्मवृत्त लिहा.**

**मी आरसा बोलतोय**

निर्मिती व शोध
↓
शास्त्रीय तत्त्व
→ आरशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन
→ आरशाचे महत्त्व
→ माणसाच्या चेहऱ्यावरील भाव हाच त्याच्या मनाचा आरसा
→ आरशाचा आनंद व खंत



### (३) वैचारिक–

(१) या निबंध प्रकारात विचारांना प्राधान्य असते.

(२) विचाराला दोन बाजू असू शकतात.

(३) योग्य/अयोग्य दोन्ही बाजूंची साधक-बाधक चर्चा व्हावी.

(४) मुद्द्यांची मांडणी सुसंगत व तार्किक विचारांनुसार असावी.

(५) मुद्द्यांचे समर्थन करण्यास नामवंत विचारवंतांचे विचार, म्हणी, सुवचने यांचा आधार घ्यावा.

(**टीप–** वाचन, निरीक्षण, चिकित्सक विचार हे वैचारिक मांडणीसाठी आवश्यक आहे.)

## नमुना कृती

- **'मी माझ्या देशाचा नागरिक', या विषयावर खालील मुद्दे विचारात घेऊन लेखन करा.**




**जबाबदार नागरिक**

**पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञेचा संदर्भ**

**हक्क व कर्तव्ये यांची जाणीव**

**देश माझा, मी देशाचा ही भावना**

**देशाच्या सद्यस्थितीचे ज्ञान**

**स्ववर्तन**

इयत्ता नववी मराठी विषयाच्या कुमारभारती पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.११२, ११३, ११४ यावरील मजकूर लेखन कौशल्याच्या अधिक संदर्भासाठी पाहावा.

## हे शब्द असेच लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रसिद्‌ध | सहानुभूती | वैयक्तिक | मन:स्थिती |
| वैशिष्ट्य | साहाय्यक | वैश्विक | विपरीत |
| महत्त्व | शिरोधार्य | संस्कृती | तीर्थरूप |
| व्यक्तिमत्त्व | निर्णय | सांस्कृतिक | दुष्काळ |
| भाषातज्ज्ञ | अभिव्यक्ती | विश्वकोश | दैनंदिनी |
| व्युत्पत्ती कोश | जीवनध्येय | मैत्रीण | निष्क्रिय |
| दृष्टी | कनिष्ठ | मैत्रिणी | पारंपरिक |
| दृष्टिकोन | सर्वांगीण | हार्दिक | हिंस्र |
| अंतर्मुख | दीर्घायुष्य | आशीर्वाद | प्रतिभावंत |
| निर्जीव | पुनर्विवाह | अभिनंदन | शैक्षणिक |
| निर्मिती | क्रियाशील | दीपावली | भौतिक |
| वाङ्‌मय | ऐतिहासिक | शीर्षक | माहीत |
| साहित्यिक | मुहूर्त | पूर्वार्ध | माहिती |
| निष्पर्ण | स्रोत | वैविध्यपूर्ण | पश्चात्ताप |
| प्राक्तन | सर्वोच्च | हुरहुर | सयुक्तिक |
| तत्त्वज्ञान | पुरस्कार | उत्तरार्ध | अल्पोपाहार |
| समृद्‌धी | दुर्गुण | सृजनशील | ज्येष्ठ |
| कीर्ती | उत्कृष्ट | माहात्म्य | सामूहिक |
| क्षितिज | हुबेहूब | तात्पर्य | सार्वजनिक |
| ठरावीक | उत्स्फूर्त | अंत:करण | सार्वत्रिक |
| सामाजिक | कर्तृत्व | अतिशयोक्ती | परीक्षा |
| पुनरावृत्ती | वक्तृत्व | अस्तित्व | सूचना |
| पुनर्रचना | उच्छ्‌वास | उज्ज्वल | स्फूर्ती |
| दुर्मीळ | विश्लेषण | उत्पन्न | स्तिमित |
| जीवनशैली | परिस्थिती | उपस्थिती | स्मृतिदिन |
| कौटुंबिक | कीर्तन | औपचारिक | सुज्ञ |
| आलंकारिक | समीक्षा | क्रीडांगण | हृदय |

# पारिभाषिक शब्द

ज्ञानप्रसाराच्या विविध माध्यमांत आणि जीवन व्यवहारात सतत बदल होत असतात. साहजिकच त्या त्या ज्ञानक्षेत्रात वा व्यवहारात प्रचलित शब्दांहून वेगळे शब्द वापरले जातात. विशिष्ट ज्ञानक्षेत्रातील माहिती, संकल्पना यांच्या प्रकटीकरणाला योग्य ठरतील असे शब्द वापरण्याची गरज असते. भाषिक व्यवहाराच्या या वेगळेपणातून ज्ञानक्षेत्रांची वा व्यवहारांची परिभाषा सिद्ध होते. अशा परिभाषेतून शास्त्रभाषेचा व ज्ञानभाषेचा विकास होत असतो. बदलते जीवनव्यवहार, वाढत्या गरजा आणि विस्तारणारी ज्ञानक्षेत्रे यांनुसार 'पारिभाषिक संज्ञा' निर्माण होतात.

पारिभाषिक पदनामांच्या वापरामुळे किंवा पारिभाषिक संज्ञांच्या वापरामुळे विचार, संकल्पना यांच्या प्रकटीकरणात विशिष्टता, निर्दोषता येते. पारिभाषिक संज्ञांचा मूळ उद्देश व्यवहारसापेक्ष भाषेचे उपयोजन हा आहे.

शिक्षण, विविध शास्त्रे, प्रशासन, आरोग्य, समाज, उद्योग, व्यापार, न्याय, आर्थिक व्यवहार, कला, संस्कृती इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये आवश्यकतेनुसार पारिभाषिक संज्ञा उपयोगात आणल्या जातात. या संज्ञांमुळे ज्ञानव्यवहार अधिक प्रभावी आणि सुस्पष्ट होतात. या दृष्टीने पारिभाषिक संज्ञांना अनन्यसाधारण महत्त्व असते.

| | |
|---|---|
| Absence | अनुपस्थिती |
| Academic Qualification | शैक्षणिक अर्हता |
| Action | कार्यवाही/कृती |
| Affedevit | शपथपत्र |
| Agent | अभिकर्ता, प्रतिनिधी |
| Application Form | आवेदनपत्र |
| Anniversary | वर्धापनदिन |
| Bench | आसन, न्यायासन |
| Bio-data | स्व-परिचय |
| Bonafide Certificate | वास्तविकता प्रमाणपत्र |
| Book post | पुस्त-प्रेष |
| Book Stall | पुस्तकविक्री केंद्र |
| Drama | नाटक |
| Dismiss | बडतर्फ |
| Due Date | नियत दिनांक |
| Earn Leave | अर्जित रजा |
| Exchange | देवाण-घेवाण, विनिमय |
| Express Highway | द्रुतगती महामार्ग |
| Event | घटना |
| Exhibition | प्रदर्शन |
| Feedback | प्रत्याभरण |
| Calligraphy | सुलेखन |
| Children's Theatre | बालरंगभूमी |
| Comedy | सुखात्मिका |
| Census | जनगणना |
| Casual Leave | नैमित्तिक रजा |
| Category | प्रवर्ग |
| Commentator | भाष्यकार, समालोचक |
| Correspondence | पत्रव्यवहार |
| Corporation | महामंडळ, निगम |
| Daily Allowance | दैनिक भत्ता |
| Daily Wages | दैनिक वेतन, रोजंदारी |
| Documentary | माहितीपट |
| Lyric | भावगीत |
| Magazine | नियतकालिक |
| Medical Examination | वैद्यकीय तपासणी |
| Mortgage | गहाण, तारण |
| No Objection Certificate (NOC) | ना हरकत प्रमाणपत्र |
| News Agency | वृत्तसंस्था |
| Official Record | कार्यालयीन अभिलेख |
| Orientation | निदेशन, उद्बोधन |
| Overtime | अतिरिक्त काल |

| | | | |
|---|---|---|---|
| Fellowship | अधिछात्रवृत्ती | Open Letter | अनावृत्त पत्र |
| General Meeting | सर्वसाधारण सभा | Part Time | अंशकालीन, अर्धवेळ |
| Government Letter | शासकीय पत्र | Patent | एकस्व/अधिहक्क |
| Goodwill | सदिच्छा | Press Note | प्रसिद्धिपत्रक |
| Half Yearly | अर्धवार्षिक | Programme | कार्यक्रम |
| Honourable | माननीय | Pocket Money | हातखर्च |
| Humanism | मानवतावाद | Quorum | गणसंख्या |
| Index | अनुक्रमणिका, निर्देशसूची | Qualitative | गुणात्मक |
| | | Registered Letter | नोंदणीकृत पत्र |
| Initials | आद्याक्षरे | Reservation | आरक्षण |
| Interpreter | दुभाषा | Revaluation | पुनर्मूल्यांकन |
| Joint Meeting | संयुक्त सभा | Receptionist | स्वागतकार |
| Junior Clerk | कनिष्ठ लिपिक | Refreshment | अल्पोपाहार |
| Journalism | पत्रकारिता | Secretary | सचिव, कार्यवाह |
| Lecturer | अधिव्याख्याता | Lesson Note | पाठ टिपणी |
| Senior Clerk | वरिष्ठ लिपिक | Service Book | सेवापुस्तक |
| Letter-Head | नाममुद्रित प्रत | Lift | उद्वाहन यंत्र, उद्वाहक |
| Show Cause Notice | कारणे दाखवा नोटीस | Sonnet | सुनीत (काव्यप्रकार) |
| Labour Court | कामगार न्यायालय | Undertaking | हमीपत्र |
| Sourvenir | स्मरणिका | Unit | घटक, एकक |
| Supervisor | पर्यवेक्षक | Survey | सर्वेक्षण, पाहणी |
| Valuation | मूल्यांकन | Synopsis | प्रबंध रूपरेषा, सारांश |
| Verbal | शाब्दिक, तोंडी | Tax | कर |
| Workshop | कार्यशाळा | Therapy | उपचारपद्धती |
| Up-to-date | अद्ययावत | Transport | परिवहन |
| Wall Paper | भिंतीला चिकटवण्याचा कागद | Trade Mark | बोधचिन्ह |
| | | Mobile | भ्रमणध्वनी |
| Yard | आवार | Translator | अनुवादक |
| Zero Hour | शून्य तास | Unauthorized | अनधिकृत |
| Zone | परिमंडळ, विभाग | | |

# शब्दार्थ

पाठ्यपुस्तकातील पाठ, कविता यांमध्ये आलेले कठीण शब्द, वाक्प्रचार व त्यांचे अर्थ खाली दिलेले आहेत. दिलेले शब्द व वाक्प्रचार यांची मांडणी विद्यार्थ्यांनी वहीत शब्दकोशाप्रमाणे (अकारविल्हे) करावी.

◆ **जय जय हे भारत देशा (गीत)**

**कापरे** – भीती, भय.

◆ **बोलतो मराठी...**

**खस्ता खाणे** – कष्ट करणे, श्रम करणे.
**कंठस्नान घालणे** – ठार मारणे.

◆ **आजी : कुटुंबाचं आगळ**

**छत्रछाया** – संरक्षण, आश्रय.
**देवळी** – कोनाडा.
**कडुसं पडणे**– संध्याकाळ होणे.
**सटकी मारणे**– निघून जाणे, हळूच सटकणे.

◆ **उत्तमलक्षण (संतकाव्य)**

**श्रोतीं** – श्रोत्यांनी.
**बाणे** – अंगीकारणे, स्वीकारणे.
**पुसणे** – विचारणे.
**आर्जव** – विनंती.
**होड** – शर्त, शर्यत, करार.
**सांडणे** – सोडणे.
**पराधेन** –पराधीन.

◆ **वसंतहृदय चैत्र**

**मधुमास** – चैत्र महिन्यासाठी आलेला उल्लेख.
**हिरिरी** – आवेश, वेग, झपाटा.
**उग्रगंधी** – उग्र, तीव्र वासाचे.
**नामाभिधान**– नाव.
**शिरोधार्य मानणे** – महत्त्व देणे, प्रमाण मानणे.
**निर्गंध**– वास निघून गेलेला.
**मुग्ध होणे** – आश्चर्याने दंग होणे.
**स्थूल** – ठसठशीत.
**कोका** – केळीच्या किंवा फणसाच्या गाभ्यापासून बाहेर पडतो तो मोना.

◆ **बालसाहित्यिका : गिरिजा कीर**

**स्तुत्य**– स्तुती करण्याजोगा.
**पारख करणे**– तपासणी करणे.
**वामकुक्षी**– दुपारची झोप.

◆ **वस्तू (कविता)**

**निखालस** – स्पष्ट, खात्रीने, उघड.
**निष्कासित करणे** – बाहेर काढणे, हकालपट्टी करणे.

◆ **गवताचे पाते**

**कर्णकटू**– कर्कश, कानठाळ्या बसवणारा.

◆ **वाट पाहताना**

**शोष**– कोरडेपणा, रूक्षता.

◆ **आश्वासक चित्र (कविता)**

**झरोका**–लहान खिडकी.
**आधण**–पाण्यास आलेली उकळी, कढ.

◆ **आप्पांचे पत्र**

**कान देऊन ऐकणे**– लक्षपूर्वक ऐकणे.

◆ **गोष्ट अरुणिमाची**

**शिताफी**– हुशारी, चपळाई.
**पित्त खवळणे**– खूप राग येणे.

◆ **भरतवाक्य (कविता)**

**सुसंगति**– चांगली संगत.
**सुजनवाक्य**– सज्जनांचे विचार.
**विषय** – विकार.
**हट** – हट्ट.
**भवच्चरित्रीं**– सत्पुरुषांच्या चरित्रांमध्ये.
**कुजनविघ्नबाधा**– दुष्टांनी आणलेल्या विघ्नांची बाधा.
**सदुक्तमार्गी**– चांगल्या मार्गाला.
**स्वतत्त्व**– स्व (स्वत:चे) तत्त्व, वास्तविक स्वरूप.

**आत्मबोधें**–आत्मबोधाने.
**मावली**– माऊली.
**जगत्रयनिवास**–तिन्ही लोकांत राहणारा.
**निजाश्रितजनां**–स्वत:च्या आश्रयाला आलेल्या लोकांना.

### ◆ कर्ते सुधारक कर्वे

**टिचणे**– भरून येणे.
**धुमाळी**– गडबड, धांदल.
**प्रच्छन्न**– गुप्त, छुपा, छुपेपणाने केलेला.
**सहिष्णु**– सहनशील.
**असिधाराव्रत**– (असिधारा–तलवारीची धार) येथे अतिशय खडतर व्रत असा अर्थ.
**मुहुर्तमेढ रोवणे** – एखाद्या गोष्टीचा आरंभ करणे.
**उपाख्य** – उर्फ.

### ◆ काळे केस

**गर्भित**– दडलेला, मूळ.
**तगादा लावणे**– एखाद्या गोष्टीसाठी मागे लागणे.

### ◆ खोद आणखी थोडेसे (कविता)

**आर्त**– तळमळ, इच्छा, उत्कंठा.
**रिता**– रिकाम्या.

### ◆ वीरांगना

**निकराने लढणे**– प्राण पणाला लावून लढणे.
**प्रलोभन**– आमिष.
**बडगा**– धाक, वचक.

### ◆ आकाशी झेप घे रे पाखरा (कविता)

**सुखलोलुप**– भौतिक सुखाला लालचावलेला.
**विहार**– हिंडणे.

### ◆ सोनाली

**आवेश**– राग, संताप.

### ◆ निर्णय

**क्षीण होणे**– संपणे, नाश पावणे.
**अचंबित होणे**– आश्चर्यचकित होणे.

### ◆ तू झालास मूक समाजाचा नायक (कविता)

**काळोखाचे राज्य**– अन्यायाचे राज्य.
**सूर्यफुलांनी पाठ फिरविली होती**– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या सूर्याकडे लोकांचे लक्ष नव्हते, असा अर्थ.
**मळवाट**– मळलेली वाट (पारंपरिक वाट).
**खाचखळगे**– कठीण परिस्थिती.
**रणशिंग फुंकणे**– युद्धाच्या वेळी योद्ध्यांना बोलवण्यासाठी रणशिंग फुंकतात. येथे अन्यायाविरुद्ध बंड पुकारणे असा अर्थ आहे.
**संगीन**– बंदुकीला जोडलेले लांब धारदार पाते.
**डचमळणे**– उसळणे, डळमळणे.

### ◆ सर्व विश्वचि व्हावे सुखी

**साधर्म्य**– सारखेपणा.
**प्रबोधन**– जागृती.

## वाचा

### संदर्भग्रंथांचिया संगे

सर्वसामान्यपणे ग्रंथांचे दोन प्रकार केले जातात. ते म्हणजे **ग्रंथ** आणि **संदर्भ ग्रंथ**. कथा-कादंबऱ्या, चरित्रे, काव्ये, वैचारिक आणि ललित लेखन यांसारखी पुस्तके ही पहिल्या प्रकारात येतात. हे ग्रंथ पूर्णपणे वाचले जातात; पण संदर्भ ग्रंथ अथपासून इतिपर्यंत वाचले जात नाहीत. संदर्भ ग्रंथांचा वापर हा विशिष्ट माहितीसाठी, संदर्भासाठी केला जातो. वाचकांना हवी असलेली माहिती पुरवण्याचे महत्त्वाचे कार्य संदर्भ ग्रंथ करतात.

संदर्भ ग्रंथ हे बऱ्याच वेळा अनेक खंडांत विभागलेले असतात. यात एकापुढे एक अशा अनेक विषयांची माहिती दिलेली असते. ते विषय आद्याक्षरानुसार, विषयानुसार किंवा कालानुसारही मांडलेले असतात. अनेक विद्वानांनी अभ्यासांती त्यांची मांडणी केलेली असते. इतर ग्रंथांच्या तुलनेने हे ग्रंथ मोठे व किंमतीनेही अधिक असतात. काही वेळा अत्यंत दुर्मीळही असतात. बऱ्याचदा ते ग्रंथालयात बसूनच वाचावे लागतात. वाचक आणि त्यांना हवे असलेले साहित्य वा माहिती यांची सांगड घालून देण्याचे मोलाचे कार्य हे ग्रंथ करत असतात आणि हेच संदर्भ ग्रंथांच्या उपयुक्ततेचे खरे मर्म आहे.

कोणत्याही विषयाचे सखोल अध्ययन करायचे झाले तर त्याचे योग्य दिशादर्शन संदर्भ ग्रंथाद्‌वारे होऊ शकते. अभ्यासू वाचकाला ग्रंथपालाच्या मदतीने संदर्भ ग्रंथाची माहिती घेता येते. ज्ञानकोश, शब्दकोश, तालिका-ग्रंथसूची, भाषांतरे, फोटोकॉपीज, मायक्रोफिल्मस्, सिडीज, वार्षिके इत्यादी संदर्भ साधनांच्या मदतीने कोणत्याही विषयाचा अभ्यास करणे सहजसुलभ होते. संदर्भ ग्रंथाच्या मदतीने एकाच विषयावरील अनेक संदर्भ पाहता येतात. वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून तो विषय समजून घेता येतो.

विद्यार्थ्यांना शालेय वयापासूनच असे संदर्भ ग्रंथ हाताळण्याची, वाचण्याची सवय असेल तर ती त्यांच्या अभ्यासाला निश्चित पूरक ठरते. म्हणजे असे, की पाठ्यपुस्तकातील एखाद्या कवितेचा अभ्यास करताना त्या कवितेची रचना करणाऱ्या कवीची अधिक माहिती मिळवणे, त्या कवीच्या इतर काव्यांची माहिती मिळवणे, हे संदर्भ ग्रंथाच्या मदतीने कमी वेळात विद्यार्थी करू शकतात. प्रकल्प पद्धतीने अभ्यास करताना तर त्यांची खूपच मदत होते. त्यांच्या साहाय्याने कोणत्याही विषयातील अधिक माहिती विद्यार्थी गोळा करू शकतात. त्यासाठी विद्यार्थ्यांना संदर्भ ग्रंथ हाताळण्याची सवय लावणे आवश्यक आहे.

#### काही निवडक संदर्भ ग्रंथ

**(१) शब्दकोश-** मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत व इतर भाषांतील शब्दकोश हे महत्त्वाचे पहिले संदर्भ साधन आहे. अडलेल्या शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी, नवीन शब्द माहिती करून घेण्यासाठी शब्दकोशांचे बहुमोल साहाय्य होते.

**(२) ज्ञानकोश-** महाराष्ट्रीय ज्ञानकोश, मराठी विश्वकोश, एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका यांतून विविध प्रकारच्या माहितीचे संकलन केलेले असते. हे अनेक खंडांत असतात.

**(३) विशिष्ट ज्ञानकोश-** भारतीय संस्कृती कोश-भाग १ ते १०, संकेत कोश इत्यादी कोशांत विशिष्ट विषयाशी संबंधित माहिती असते.

**(४) चरित्रकोश-** भारतवर्षीय चरित्रकोश-(प्राचीन, अर्वाचीन, मध्ययुगीन), शास्त्रज्ञांचा चरित्रकोश इत्यादींमध्ये या व्यक्तींची चरित्रात्मक माहिती संकलित केलेली असते.

**- भाग्यश्री हर्षे**



# काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ यांची यादी

(१) ययाती– वि. स. खांडेकर

(२) बनगरवाडी– व्यंकटेश माडगूळकर

(३) झोंबी– आनंद यादव

(४) ऊन– शंकर पाटील

(५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर– शंकरराव खरात

(६) वपूर्झा– व. पु. काळे

(७) कोसला– भालचंद्र नेमाडे

(८) ग्रामगीता– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

(९) गोष्टी माणसांच्या– सुधा मूर्ती

(१०) उपेक्षितांचे अंतरंग– श्रीपाद महादेव माटे

(११) मराठी व्युत्पत्ति कोश– कृ. पां. कुलकर्णी

(१२) कऱ्हेचे पाणी– प्र. के. अत्रे

(१३) मृत्युंजय– शिवाजी सावंत

(१४) फकिरा– अण्णाभाऊ साठे

(१५) वाचू आनंदे भाग १ ते ४– माधुरी पुरंदरे

(१६) लिहावे नेटके भाग १ ते ३– माधुरी पुरंदरे

(१७) सुगम मराठी व्याकरण व लेखन– मो. रा. वाळंबे



## काही महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स यांची यादी

https://mr.wikipedia.org/wiki/मंगेश_पाडगांवकर

https://mr.wikipedia.org/wiki/दुर्गा_भागवत

https://mr.wikipedia.org/wiki/गिरिजा_कीर

https://mr.wikipedia.org/wiki/विष्णू_सखाराम_खांडेकर

https://en.wikipedia.org/wiki/Arunima_Sinha

https://www.youtube.com/watch?v=Wx9v_J34Fyo

www.arvindjagtap.com/about-arvind-jagtap/

https://www.youtube.com/watch?v=wKL9xyHWUGY

https://www.youtube.com/watch?v=gHqPGJ7JfgA

https://www.youtube.com/watch?v=tbJElp8e0SE

https://www.youtube.com/watch?v=o-MeFQPvqtc

https://mr.wikipedia.org/wiki/जगदीश_खेबुडकर

https://hi.wikipedia.org/wiki/नारायण_सीताराम_फडके

https://mr.wikipedia.org/wiki/अरुणा_ढेरे

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेल्या पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकांशी संबंधित अधिक माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.



**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

मराठी कुमारभारती इयत्ता दहावी (मराठी माध्यम) ₹ ७३.००